ऑक्टोबर १९८८] [दोन रूपये

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक



ऑक्टोबर १९८८

# श्री साईलीला

श्री साईबाबा संस्थान
शिरडीचे अधिकृत मासिक

संपादक

**श्री. रा. द. बन्ने**

कार्यकारी अधिकारी श्रीसाईबाबा संस्थान शिरडी

—: कार्यकारी संपादक :—

**श्री. सदानंद चेंदवणकर**

## श्री साईबाबा पुण्यतिथी विशेषांक

वर्ष ६७ वे　　किंमत २ रुपये　　अंक ७ वा

दूरध्वनी ४१२२५६१

कार्यालय

"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई- ४०० ०१४.
वार्षिक वर्गणी रु. १०/— (ट.ख. सह) किरकोळ अंक २ रु. फक्त.

**श्री साईबाबांच्या संदेशाचा जगभर प्रसार करणे हे**
**श्री साईलीलाचे मुख्य उद्दिष्ट आहे.**



# रघुनाथ सावित्री साईनाथ भजनमाला

६१

करिता विचार आला गहींवर ।
प्रपंच असार वाटला हो ॥
जन्मा येतो प्राणीं एकला तो एक ।
मायेचें कौतुक हरि जाणे ॥
चाले भावचक्र ज्याचे सत्तेखालीं ।
असा जो तूं वालीं पाहू कोठें ॥
थोर जपीतपी ऋषी योगी मुनी ।
भक्त मुक्त ध्यानीं रमले हे ॥
सबाह्य अंतरी वास ज्याचा असे।
कृपेवीण कैसें कळणार ॥
आहे ज्ञानशून्य दास गुरु देवा ।
मजला केधवां हातीं घेसी ॥

६२

फारा दिवसांनी घेतलीं मी हातीं ।
सद्‌गुरुमहतीं लिहावया ॥
राहीं गा तूं बाबा माझ्या जिव्हेवरी।
बोलवीं सत्वरी तुझे बोल ॥
बीजरुपी तूंची वृक्षरुपी तूंची ।
फळरुपी तूंची मायाबापा ॥
रसरुपी तूंची गोडी त्याची तूंची ।
स्वादरुपी तूंची कृपावंता ॥
दृश्य सृष्टि सारी तुझा हा पसारा ।
आमुचा आसरा तूंच देवा ॥
दास म्हणे माझ्या बोलासी तूं पाव ।
नसे अन्य ठाव सांगावया ॥


या मासिकात प्रकाशित झालेल्या लेखांतील
मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही.

# श्री साईलीला – ऑक्टोबर १९८८

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १. | संपादकीय | – | ४ |
| २. | ऐका साई | – श्री. निलेश कामत | ६ |
| ३. | श्री बाबांचे महानिर्वाण हा केवळ आभास | – प्रा. र. श्री. पुजारी | ७ |
| ४. | चिंतन | – सौ. निर्मला राजे | १० |
| ५. | साई धन्य संत महान | – श्री. रमाकांत करंबेळकर | १२ |
| ६. | मोक्षप्राप्ती | – सौ. उषाताई अधिकारी | १३ |
| ७. | दसरा – सोन्याचा दिवस | – सौ. मंगला वैद्य | १६ |
| ८. | महानिर्वाणातून एकात्मता | – सौ. उषा मुळे | १७ |
| ९. | श्री साई महानिर्वाणाचा अर्थ | – डॉ. सुमन खानविलकर | १९ |
| १०. | श्री साईनाथ महाराजांची ७० वी पुण्यतिथी | – सौ. सरोजिनी मुळये | २३ |
| ११. | श्री साईबाबा – महानिर्वाण | – श्री. चिंतामण शिंत्रे | २४ |
| १२. | संतवाणी – माणिक मोती | – श्री. अशोकराव गगे | २६ |
| १३. | साईदरबारातील माणिक आणि मोती - १० | – | २८ |
| १४. | गुरूचा महिमा | – सौ. नीता कालुष्टे | ३० |
| १५. | त्रिवार वंदन | – श्री. सूर्यकांत आंगणे | ३२ |
| १६. | मी जातो आमुच्या गावा | – आसावरी वायकूळ | ३३ |
| १७. | अनाकलनीय महानिर्वाण | – श्री. मधु पाटणकर | ३५ |
| १८. | गोदावरीच्या काठी | – डॉ. रा. सी. कापडी | ३७ |
| १९. | श्री साईंच्या जीवन इतिहासातील शेवटचे पान | – श्री. सदानंद चेंदवणकर | ३८ |
| २०. | दसरा संदेश | – श्री. रमेश शेलार | ४६ |
| २१. | श्री साईनाथांचे महानिर्वाण | – डॉ. कु. इंदुताई नाईक | ४७ |
| २२. | साईरुपी यती हे आले | – सौ. वसुंधरा चोरे | ४८ |
| २३. | शोक | – श्री. एन. पी. चव्हाण | ४९ |
| २४. | सतांची शिकवण आणि भक्तीमार्ग | – श्री. एकनाथ महाजन | ५० |
| २५. | साई नाम सदा जपा | – सौ. मंदा इनामदार | ५३ |
| २६. | श्री साईनाथांची अमरवाणी | – श्री. शिवानंद हिरेमठ | ५४ |
| २७. | ओम साई नाथा | – कु. सिंधु थोरात | ५५ |
| २८. | खापर्डे यांची शिरडी दैनंदिनी | – साईनंद | ५६ |
| २९. | साई रंगी रंगू दे मन | – सौ. वासंती नांदेडकर | ५८ |
| ३०. | ज्ञानेश्वरांविषयी सामान्य ज्ञान | – श्री. सदानंद चेंदवणकर | ६१ |
| ३१. | साई म्हणजे साक्षात ईश्वर | – सौ. शैलजा कुळकर्णी | ६२ |
| ३२. | अशी बाबांना भक्ताची काळजी | – इंदिरा लालवाणी | ६३ |

# संपादकीय



# जब तक सूरज चांद रहेगा साईजी तेरा नाम रहेगा

स. न. वि. वि.

विजयादशमी उर्फ दसरा हा आम्हां हिंदूंचा किती मोलाचा व महत्वाचा शुभ दिवस! साडेतीन मुहूर्तापैकी एक शुभमुहूर्त. इतके याचे महत्व आहे. प्राचीन काळापासून आमचे पूर्वज या दिवसाचे महत्व जाणून कोणत्याही कार्याचा शुभारंभ करण्यासाठी याच दिवसाची निवड करीत असत. असा हा कोणत्याही परिस्थितीवर विजय मिळवून देणारा शुभ दिवस आहे.

... आणि साईभक्तांना तर या दिवसाचे महत्व आगळेच वाटत असते. विजयादशमी म्हणजे बाबांच्या निर्वाणीचा दिवस. मर्त्य देहाचा त्याग करुन श्री साईनाथ, श्री साईबाबा सच्चिदानंद स्वरुपी विलीन झाले तो परम पवित्र दिवस म्हणजे विजया दशमी—दसरा सिमोल्लंघनाचा दिवस.

आज 'त्या' घटनेला सत्तर वर्षे पूर्ण झाली आहेत. मंगळवार १५ ऑक्टोबर १९१८ ते २० ऑक्टोबर १९८८ दरम्यान सत्तर वर्षाचा काळ लोटलेला आहे. श्री बाबांचे चक्षुर्वैदर्शन घेतलेली मंडळी आजही हयात आहेत. ही माणसे मोठी भाग्यवान म्हणायची की त्यांनी हिडते-चालते-फिरते-बोलते बाबा आपल्या डोळ्यांनी पाहिले व नेत्रसूख अनुभवले. पण आज बाबा देहाने नसले तरी आपल्या दिव्यत्वाच्या प्राण रुपाने, आजही आमच्यात वावरत आहेत. भक्तांना तर त्यांचे अस्तित्व पदोपदी जाणवत आहे. ते आम्हाला सोडून जाणार तरी कुठे आणि जातील तरी कसे? भक्तांच्या कल्याणासाठी त्यांनी मानवदेह धारण केला, माणसात वावरले. त्या त्या परीने आपले कार्यपार पाडून ते आमच्या दृष्टीआड देहाने झाले तरी ते आमच्यातच आजही वावरत आहेत. आजही या घटकेला आम्हाला मार्गदर्शन करीत आहेत. संकटप्रसंगी धावत धावत येऊन आम्हाला संकटमुक्त करीत आहेत. त्यांनी आम्हाला देऊन ठेवलेले आश्वासन किती मोलाचे आहे? त्यांनी आश्वासनपूर्वक सांगून ठेवलेले आहे की,

**झालो जरी गतप्राण । वाक्य माझे माना प्रमाण**
**माझी हाडें तुर्बनी मधून । देतील आश्वासन तुम्हांस ॥**

किती खात्रीपूर्वक व अगदी ठासून त्यांनी हे आश्वासन आपल्या भक्तांना देऊन ठेवले आहे बरे? वाक्य माझे माना प्रमाण, माझ्या शब्दांवर संपूर्ण विश्वास ठेवा, ते मी देऊन ठेवलेले वचन आहे. ते कदापी खोटे होणार नाही.

आणि श्री नाथांनी हे पण सांगून ठेवलेले आहे की,

**नित्य मी जिवंत ।**
**जाणा हेंचि सत्य ।**
**नित्य घ्या प्रचित अनुभवे ।**

या त्यांच्या वचनाचा अनुभव त्यांच्यामागे गेली सत्तर वर्षे भक्तांना येतच आहे की नाही!

श्री साईमहाराजांनी आम्हाला कितीतरी बहुमोलाच्या व शाश्वत कल्याणाच्या गोष्टी शिकविल्या. स्वतः आचरण करुन त्या आमच्या गळी उतरविल्या. त्यांनी आम्हाला सर्व धर्मो समानत्व शिकविले. कोणत्याही धर्मात तुमचा जन्म झालेला असेना का, राम, रहिम, बुद्ध, झरतृष्ठ हे एकच आहेत. सारी त्या परमेश्वराची लेकरे आहेत. तुम्ही त्याला कोणत्याही नावाने ओळखा, तो आम्हा सर्वांचा परम पिता आहे. मग आम्ही आमचा धर्म कोणताही असला तरी एकमेकांशी बंधुभावाने वागायला नको का? शिरडीत आज आम्ही वागतो मग देशात कां नाही? या देशाच्या दृष्टीने किती मोलाची शिकवण आहे ही! ती शिकवण त्यांनी जीवनभर अंमलात आणली व आपल्यापुढे त्यांनी एक उच्चतम आदर्श ठेवला. तो सतत गिरविणे, तो अहर्निश आचरणात आणण्यासाठी झटणे, हे श्री बाबांच्या भक्तांचे परम कर्तव्य आहे.

आमच्यातील माणुसकी पार लयाला गेली आहे, हे पाहून त्यांनी आम्हाला माणुसकीने वागण्याचा, साऱ्या भूतलावर दया करण्याचा, जे संकटात सापडले असतील त्यांना संकटमुक्त करण्याचा संदेश दिला. आपण तो झेलीत आहोत का? त्याप्रमाणे दैनंदिन जीवनात आम्ही वागत आहोत का? याचा त्या संदेश दात्याच्या पुण्यतिथीसारख्या प्रसंगी प्रत्येकाने विचार केला पाहिजे. बाबांचे पुण्यस्मरण म्हणजे त्यांच्या उच्च मानवतावादी शिकवणूकीचे स्मरण. परंतु त्या शिकवणूकीचे विस्मरण जर आम्हाला झाले, तर बाबांचे भक्त म्हणवून घेण्यात आपण कुठवर पात्र ठरतो, याचा विचार ज्याचा त्यानेच करावा.

श्रीसाईनाथ महारजांची अनन्य भावे भक्ती म्हणजे रंजल्या गांजलेल्यांसाठी झटण्याची आपली प्रवृत्ती. हिचे महत्व अनन्य साधारण आहे, हे महत्व आपण ओळखले पाहिजे. जो दु:खितांचे दु:ख दरू करण्यासाठी झटतो, जो भुकेलेल्यांना भाकर देतो, जो संकटात सापडलेल्यांना मुक्त करण्यासाठी आपल्या परीने झटतो, तोच बाबांचा खरा भक्त, यालाच म्हणतात सेवा भाव!

**आल्या गेल्याचा आदर करी । तृषितां जल भुकेल्या भाकरी ।**
**उघड्यास वस्त्र बसाया ओसरी । देतां श्रीहरी तुष्टेल ॥**

या दिव्य शब्दाशब्दातून हेच तत्वज्ञान गोवले गेलेले आहे. परोपकार तो हाच. माणुसकी ती हीच. परंतु आपल्यापैकी किती जणांच्या आचरणात हे तत्वज्ञान येत आहे बरे! बाबांची भक्ती म्हणजे भूतमात्राची सेवा. तिचे आचरण ज्या प्रमाणात आमच्याकडून होईल, त्या प्रमाणात आम्ही भगवंताच्या कृपेस पात्र होऊ.

श्रीसाईनाथ महाराजांच्या या परमपवित्र सत्तराव्या पुण्यतिथी दिनी आपण आपल्या आजवरच्या गतकालीन जीवनाचे सिंहावलोकन करुन श्रींनी दाखवून दिलेल्या मार्गाने निदान यापुढील काळात तरी वाटचाल करावयाची, जीवनातील प्रत्येक पाऊल त्याच रोखाने टाकावयाचे असा निर्धार करु या.

**— जय श्रीसाईराम**

# ऐका साई

साई, आम्हां घ्यावे पदरी
आलो आम्ही तुमच्या दारी

घेतो साईनाम मुखी
करावे आमचे जीवन सुखी

साई, तुमचे आम्हीं लेकरूं
सांभाळा आमचे तारूं

आम्हावरी तुमची कृपा रहावी
आम्हावरी दया करावी

श्रध्दा-सबुरी हे दोन पैसे
आम्ही तुमच्या चरणी ठेवतसे

हरुनी संकट - दु:ख अमुचे नेई
आमच्या जीवनी प्रकाश देई
आमची विनंती ही ऐका साई

**- श्री. निलेश गुरूदास कामत**
द्वारा गुरूदास बा. नाईक,
डॉ. ब्रागांझा परेरा रोड,
घर क्र. इ-६९०,
सांतिनेज, पणजी-गोवा.

# श्रीबाबांचे महानिर्वाण हा केवळ आभास!

– प्रा. र. श्री. पुजारी
रमानिवास, ९९२ सदाशिव पेठ,
पुणे–३०.

संत-महात्मे किंवा अवतारी पुरुष यांच्या देहावसानास आपण 'मृत्यू' म्हणत नाही, निर्वाण किंवा महानिर्वाण म्हणतो. लौकिक अर्थाने ते गेले, देहाने ते गेले, मनाने मात्र ते आपणा सर्वांपाशी आहेत, अशी आपली धारणा असते. शास्त्रदृष्ट्या हीच धारणा योग्य आहे. गेला तो नाशवंत देह, अन्यथा आत्मा अविनाशी आहे, असा विचार या मनोधारणेमागे आहे.

श्रीबाबा तर साक्षात् परब्रह्म. परमात्मा. तो परमात्मा नित्य आहे, मुक्त आहे, अविनाशी आहे. मग सत्तर वर्षांपूर्वी सर्वांना शोकाकुल करणारे, निराधार करणारे पोरके करणारे ते काय? ते केवळ श्रीबाबांच्या मर्त्य देहाचे गमन! देह कायमचा गेला, याचे ते दुःख. तो देह पुन्हा पाहावयास मिळणार नाही, याचा तो शोक.

श्रीबाबांनी देहरुपी त्या जीर्ण वस्त्राचा त्याग करुन या विजयादशमीस सत्तर वर्षे पूर्ण झाली. म्हणजे फार मोठा कालखंड मध्ये लोटला, असे आपणास वाटते. परंतु अ-जर, अ-मर, अ-जन्मा प्रभूस त्याचे काय! सत्तर वर्षे म्हणजे त्यांना एका पळाप्रमाणे! निमिषाप्रमाणे! तो सर्व इतिहास एका दृष्टिक्षेपात पाहाणारे ते द्रष्टे! साक्षी!

व्यामोहात सापडलेल्या अर्जुनाला अखेरी भगवान श्रीकृष्ण विश्वदर्शन घडवितात. सर्व विश्व आपणतच कसे सामावले आहे, याची कल्पना देतात. या विश्वाची उत्पत्ती–स्थिती–लय आपल्या हाती कशी आहे, याची ओझरती जाणीव देतात. तेव्हा अर्जुनाच्या ध्यानी येते की, मी 'मारता' आणि हे सर्व योद्धे 'मरते' हा माझा केवळ भ्रम आहे. रणांगणावरील सर्व काही कर्तृत्व आहे, ते साक्षात् श्रीकृष्णदेवांचेच. त्यांच्या इच्छेविना या सृष्टीतील झाडाचे पानसुद्धा हलणार नाही. म्हणून हे सर्व महाभारत हीही त्यांचीच एक महान लीला आहे. त्या लीलेत आपणास स्थान मिळाले, हे आपले परमभाग्य.

श्रीबाबा हे कलियुगातील अवतारी श्रीकृष्णच. त्यांची लीला अनेक पदरी, अनेक सूक्ष्म धागे एकमेकात गुंतलेली, कधी अल्पशी गम्य तर कधी संपूर्ण अगम्य अशीच असणार. त्यांचे सत्यरूप चरित्र या बृहत्लीलेतच गौप्यरुपे वास करीत असणार. जे केवळ जन्मजन्मांतरी त्यांचे झाले, त्यांनाच या दिव्य चरित्राचे मर्म आकळणार. जे कधी आलेही नाहीत आणि गेलेही नाहीत, अशा श्रीबाबांचे महानिर्वाण हाही एक आभासच आहे, याची जाणीव केवळ त्यांनाच असणार. अन्यथा देह गेला की बाबा गेले असेच इतरांना वाटणार.

यत् दृष्टं, तत् नष्टं – जे दृश्यमान म्हणजे इंद्रियगोचर, ते कधी ना कधी नष्ट होणारे श्रीबाबांचे इंद्रियगोचर चरित्र हे या कोटीतील. म्हणजे पुसले जाणारे. कधी

ना कधी विस्मृत होणारे. त्यांचे न पुसले जाणारे चरित्र म्हणजे त्यांचे दिव्यत्व, सर्वसाक्षित्व. दिक्कालाला भेदून जाणारे अनंतत्व म्हणून लौकिक चरित्राच्या सीमारेषा ओलांडून जे श्रीबाबांना भेटतील, त्यांच्याशी एकरूप होऊन जातील, तेच त्यांचे खरे भक्त. अन्यथा तंबोऱ्याची खोळ म्हणजे तंबोराच, असे समजणारे केवळ त्यांच्या पाउलखुणाच जाणणारे. समुद्राच्या लाटांवरील फेस म्हणजेच समुद्र समजणारे. पण ज्ञानी नसले, तरी तेही खरे भक्तच!

सृष्टीच्या महाप्रलयानंतर वटपत्रशयनी असलेल्या परमात्म्याला आपल्या एकटेपणाचा कंटाळा आला. आपल्या योगमायेच्या साहाय्याने त्याने विराट प्रपंचाचा मांड मांडला. एखाद्याने मातीची बाहुली बनवावीत, ती वाळवावीत, रंगवावीत, त्यांना नाचवावे, खेळवावे – असा हा मांड होता. आजही तो तसाच आहे. पण हा खेळ उत्पत्ती – स्थिती – लय यांचा आहे. एक ना एक दिवस या मृत्तिका बाहुल्यांच्या देहांना विराम आहे, बोळवणूक आहे. पण ही बोळवणूक कायमची नाही, तिला 'पुनरागमनायच' हा वरद आशीर्वाद आहे.

जीवमात्र देहाने गेले तरी प्रियजन त्यांना आपल्या मनात घर बांधून देतात. त्यांच्याशी सुखदुःखाच्या, प्रेमाच्या गुजगोष्टी करतात. त्यांच्या उत्तरोत्तर कल्याणाची चिंता वाहतात. श्रीबाबा तर सर्व जीवमात्रांचे पिता. ते पुन्हा त्यांना जन्मास घालतात. त्यांचे कच्चे पाठ पक्के करवून घेतात. त्यांची योग्यता पाहून त्यांना पुढील ज्ञान-भक्तीच्या प्रवासास धाडतात. या प्रवासातही त्यांचे साक्षी होऊन त्यांची सर्वतोपरी चिंता वाहतात.

माती, झाडू, मेण यांच्याप्रमाणे असलेल्या परंतु अंतरंगात इच्छा, वासना, आकांक्षा इत्यादींची स्वयंचलित यंत्रणा असलेल्या मानवबाहुल्या भोवती निर्माण करणे आणि त्यांच्याशी त्यांच्या आत्मोन्नतीचा खेळ खेळणे, हे तर श्रीबाबांचे अनादी कार्य. ते कार्य आपल्या देहावस्थेत शिरडीत बसून त्यांनी साठ वर्षे केले. त्या गोष्टीला आता सत्तर वर्षे होऊन गेली. तरीही त्यांचा हा आवडता खेळ प्रत्येक क्षणी आजही चालू आहे. हजारो-लाखो भक्त त्यांच्या नामाचा अखंड उद्‌घोष करीत आहेत. जणू आज सबंध जगच साईमय होऊन गेले आहे.

श्रीबाबा हे अनादी पुरुष. आपल्या प्रकृती मायेने जे कोणी त्यांचे, त्यांना शरणांगत, त्यांना पुनः पुन्हा काही निमित्ताने ते आपल्या प्रेमछत्राखाली आणीत आहेत. त्यांना त्यांच्या नैसर्गिक कलाप्रमाणे आणि योग्यता पारखून स्वकार्यी गुंतवीत आहेत. तथापि जे आडमुठे, त्यांना मात्र त्यांच्या पायी दोरा घालून चिमण्यांप्रमाणे शिरडीस खेचत आहेत. कधी त्यांच्यापैकी एखाद्यास त्याच्या चार, साठ किंवा बहात्तर जन्मांचा इतिहासही तोंडपाठ म्हणून दाखवीत आहेत!

मानवरुपाने शिरडीत असताना ज्या लीला श्रीबाबांनी केल्या, त्याच लीला आजही श्रीबाबा करीत आहेत. कोणी एखाद्याने पडद्याआड उभे राहून सर्व काही गोष्टी कराव्यात तसाच हा प्रकार आहे. त्यामुळे श्रीबाबा आज देहाने गेले असले,

तरी सत्तेने तेथे वावरत आहेत. कोणाही व्यक्तीस प्रेरण करवून त्याच्याकरवी ते आपले कार्य करीत आहेत. फार काय, स्वप्नामधून, दृष्टांताकरवी किंवा प्रत्यक्ष दर्शन देऊनही भक्तांची सर्व तऱ्हेची मनोगते आजही ते एखाद्या वत्सल मातेप्रमाणे पुरवीत आहेत.

परंतु याहीपेक्षा खात्रीची एक सोय भक्तदर्शनासाठी श्रीबाबांनी चिरंतन स्वरुपात करुन ठेवली आहे, ती म्हणजे हेमाडपंताना प्रेरण करवून लिहवून घेतलेले आपले सत्यरुप चरित्र,'श्रीसाईसच्चरित.' या चरित्रात, लौकिक चरित्राच्या पलिकडे असलेले आपले मोक्षदायी चरित्र ग्रथित करवून भक्तांना जन्मोजन्मी पुरेल,असे मार्गदर्शन त्यामधून प्रत्यक्ष श्रीबाबांनीच हेमाडपंतांकरवी केले आहे. दीपस्तंभाप्रमाणे असलेले हे चरित्र म्हणजे श्रीबाबांचे 'प्रकट गुह्य' असून भक्तांना शेकडो जन्म मार्गदर्शन करणारे आहे.

गेल्या काही वर्षात श्रीक्षेत्र शिरडीचे माहात्म्य अनंत पटींनी वाढले आहे. तेथील दरबार आता विस्तृत झाला आहे. संस्थानचे वैभव दिपवून टाकणारे झाले आहे. भक्तवर्ग लाखोंच्या घरात गेला आहे. याचे कारण भक्तांना येणारी श्रीबाबांच्या वात्सल्याची प्रचिती. श्रीबाबा आजही तेथे कणाकणामध्ये अदृश्य रुपाने भरुन उरले आहेत, ही येणारी अनुभूती.

सरकार म्हणजे नेमके काय हे कधीही कोणास बोट ठेवून दाखविता येत नाही. याचे कारण सरकार दृश्यमान असत नाही. ते सत्तारुप असते. सत्तेची शक्ती अमाप असते. दुर्दम्य असते. जीवांच्या कल्याणासाठी तिचा अवतार असतो. वापर होतो.

राम आणि कृष्ण यांच्याप्रमाणेच श्रीबाबा अवतारी पुरुष. देहाच्या आश्रयाने त्यांनी लौकिक लीला केल्या. आचार-व्यवहार स्वधर्माच्या आचरणाच्या आश्रयाने त्यांनी जन्मभर प्रात्यक्षिक म्हणून शिकविला. आता त्यांची सत्ता वेगवेगळ्या लीला घडवून तेच आत्मोद्धारी लोकशिक्षणाचे कार्य करवीत आहे, अनंत काळ करीत राहाणार आहे.

# चिंतन

– सौ. निर्मला चि. राजे
लिला भुवन,
राजारामपुरी, ७ वी गल्ली,
कोल्हापूर.

मी फार वर्षापासून श्री 'साई'ची भक्त आहे. आपण या उतार वयात भक्ती वाढवावी, अशी मनाला ओढ लागली आहे.

लहान वयापासूनच मला आध्यात्मिक जीवनाची आवड आहे, सतत श्री साईबाबांची भक्ती घडावी, हीच दिर्घ इच्छा. अर्थात् मी भक्ती करते म्हणजे काय करते याचे विवरण मी माझ्या बुद्धीप्रमाणे आज येथे करणार आहे. श्री. बाबांची शिकवण प्रत्यक्ष कृतीत आणण्यासाठी मी सदैव प्रयत्नशील असते.

मी स्वत: संसारी आहे. दैनंदीन व्यवहार करतानाच मी नेमाने रोज श्री साईचरित्रातील एक अध्याय वाचते. त्याशिवाय पंधरावा अध्यायही रोजच वाचते. बाबांचे स्वत: चिंतन करणे, हे माझे मूळ ध्येय आहे. संसारात आजपर्यंत खूपच संकटांना तोंड द्यावे लागले. अजूनही संकटांना तोंड द्यावे लागेल. शरीराला तसेच मनाला डाचणारे अनेक कटू प्रसंग वारंवार उत्पन्न होतात. अशाही परिस्थितीत श्री बाबांचे चिंतन करण्यात मी जराही कुचराई करत नाही. काहीवेळा खूप अवघड वाटते. परंतु माझे प्रयत्न चालूच राहतात. ज्यावेळी एखादा दु:खी मनुष्य भुकेला असतो, त्यावेळी त्याला भाकरीचीच जरूरी असते. ती न देता त्याला उपदेशाचा काय फायदा? त्यावेळी तो दु:खाने खचलेला असतो. त्याला मी तत्वज्ञान समजाऊन सांगण्याचा प्रयत्न योग्य नाही. यासाठी संकट निवारण करण्यासाठी बाबांच्यावर श्रद्धा ठेवून सबुरी धरणे व आपले हीत साधणे हेच खरे.

मी बाबांची भक्ती का करते, तर त्यांच्यावर माझी निस्सिम श्रद्धा आहे. त्यांची भक्ती करण्याने मनाला शांती मिळते. जसजशी ही उपासना वाढत जाईल, तसतशी मनालाही जास्त शांती लाभत जाईल, अशी माझी दृढ श्रद्धा आहे. ज्यावेळी मी बाबांचे श्री साईचरित्र वाचते, त्यावेळी प्रत्येक अध्यायात मला वेगवेगळा पैलू आढळतो. प्रत्येक अध्याय एक वेगळा भाव सांगून जातो. संपूर्ण चरित्र म्हणजे ज्ञानाचा अथांग सागर आहे. आपल्याकडे जे देण्यासारखे आहे, ते द्यावे, लोकांच्या उपयोगी पडावे, अशा अनेक चांगल्या गोष्टी प्रत्येक अध्यायात आहेत. मला असे वाटते की, आपण आपला वेळ चिंतन, मनन निरुपण करण्यात घालवला, कोणाशीही कोणत्याही प्रकारचा तार्कीक वादविवाद करण्याच्या भरीला न पडता बाबांचे चिंतन व मनन करण्यात घालविला, तर वेळेचा सदुपयोग ठरेल. आपण बाबांची भक्ती वाढवू लागलो, तर आपणास दुसऱ्याचे दु:ख पाहून दु:ख होईल, दुर्बलावर दया करावी, अशी इच्छा होईल. तसेच सर्वांशी स्नेहाने व परोपकार बुद्धीने वागावयाची इच्छा होईल.

या भक्ती करण्यापायी देहाला कष्ट सोसण्याची तयारी ठेवावी लागेल. बाबांचा दास आहे, असे धरुन दास्यत्वाचे रक्षण करुन बाबानाच आपला परमेश्वर मानून सतत भक्ती वाढवावी. त्या योगे आपल्या ठिकाणी क्रोधाचा लवलेश व मानसिक संताप कधीही वास करणार नाही.

सर्व लोकांशी नेहमी समत्व बुद्धीने, सरळ वागण्यामुळे सर्वांना प्रिय होणे, सत्य भाषण करुन सारासार विवेक धारण करणे, तीनही वाणीने म्हणजे (प्रशांती, मध्यमा व वैखरी) जो असत्याला स्पर्श करत नाही, असा सर्व श्रेष्ठ बाबांचा भक्त त्रिवार धन्य होय.

तारुण्यात वैराग्याने राहणे म्हणजे विषय विलास भोगण्याचा व उन्मतपणाचा काळ असूनही वैराग्य प्राप्त होणे, ऐश्वर्य किंवा अधिकार प्राप्त झाले नाही, तरी खंत न बाळगता त्यांच्याबद्दल संकल्पही न करणे, बाबांच्यावर दृढ श्रद्धा असणे, बाबांच्या भक्तीचा एकदा मार्ग स्वीकारल्यावर वाटेल तो आघात झाला, तरी आपल्या श्रद्धेच्या मार्गापासून विचलीत न होणे, म्हणजेच खरी भक्ती होय.

आपल्या मनात कोणत्याही गोष्टीबद्दल आशा अथवा निराशा शिल्लक ठेवावयाची नाही. या जगात कोणाच्याही प्रेमपाशात अडकून रहावयाचे नाही. जन्माला आल्यामुळेच केवळ नात्याचे व विवाह बंधनामुळे कुटुंबाचे संबंध आहेत, हे जाणणे. मोह न ठेवणे, काही मिळवावयाचे नसल्यामुळे कशाबद्दलही वासना शिल्लक न ठेवणे, अशा आचरणाने मनाला भक्ती करण्याची आस वाटू लागेल. जो नेहमी खरे बोलतो व त्याप्रमाणे वागतो, तोच खरा. नुसती शाब्दीक व ज्ञानाची वायफळ बडबड तो करत नाही.

भक्ती करताना, भावी दु:खाचे व संकटाचे विचार ठेवू नयेत. पुढे काय होणार, हे कोणीही सांगू शकत नाही. तर्काने अथवा शास्त्रीय ज्ञानाने सांगितलेले भविष्य हे श्री बाबांच्या किमयेपुढे अपुरे आहे. बाबांच्या कृपेने वाटेल ते घडू शकते, यावर विश्वास ठेवणे जरुर आहे. पुढे दु:खाचे प्रसंग येणार म्हणून आजच शोक किंवा काळजी करीत बसणे, योग्य नव्हे. बाबांच्या अतर्क शक्तीवर श्रद्धा ठेवून त्यांचे सतत स्मरण करणे, हेच खरे.

दु:खाच्या कल्पना या देहाच्या आसक्तीमुळे निर्माण होतात. कल्पनांचा ध्यासच मूर्त स्वरुपाचा येतो. म्हणून बाबांच्या कृपेने प्राप्त झालेल्या विवेकाचे साध्य घेऊन देहाच्या ठिकाणी असलेल्या आसक्तीचा त्याग करावा. आसक्तीला देह हा निमित्तमात्र आहे, त्याचे सुखदु:ख खरे नाही.

शेवटी मला असे वाटते की, या जगात पूर्ण सुखी असा कोण आहे कां? सर्व दृष्टीने विचार केला, तर असे आढळते की, या अपूर्ण जगात सर्वच अपूर्ण आहे. परमेश्वराने प्रत्येक ठिकाणी काहीतरी उणेपणा ठेवला आहे. फक्त माझ्यामते बाबाच पूर्ण आहेत, हे माझे वैयक्तीक मत आहे. ते देहाने निमित्तमात्र वावरत होते, पण अंतरंगाने परमेश्वराशी एकरुप होते, असे संत पुरुष श्री साईबाबाच पूर्ण आहेत.

श्री साईबाबांची आपणाला अशी शिकवण आहे की आपण सत्याची कास कधीही सोडू नये. सत्य बोलण्यासाठी व सत्कृत्य करण्यासाठी सतत झटावे. आपले व लोकांचे शाश्वत असे आत्मकल्याण करावयाचे असेल, तर अप्रिय असले तरी सत्य बोलले पाहिजे. सत्य एकच असले तरी प्रत्येकाची पाहण्याची दृष्टी त्याच्या त्याच्या प्रकृतीप्रमाणे व स्वभावाप्रमाणे वेगवेगळी असते. जे आपणास खूप प्रयत्न करून व सत्य बोलून मिळाले नाही, ते मिळविण्याचा प्रयत्न करणे व जे मिळाले आहे, ते राखण्याचा प्रयत्न करणे, जे राखले आहे ते चांगल्या तऱ्हेने वाढविण्याचा प्रयत्न करणे व जे चांगल्या तऱ्हेने वाढविले आहे, त्यांचा योग्य ठिकाणीच विनियोग करणे रास्त ठरेल.

आपण या जगात सत्याचा अधारादर जी कृत्ये करतो, त्या सर्व कृत्यांना श्री साई बाबांचे आशीर्वाद असतात. आपण आपल्या जीवनाचा पाया सत्यावरच उभारला पाहिजे कारण अंतीम सत्य हेच विजयी होते.

अशा तऱ्हेने माझी 'साई भक्ती' खूप वाढावी, हीच श्री साईचरणी प्रार्थना आहे.

## साई धन्य संत महान

नक्षीदार सिंहासन
त्याला शोभिवंत कमान
वरी साई झाले विराजमान
अति प्रसन्न करूनी वदन
सर्वत्र फिरवती नयन
सकल करिती त्यांसी नमन
त्यांसी ते करिती अभिवादन
मग सर्वांची चौकशी करुन
प्रत्येकाचे करीती समाधान
अति संतोषोनी अखीलजन
गाऊ लागले साईंचे गुणगान
रमाकांत नतमस्तक होऊन
म्हणे साई धन्य संत महान

**— श्री. रमाकांत वामन करंबेळकर**
रघुनाथ निवास, चेंबूर,
मुं. नं. ४०० ०७१.

# मोक्षप्राप्ती

– सौ. उषाताई अधिकारी
सावित्री सदन, बंदर रोड,
मु. पो. रत्नागिरी.

श्री साईबाबा प्रथम शिरडीत आले आणि त्यांनी तेथेच कायमचे वास्तव्य केले, तेव्हा गावातील काही लोक त्यांची निंदा-नालस्ती करीत. सगळेच लोक सारखे नसतात. गावात असे वाईट लोक होते, तसेच म्हाळसापती, काशीराम शिंपी, माधवराव देशपांडे व गावकामगार केशव अनंत कुळकर्णी उर्फ अप्पा कुळकर्णी अशी सुजाण व माणुसकी असलेली माणसेही होती. म्हाळसापती, काशीराम, माधवराव देशपांडे हे नित्य श्रीबाबांच्या सेवेत असत. गावकामगार अप्पा कुळकर्णी यांना नित्य सेवेत राहाता येत नसे त्यामुळे त्यांना वाईट वाटे. त्यांनी श्रीबाबांना प्रथम पाहिले, तेव्हाच ही मूर्ती सामान्य नाही, हे त्यांना कळून चुकले होते. श्रीबाबांचे सहजी घडलेले चमत्कार पाहून त्यांची श्रीबाबांवर पूर्ण श्रद्धा बसली होती. वरवर वेड पांघरणारी ही व्यक्ती अंतरी अनंत कळांनी भरलेली आहे, हे स्वानुभवाने पटले होते. दिवसेंदिवस श्रीसाईचरणी त्यांचा भाव वाढतच होता. आपले हित-अनहित कशात आहे, हे तेच फक्त जाणू शकतात, तेच आपले परमेश्वर आहेत, अशी मनाची समजूत होऊन ते नित्य साईस्मरणात रंगून गेलेले असत. त्यांची ही सात्त्विक, शुद्ध भक्ती श्रीबाबा जाणून होते. त्यामुळे त्यांचे अप्पांवर खूप प्रेम होते. बाबा अनेक वेळा रागावत, शिव्याही देत पण अप्पा कुळकर्णीवर मात्र ते कधीच रागावत नसत. उलट ते अप्पांची मोठ्या प्रेमाने चौकशी करीत. एकदा अप्पावर मोठे संकट आले. दप्तरी कामात काहीतरी चुकी झाली. अप्पा लबाड आहे, तो खोटे बोलतो, त्याने पैसेही खाल्ले आहेत, अशी लोकांत कुजबूज सुरु झाली. त्यावेळी इंग्रजांचे राज्य असल्याने इंग्रज राजाच्या कानावर ह्या गोष्टी जाणार, सरकार अप्पाला नोकरीवरुन तर काढणारच शिवाय कठोर शिक्षाही करणार, असे लोक बोलू लागले बिचारा अप्पा फार घाबरुन गेला. त्यातच प्रांतसाहेबांनी त्यांना 'जबाबास त्वरित यावे' असा हुकूम पाठविला. हुकूम हातात पडताच अप्पाचे धाबे दणाणले. आता प्रांतसाहेबांकडे जाऊन जबाब देऊन मी शिरडीला कसला परत येतो? माझ्या पत्नीचे, मुलाबाळांचे काय? नोकरी जाणारच – शिवाय प्रांतसाहेब मला नक्कीच कठोर शिक्षा करणार. ते शिस्तीचे, स्वतः शुद्ध आचरणाचे व कडक आहेत, असे समजते. काय करावे? गेले तर पाहिजेच. जाऊया, पण जाण्यापूर्वी आपल्या श्रीबाबांना वंदन करुन त्यांचे आशीर्वाद घेऊन जाऊया. या संकटातून आपल्याला तारुन नेणारा त्यांचेशिवाय कोण आहे? अप्पा द्वारकामाईत आले. श्रीबाबांच्या चरणी लोळण घेऊन भरल्या कंठाने ते म्हणाले, "बाबा, तुम्ही सत्पुरुष आहांत. साक्षात् श्रीनिवास आहांत. काळाला शासन करण्याचे सामर्थ्य केवळ तुमच्यातच आहे. माझ्यावर उगीच आफत आली आहे. बाबा, मी खोटे बोलत नाही. मी लबाड नाही. खरोखरच एक पैसाही खाल्ला

नाही. मी माझ्या परीने दप्तर चोख ठेवले आहे, हे फक्त आपणच जाणाल. बाबा आपण त्रिकालज्ञ आहांत. माझी अब्रू राखा हो. अब्रू राखा." अप्पा घळघळून रडत श्रीबाबांच्या पायाला पुन्हा पुन्हा मिठी मारु लागला आणि म्हणू लागला, "बाबा, माझे काही बरेवाईट झाले तर आपलेच नाव जाईल. जवळ प्रत्यक्ष कुबेर असताना दारोदार भिक्षेसाठी कां फिरावे? क्षीर सागर सोडून ओहळाकडे का जावे? मला एक आपल्याच पायांचा आधार. माझे आई-बाप सर्व काही तुम्हीच आहांत. एवढे माझे संकट निवारा बाबा. लोक मला तुमचा कल्याण म्हणतात. त्या तुमच्या कल्याणाची ही काय अवस्था? कामधेनूच्या पोरांनी अन्य स्तनी कां लागावे? कल्पवृक्षाच्या फळांनी काट्यात का पडावे? बाबा, तुम्ही मला आपला म्हटलंय. माझेवर कृपा करुन या गलिच्छ आरोपातून मला मुक्त करा. नाहीतर माझी निंदा होईलच, पण माझ्याबरोबर आपलीही निंदा होईल. बाबा, कृपा करा. अप्पाचे हे हृदयस्पर्शी बोल ऐकून श्रीबाबांचे मन द्रवले. ते अप्पाला म्हणाले, "अप्पा घाबरु नकोस. सांप्रत प्रवरा नदीकाठी नेवाशाला प्रांताची स्वारी आहे. तेथे तू खुशाल जा. तेथे जगाचा सूत्रधार जो भगवान विष्णू तो मोहिनीराजाच्या रुपाने उभा आहे. ज्याने दशावतार घेतले, जो अल्ला आहे, इसाही आहे तोच मूढ लोकांच्या उद्धारार्थ सगुण रुपात तेथे अवतरला आहे. तेव्हा तू नेवाशाला जा. मोहिनीराजाला नमस्कार कर आणि मनात कसलाही किंतु न बाळगता साहेबापुढे हजर हो. जे काही असेल ते खरे खरे सांगून टाक. तोच तुझी पाठ राखील. प्रांतसाहेबही चांगला माणूस आहे. लबाड नाही. शिस्तीचा आहे. तसा असल्याशिवाय राज्य नीट कसे चालेल? तेव्हा भिऊ नकोस. जा. मी तुझ्या पाठीशी आहे. ह्या आरोपातून तू नक्कीच निष्कलंकपणे सुटशील. तुझे काहीही वाईट होणार नाही."

श्रीबाबांचे अभयसूचक शब्द ऐकून अप्पाचे गेलेले अवसान परत आले. ते शांतमनाने, निर्भयपणे नेवाशाला गेले. श्रीबाबांच्या सांगण्याप्रमाणे मोहिनीराजाला साष्टांग प्रणिपात करुन श्रीबाबांचे स्मरण करीत ते प्रांतसाहेबांच्या कचेरीत गेले सगळी कागदपत्रे दाखवून त्यांनी योग्य तो जबाब दिला. तो जबाब ऐकून व सर्व कागदपत्रे पाहून अप्पा कुळकर्णी लबाड तर नाहीच, उलट त्याने सर्व कागदपत्रे चोख ठेवली आहेत, पैसे खाल्ले नाहीत, अशी प्रांतसाहेबांची खात्री पटली. त्यांनी अप्पाला निर्दोष सोडून दिले. आपण ह्या अनाहूत आलेल्या संकटातून सहिसलामत व पुन्हा मानाने सुटलो, ही सर्व साईकृपा आहे, हे जाणून अप्पांचे मन भरुन आले. ते अक्षरशः नाचू लागले. दुसरे दिवशी शिरडीत येऊन श्रीसाईचरणी वंदन करुन त्यांनी सर्व हकीगत श्रीबाबांना सांगितली. तेव्हा स्वतःकडे अजिबात मोठेपणा न घेता श्रीबाबा एवढेच म्हणाले, "अरे अप्पा, कर्ता करविता तो एक परमेश्वर आहे. भक्तांसाठी तो जे घडणार नाही, ते घडवीत असतो. आपली भक्ती मात्र तेवढी तीव्र पाहिजे. जा आता घरी. बायकामुले वाट पहात असतील. त्यांना ही आनंददायी खबर दे. जा सुखात राहा. अल्ला तुझे भलेच करील!"

पुढे कित्येक दिवस गेले. अप्पा सुखात राहात होता. मनापासून श्रीबाबांची भक्ती करीत होता. जमेल तशी सेवा करीत होता. एकदा अशीच तो सेवा करीत असताना श्रीबाबा म्हणाले, "अप्पा, आज आपल्या गावात चोरटे आले आहेत. त्यांचा धन संपत्तीवर किंवा घरादारावर डोळा नसतो, मुख्य मालावर त्यांची नजर असते. तो हरण करुन ते निघून जातात. त्यांची तऱ्हाच निराळी असते. ही चोरी करताना ते कुणालाही दिसत नाहीत, इतके ते बिलंदर आहेत. त्यांची पहिली स्वारी तुझ्यावरच होईल, तेव्हा नीट बंदोबस्ताने राहा. बिचारा अप्पा! त्याला यातला काही बोधच झाला नाही. त्याने घरी जाऊन आपल्या घराभोवती भिल्लांचा पहारा बसवला. गल्लोगल्ली गस्तही चालू झाली. मध्यरात्र झाली मात्र, ठणठणीत प्रकृती असलेल्या अप्पाला उलट्या जुलाब होऊ लागले. त्यामुळे तो हैराण झाला. हळूहळू शरीर गार पडू लागले. नाक वाकडे होऊ लागले. इतकेच नव्हे, तर नाडीही मंद मंद चालू लागली. शेजारी पाजारी घाबरले. बिचारी अप्पाची बायको धाय मोकलून रडू लागली. इतक्यात तिला श्रीबाबांची आठवण झाली. या अरिष्टातून वाचवणारे श्रीबाबांशिवाय कोण आहे, या विचाराने ती सरळ धावत द्वारकामाईत आली. श्रीबाबांचे पाय घट्ट धरुन रडत रडत त्यांना ती म्हणाली, "बाबा, माझ्या पतीदेवांची स्थिती अगदी बिकट झालीय हो. उलट्या जुलाब थांबत नाहीत. नाडी पण मंद वाहातेय. बाबा तुम्ही आमचे परमेश्वर. आहात. तुमची ती संजीवनी उदी आणि आशीर्वाद द्या. म्हणजे त्यांच्या दुखण्याला उतार पडून ते बरे होतील. देता नां बाबा? द्या हो. माझं सौभाग्य सांभाळा बाबा." त्यावर शांतचित्ताने श्रीबाबा म्हणाले, "आये, शोक करु नकोस. जो जन्माला आला, त्याला एक ना एक दिवस मृत्यू येणारच आहे. जन्म-मृत्यू ईश्वरी कळा आहेत. ईश्वरच सर्व ठायी भरुन राहिला आहे. कोणी जन्मत नाही. कुणी मरत नाही. तू ज्ञानचक्षूनी पहा. तू ही त्यापासून निराळी नाहीस. बंडी जीर्ण झाल्यावर लोक फेकून देतात किंवा आवडत नाही म्हणून तिचा त्याग करतात, तसेच हे शरीर रुपी वस्त्र प्राण पांघरतो, तो प्राण म्हणजेच अक्षय, अभंग, निर्विकल्प असा नारायण आहे. म्हणून तू अप्पाच्या जाण्याआड येऊ नकोस. अप्पा माझ्या आधीच आपली कफनी बदलतो आहे, पण त्यातच त्याचे कल्याण आहे. हे फक्त मला ठाऊक. तुला त्यातले काय कळणार? त्याला सद्‌गती मिळणार आहे. त्याच्या मोक्षप्राप्तीच्या आड येऊन तूं काय साधणार आहेस? अप्पा जन्ममृत्यूच्या दुष्ट चक्रातून सुटला याचे तू समाधान मान. जो बाळ, अल्लामिया तुझे व पोरांचे रक्षण करील." बिचारी अप्पाची पत्नी! ती मुकाट्याने घरी आली, तो अप्पाची प्राणज्योत मावळली. तिचा तो पतीच असल्याने तिला फार दुःख झाले. पण श्रीसाई कृपेने तिला जी ज्ञानदृष्टी प्राप्त झाली, त्यामुळे तिला आपल्या दुःखाला वेळीच आवर घालता आला आणि त्यामुळे तिचे पुढील आयुष्य साई सेवेत आणि नामस्मरणात समाधानाने गेले.

(संतकवि श्रीदासगणू महाराजांच्या 'अध्यायत्रयी' या पुस्तकाच्या आधारे)

# दसरा – सोन्याचा दिवस
# श्रीबाबांचे महानिर्वाण!

**– सौ. मंगला सु. वैद्य**
१३ टीचर्स कॉलनी,
झाबुआ (म. प्र.) ४५७६६१.

'दसरा' म्हणजे सोन्याचा दिवस. त्याचे नाव घेतल्याबरोबरच मनात गोड-गोड अशा भावना दरवळू लागतात. त्या गोडव्यातही अनोखी आर्तता असते, निशीगंधाच्या सुगंधात असते तशी. कारण ह्या ३।। मुहूर्तातील एक मानल्या गेलेल्या दसऱ्यासच श्रीसाई बाबांनी देह धरार्पण केला होता. शके अठराशे चाळीसात बाबांचे निर्वाण झाले. निर्वाण म्हणजे जे बाबा व्यक्त देह रूपात होते,ते अव्यक्त झाले यथा:

"देह धारणे होते व्यक्त। देह त्यागे पावले अव्यक्त।
जरी एकांग अवतार समाप्त। सर्वांग सुव्यक्त लाधले।।
जया न धर्माधर्म बंधन। जहाले सकल बंधोपशमन।
जयाचे प्राणास नाही उत्क्रमण। तयास निर्याण ते काय।।

साधारण माणसास 'मरण' हे भयानक वाटते व त्याचे नांव किंवा त्याच संदर्भही अपशकून सूचक वाटते. परंतु संतास –

"न जिजीविषुवत किंचित् न मुमुर्षुवद आचरन्
जीवितं मरणश्चैव नाभिनन्दन् न च द्विषन।। शान्तिपर्व।।"

ह्याप्रमाणे जन्म आणि मृत्यू ह्यात भेद वाटत नाही. संत सज्जन मृत्यूस ईश्वर भेटीचा मार्ग समजतात. तरीच बाबा मरणाचे वेळी प्रसन्न चित्त होते व त्यांनी सहज कोठे गासाला जावे,तसा ह्या जगाचा आनंदाने निरोप घेतला. त्या वेळी बाबांस विनोद टत असला पाहिजे कारण **ज्या माया मोहापासून भक्तांस परावृत्त करण्यासाठी बांनी देह धारण केला, त्याच देहावर भक्त माया करु लागले व त्याच देहाचा मोह भक्तांना पडू लागला, आणि म्हणून या मायामोहास दूर करण्यासाठीच जणू बाबांनी देह त्याग करुन, अव्यक्त होऊन प्रत्येक भक्ताच्या मनात निवास केला.** बाबांनी देहधारी असताना भक्त कल्याण केले व आजही ते अव्यक्त राहून भक्त कल्याणच करीत आहेत. भक्तांच्या सकल मनोकामना त्यांनी पूर्ण केल्या, पण त्या मनोकामना कोणत्या स्वरूपाच्या असाव्या,हे त्या भक्तावरच निर्भर आहे. कारण ज्यांनी ऐहिक शान्ति व भौत्तिक सुख मागितले,त्यांना ते मिळाले व ज्यांनी परमार्थ व मोक्ष मागितला त्यांचे ते मनोरथ पूर्ण झाले. अशा प्रकारे आमचे हित किंवा अहित हे आम्हीच केले. कारण –

दुग्धे भरली धेनूची कास। भाग्यवानास लाभे गोरस।
कासे पासीच गोचिडा वास। अशुध्दचि कर्मास तयाच्या।। १५४।।

दुर्दरा कमल कंदा शेजार। लुटी कमल मकरंद भ्रमर।
दुर्दैवी दर्दुरा पंकाचा अहार। दैवास पार न भ्रमराच्या ॥ १५५॥
(श्री साईसच्चरित – अध्याय ४१)

आजही आपण भौतिक सुखसाधनांसाठी व ऐहिक सुखासाठी बाबांची भक्ती करतो व ते मिळाल्यावर समाधान मानतो आणि 'एक साधारण माणूस' ह्या नात्याने ते अगदी स्वाभाविक आहे.तरीही श्री रामदास स्वामींच्या म्हणण्याप्रमाणे 'नेटका प्रपंच' करूनही परमार्थ साधूया आणि आम्हा सर्वांस सुमार्गावर ठेवा,अशी बाबांच्या चरणी प्रार्थना करू या.

# महानिर्वाणातून एकात्मता

– सौ. उषा प्रभाकर मु
१६० नारायण पेठ, पेटकर वाडा,
पुणे–३०.

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदा SS त्मानं सृजाम्यहम् ॥

ज्या वेळी धर्माचा ऱ्हास होतो आणि अधर्म माजतो,त्या वेळी युग प्रयोजन रुपी विश्वनाथाचा रथ ज्यांच्या प्रचंड अध्यात्मिक बळावर ओढला जातो, असे महा मानव भगवंताच्या इच्छेने अवतरत असतात.

जड जीवांचा उद्धार भोळ्या भाबड्या भक्तांचे दैन्य दुःख निवारण शरणागतांचे संकट हरण अहंकारी मानवाचे गर्व हरण अशा बहुविध लीला या श्रेष्ठ अवतारी महात्म्यांच्या हातून घडत असतात. हे सत्पुरुष सर्व सामान्यांसारखे दिसत,भासत असतात. पण त्यांच्या माध्यमातून ती अनंत विश्वव्यापी शक्तीच लोक कल्याण विश्वशांती प्रित्यर्थ कार्य करीत असते.

अशा विश्वोद्वारा करिता झालेल्या अर्चित शक्ती प्रतापी अवतारात श्री साईनाथ महाराज यांची गणना होते. समाधीकाल (शके १८४०) दि. १५ ऑक्टोबर १९१८, तो दुःखाचा शिर्डीतील भक्तांवर आलेला प्रसंग.भोळ्या भाविकांच्या द्वारकामाईत प्राणापेक्षाही प्रिय असलेला अमोल ठेवा,प्रसन्न मूर्ति आज अचेतन झाली होती. दि. ३ ऑक्टोबर पासून श्री साईबाबा सर्दी तापाने अस्वस्थ झाले होते.

दि. १४ ला त्यांना दुखण्याचा बराच त्रास झाला. त्यानंतर दि. १५,मंगळवार नित्याप्रमाणे बहिर्दिशेला जाऊन तोंड-हात-पाय धुवून धुनि प्रज्वलित करून खांबास टेकून ते बसले. नित्याप्रमाणे ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगितल्या. त्यानंतर आरतीची तयारी लवकर करण्यास सांगितले. श्री बापूसाहेब जोग व सौ. जोग यांनी नैवेद्य

अर्पण करुन आरती केली. त्यानंतर सर्व भक्तांस दिक्षित वाड्यात भोजनास जावे, अशी आज्ञा श्री साईबाबांनी केली. सर्वांना उभे राहून तीर्थ व उदी लावली. मंडळी गेल्यावर श्रीसाईबाबा खाली गादीवर बसले. त्या वेळेस १॥ वाजला होता. श्री साईबाबांनी महादू फासले यास विडा पाहिजे म्हणून सांगितले. त्याने विडा कुटून श्री साईबाबांच्या हातावर दिला व चांदीच्या झारीने पाणी दिले. श्री साईनी एक एक घोट पाणी घेण्याचा प्रयत्न केला. परंतु अर्धा घोट तोंडातून बोहर आला. तेव्हा अर्धोन्मिलित नयन झाले. श्री साईबाबांनी आपले अंग पाठीमागे बयाजी पाटील यांच्या अंगावर टेकून लक्ष्मीबाई शिंदे यांना नऊ रुपये दिले (नवविधा भक्ती प्रिय आहे, हे सुचविले). पारमार्थिक, दान-धर्म अंत:काली व्हावा, हेही सूचित केले.

त्यावेळी श्री साईबाबांच्या जवळ १) बयाजी पाटील कोते २) भागूजी शिंदे ३) लक्ष्मीबाई शिंदे ४) महादू फासले हे होते. दिक्षित वाड्यात ही बातमी समजली. डॉ. पिल्ले यांनी नाडी पाहिली. त्यांना समजून चुकले की, शिर्डीचा आत्मा ब्रह्मात विलीन झाला.

त्या नंतर हिंदु मुस्लिम वाद सुरु झाला. श्री. दासगणूला पंढरपुरला स्वप्न पडले. शिर्डीला लवकर ये, न्याय निवाडा कर. श्री साईबाबा म्हणत होते, आपण बुटींच्या वाड्यात बसू, खेळू. त्याप्रमाणे सर्व भक्त आप्पा कोते, माधवराव देशपांडे, काकासाहेब दिक्षित राहात्याचे खुशाल चंद सेठ, दौलतराम सेठ, मोरेश्वर प्रधान यांच्या समोर बापुसाहेब बुटीने हात जोडून विनंती केली व श्री साईबाबांना वाड्यात आणावे (समाधी करिता), या वाड्यावर मी हक्क दाखविणार नाही, हे माझे वचन तुळशीपत्र घेऊन पुरे करीन, या सर्व गोष्टी तात्या पाटील कोते यांना कळविल्या. ते आजारी होते. त्यांनी रामचंद्र पाटील (पोलिस पाटील) यांना विनंती केली की, श्री साईबाबांना वाड्यात घेऊन जाण्याचे प्रयत्न करा.

बहुसंख्येने (हिंदूंच्या) श्री साईबाबांना समाधी करिता वाड्यात नेण्याचे ठरले. यावेळी मुस्लीम बंधुनेही पालखीस खांदा देण्याचे ठरविले. ती पद्धत आजही शेर्डीत दिसून येते.

आजच्या अस्थिर वातावरणातही शिर्डी क्षेत्रामध्ये सर्व समाज भेदा भेद, स्पृश्य-अस्पृश्य या भावना विसरून समानतेने श्री. साईबाबांच्या पुढे नत मस्तक होत आहे. श्री साईबाबांनी आपल्या हयातीत हीच एकरुपता एकात्मता अखंड ठेवली होती. समाजरुपी विशाल वृक्षाला एकात्मतेचा संदेश ते देत होते. या संतांमध्ये केवढी ही अगाध शक्ती होती की, त्या शक्तीने आजही अथांग विराट समाज एकरुप होऊन श्री साईबाबांच्या पुढे नत मस्तक होत आहेत.

यालाच म्हणावे महानिर्वाणांतूनही एकात्मता.

स्वयं प्रकाश श्री साईनाथ ।<br>
अवतरले भक्त कल्याणार्थ ॥

(कै. बाप्पाजी रत्नपारखी (शिर्डी) यांनी दिलेली माहिती) च्या आधारे.

# श्रीसाई महानिर्वाणाचा अर्थ

— डॉ. सुमन खानविलकर
सीताकुंज, बॉंबे-पूना रोड,
लोणावळा.

चैतन्य शाश्वतः शान्तो। व्योमा ती तो निरंजन
नादबिंदुकलातीतस्तमै। श्री गुरवे नमः

श्रीकृष्ण निजधामाला जायच्या आधी गावाबाहेर एकांतासाठी गेले, तर आपल्या साईनाथांनी सर्वांना जेवायला पाठवून गर्दी कमी केली.

अहो, या जगात किती तऱ्हांनी माणसे मरतात, अगदी मुंग्यांसारखी चिरडतात. माशासारखी पाण्यात तरंगतात, बोटीच्या बोटी जलसमाधी घेतात, गाड्या उलटतात, हजारो माणसे अपघाती मरतात, नाना तऱ्हेच्या रोगांच्या साथीने मरतात. म्हणून कोणी त्यांच्या समाधी बांधत नाहीत, की त्यांच्या देह सोडण्याला कोणी महानिर्वाण म्हणत नाही. ती पण माणसेच नी हे संत पण माणसेच ना?

मग असे कां बरे? कारण ते नारायण आहेत व आपण नर आहोत ते जगाच्या उद्धारासाठी आलेले असतात तर आपण आपली प्रारब्ध कर्मे संपवण्यासाठी आलेले असतो. ते देहासक्ती विरहित तर आपण मात्र देहाच्या आसक्तीत रममाण, त्यां संधान सतत शिवस्वरुपात गुंग असते तर आपले संसार नि मायामोहात गुंतलेल असते.

म्हणून त्यांचे जाणे येणे हे मानवांना समजण्यापलिकडचे असते. यामुळेच संतांची योग्यता लवकर कळत नाही नि कळू लागते, तेव्हा त्यांची जाण्याची तयारी झालेली असते. ज्यांना जन्मच नाही त्यांना मरण कोठून! म्हणून त्यांच्या देह सोडण्याला निर्वाण म्हणतात.

आता आपण महानिर्वाण याचा अर्थ समजावून घेऊ या—

**महानिर्वाणः-** एक बिंदू सागरामध्ये विलीन होणे, घटाकाशातून मठाकाशात विलीन होणे, जीव दशेतून शिवदशेत जाणे, असत्यातून सत्यात विलीन होणे.

**निर्वाणः-** ज्या ठिकाणी कशा प्रकारचीही न्यून्यता नाही, ऐश्वर्ययुक्त व्यापकत्त्वात विलीन होणे.

**वाणः-** यश, श्रीलक्ष्मी, वैराग्य, ज्ञान, ऐश्वर्य या षटकाला वाण असे म्हणतात. याला जो धारण करतो, त्याला भगवान म्हणतात.

असा हा अनंत महाअनंतामध्ये विलीन होण्यासाठी उठून ध्यानस्थ बसला. भक्तांना मात्र आजारपणाचे दृश्य दाखवून फसविले.

त्यावेळी क्षणभर पूर्ण शांतता निर्माण झाली. कारण सर्व देवांनी आपापली कामे सोडून आकाशात गर्दी केली. हा अनंत अनंतात विलीन होणार नि मग याला संतरूपात पाहता येणार नाही. असा निर्वाणाचा सोहळा द्वापारयुगात द्वारकेत पाहिला

होता. पंचतत्त्वे स्तब्ध झाली..आपण चुकलो, या पवित्र देहातून निघालो, वाईट वाटले पण करणार काय? अनंताने अनंतात विलीन व्हायचेच ठरवले होते. दोन वर्षापूर्वी दसऱ्याच्या दिवशी त्याची कृती करून दाखविली होती. भक्तांना पण नाथांचा खेळ कसा कळावा मानवाला.

अहो बाबांनी दसरा विजया दशमी हा दिवस का निवडला असावा असे नेहमी वाटे. पण एक दिवस विचार करता करता पुढील गोष्टी लक्षात आल्या. देवीने असूर प्रवृत्तीचा नाश केला व विजय मिळविला.तद्वत बाबांनी आपल्या सर्व भक्तांच्या त्रिविध तापाचा नाश करण्यासाठी व सुख प्राप्त करून देण्यासाठी या शुभ दिवसाची निवड केली. यावेळी शुक्ल पक्षात हा विशिष्ट दिवस आलेला होता. कारण बाबांच्या महानिर्वाणाला ७० वर्षे पूर्ण झाली,परंतु बाबांनी आतापर्यंत एकाही निःस्सीम भक्ताला निराश केले नाही, हीच मोठी ग्वाही आहे संतश्रेष्ठत्वाची.

"गंगा पापम्, शशीतापम्, दैन्यकल्पतरू तथा" या प्रकारे महानिर्वाणापूर्वी व आता या ७० वर्षात हेच कार्य केले व असेच युगे न युगे करणार.आपल्या भक्ताचे विघ्न परिहरण करण्यासाठीच हा शुभ दिवस निवडला.

पाप, ताप, दैन्य, हंती संतोः महाशयः

आता आणखी एक गंमत सांगते हं. बाबांचे निर्वाण एकादशी तिथी सुरू झाल्यावर झाले. अर्थात एक स्थितवृत्ती नाम एकादशी ही त्यांची चित्तवृत्ती अनंतात एकरूप झाली. कारण बाबा हे अगोदरच सांगत होते, सबका मालिक एक आहे अर्थात साईंनी शिव दोन नाहीत,हे या दिवशी अनंतात विलीन होऊन दाखवून दिले. साई १ शिव १ बरोबर अकरा झाले. म्हणून ती वेळ बाबांनी साधली. १२ नंतरची वेळ निर्वाणाची.

त्यावेळी घंटा नाद व्हायला नि बाबा पंचतत्त्वात विलीन व्हायला एकच गाठ पडली याचे कारण सुध्दा किती उपदेशकारक आहे पहा. ती जणू सांगत होती बाबांचे मनोगत, अरे बाबांनो वाईट वाटून घेऊ नका, धीर सोडू नका. मी अनंतात आहे..मी अनंतात आहे,.मी अनंतात आहे. तुम्हाला सुध्दा हा देह एक दिवस सोडावा लागणार आहे. तरी तुम्ही एकचित्त करून एक +एक म्हणजे आत्मा नि परमात्मा. तसेच मी व तुम्ही भिन्न नाही,हे लक्षात ठेवा. व सदा सर्वदा स्वस्वरूप जाणण्याचा प्रयत्न करा. हीच बाबांची इच्छा,घंटा सर्वांना सांगत होती, त्या बाबांच्या पुण्यदिनी!

भरूनी सद्भावाची अंजुली। मी ओवलींया फुले मोकिली
ती अर्पिली पदचरणी साईबाबांच्या

आता आणखी निर्वाणाच्या दिवशी घडलेल्या गोष्टी पाहू. लक्ष्मीला ९ रुपये दिले. एक तर नऊविधा भक्ती करा हा संदेश दिला व स्त्री ही लक्ष्मीला भुलते,तिला नऊ रुपये देऊन मोजण्यात गुंतवली कारण कोणत्याच प्रकारची माया समोर नको. प्रेमी जनांना जेवणाचे निमित्त करून पाठविले, एकान्त निर्माण केला.

आपली मात्र शेवटच्या क्षणाला याला भेटू, त्याला बोलाव, कुणाला काही सांगायचे राहिले, पण खरे पहाता यातले कोणीच भवभयातून सोडवणारे नसते, उलट

जन्ममरणाच्या फेऱ्यात गुंतविण्यास मदत करतात.

ही शिकवण किती श्रेष्ठ आहे. नवविधा भक्तीत रमा की शेवटी माझीच आठवण होईल. तुम्हाला मग चारी मुक्ती तुमच्या समोर हात जोडून उभ्या रहातील.

बाबांच्या निर्वाणदिनी चिंतनीय अशी घटना घडली ती अशी–

बाबांचे पुढील कार्य हिंदू की मुसलमान पध्दतीने करावे? त्यावेळी बाबांनी कुणाला न दुखवता आपण कोण आहोत हे दाखवून दिले. लक्ष्मण मामांना पहाटे स्वप्न पडले. बाबांनी हात धरून उठविले. ऊठ लवकर ऊठ. बापूसाहेब येणार नाहीत आज, त्यांचा समज आहे मी मेलो. काकड आरती कर माझी.

लक्ष्मणमामा स्नान करुन आरती व पूजेचे सामान घेऊन आले व यथायोग्य पूजा केली. मूठ उघडून विडा दक्षिणा हातात ठेवली, आरती केली. आता यावरून असे निश्चित वाटते, पूजा आरती स्वीकारली अर्थात् मी परमेश्वरशिव आहे व विडा दक्षिणा स्वीकारली अर्थात या नश्वर जगात मानवी स्वरूपात मी ब्राहमण आहे. (ब्राहमण अर्थात ब्रहम जाणतो असा ज्ञानी).

भर बारा वाजताच्या सूर्यकिरणांच्या रूपाने देव, ऋषीगण, संत, साधू यांची या संत श्रेष्ठ राजाधिराज साईच्या दर्शनासाठी चढाओढ सुरू झाली होती. तर इकडे शिरडीवासी दु:खाने व्याकूळ होऊन मायमाऊली सोडून गेली, या दु:खात चूर होती. वास्तविक पहाता

संत मुळींच गर्भातीत। परोपकारार्थ प्रगट होत। ब्रहमस्वरूप मूर्तिमंत<br>
भाग्यवंत अवतरूनी। जन्म आणि मरणस्थिती। अवतरिया कदान येती।<br>
कार्य सरता ते स्वरूपी मिळती। समरसती ते अव्यक्तीं।

संतांनी समाधी घेतली तरी ते दिव्य ज्योती स्वरूपाने जगात वावरत असतात. त्यांना हाक मारली तर हाकेला कोणाच्या ना कुणाच्या रूपाने धावत येतात. मानसिक दौर्बल्य नष्ट होते, त्यांच्या चिंतनाने. या संताच्या शिकवणीने व त्यांच्या जागृत पण निराकार स्थितीतल्या मिळणाऱ्या आधाराने आपण आपले आयुष्य आनंदात घालवू शकतो व जन्ममरणाचे फेरेसुध्दा चुकवू शकतो.

हेच पहा ना, संतांचे बोलसुध्दा किती अनमोल असतात. नाथांना जाऊन ७० वर्षे पूर्ण झाली, तरी शिरडीतली गर्दी दिवसेंदिवस वाढत चालली आहे. मुंग्यांसारखी रांग लागेल, त्याप्रमाणे आता आपण पहातो आहोतच ना, लोकांची वाढणारी गर्दी, त्यात कोणत्याही धर्माची, जातीची स्त्री, पुरुष, मुले होणारा त्रास आनंदाने सहन करत आहेत. बाबांच्या दर्शनासाठी दिवसेंदिवस गर्दी वाढत आहे. तसेच दुसरे बोल–

तेथेच आपण बोलूं चालूं। भोगू सुकाळू आनंदाचा

अगदी असेच घडत आहे. बाबा तेथे आहेत कशावरून म्हणाल, तर तेथील सर्व ठिकाणी इतकी प्रसन्नता आहे त्यावरून! तेथे गांजलेले भक्त येतात, कोणी चांगले झाले ते सांगायला येतात तर चांगले कर सांगणारे असतात, तर कोणी तुझे दर्शन तुझी कृपा मागायला येतात नी बाबा नकळत सारे पुरवतात.

म्हणून म्हणते श्रीसद्गुरू साईनाथ आपल्यातून गेले नाहीत, ते जागृतावस्थेत निराकार स्थितीत आहेत. हे मानवी स्वरूपातच त्यांनी दाखवून दिले होते. रूप बदलून दर्शन देणे, कोठे काय चालले ते सांगणे, कोणाचे द्वारकामाईत बसून संकट निवारण करणे (लोहाराची पोर), कोणी आपल्यासाठी प्रेमाने काय पाठविले याची आठवण देणे (पेढा, नारळ वगैरे). पण या साऱ्याचा अर्थ एका शब्दात सांगून मोकळे झालो, "चमत्कार"! पण खरे आपण सर्वसाक्षी परमपिता शिवस्वरूप आहो, हे सर्वांना कळावे, पण शेवटी माणूसच मायेने वेढलेला तो ओळखू शकला नाही.

श्रीसद्चिदानंद साईनाथ यांना साकारातून निराकारात गेल्याला ७० वर्षे झाली, तरी अनेक भक्तांचे जगातल्या कित्येक भागातून अनुभव ऐकण्यात, वाचनात येत आहेत ते त्याच्या जिवंतपणाची साक्ष देत आहेत की, मी तुमचा आहे, तुम्ही माझे आहांत. "नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य" आणि हे घडोघडी सर्वांना पटते आहे. श्रीसाई माऊली ही माऊली प्रमाणेच आपले पालन करत आहे, करत राहील हेच खरे.

मन्नाथा जगन्नाथा। मद्गुरू जगद्गुरू
मदात्मा सर्वात्मा। तस्मै श्री गुरूवेनमः

आता आपण थोडे भक्तीकडून अध्यात्माकडे वळूया नि पुढील गोष्ट लक्षात ठेवूया. या संसारासाठी खूप मागितले, आता स्वतःसाठी मागू या नि तशी कृती करू या, अर्थात चिंतन, मनन, आचरण. संतांच्या वचनाचे.

अंतकाळी हीच सावधता। शांतता आणि एकांतता।
ध्येय मूर्ती यावी चित्ता। विक्षेपता विरहित। 'अंतेमतिःसा गतिः'
॥श्री सद्गुरू साई चरणार्पणमस्तु॥ शुभंभवतु॥

## :: श्री पुण्यतिथी उत्सव ::

### —: अखंड पारायण व्यवस्था :—

पुण्यतिथि उत्सवातील श्री साई सत्चरित्र पारायण दि. १९.१०.८८ ला सकाळी ६.३० वाजता द्वारकामाईत सुरू होईल व दि. २०.१०.८८ ला सकाळी ६.०० वाजता पारायणाची सांगता होईल. पारायणात भाग घेऊ इच्छिणाऱ्या साईभक्तांनी दि. १८.१०.१९८८ रोजी दुपारी ३.०० ते संध्याकाळी ७.०० वाजेपर्यंत आपली नावे मंदीर विभागाच्या कार्यालयात नोंदवावयाची आहेत. नोंदणी केलेल्या साईभक्तांची रात्रौ ८.०० वाजता चिठठया काढून पारायणासाठी निवड होईल व त्यांची यादी ताबडतोब जाहीर करण्यात येईल. ज्या क्रमाने चिठठया निघतील त्या क्रमाने साईभक्तांना पारायणात भाग घेता येईल. क्रम येईल त्या वेळी भक्त हजर न राहिल्यास त्यांचे नाव यादीतून कमी करून संस्थान सेवकांमार्फत त्या अध्यायाचे पारायण होईल.

### —: भिक्षा झोळी कार्यक्रम :—

परंपरेने चालत आलेल्या पुण्यतिथी उत्सवातील भिक्षाझोळी कार्यक्रमात भाग घेऊ इच्छिणाऱ्या भक्तांनी उत्सवाच्या पहिले दिवशी दि. १९.१०.८८ रोजी आपले नाव मंदीर विभागात नोंदवावे. चिठठया काढून ज्यांची नावे निघतील अशा पहिल्या २० भक्तांना भिक्षा झोळी देण्यात येईल. अधिक माहिती मंदीर प्रमुखाच्या कार्यालयात मिळेल. तरी सर्व साईभक्तांनी संस्थानला सहकार्य करावे.

# श्री साईनाथ महाराजांची ७० वी पुण्यतिथी

– सौ. सरोजिनी मुळ्ये
सरस्वती सदन, ६, नाथ मंदिर कॉलनी,
साऊथ तुकोगंज, इंदूर (म. प्र.).

साधु संतांच्या मृत्यू दिनाला त्यांची पुण्यतिथी असे म्हणण्याचा प्रघात आहे. साधुसंत हे अगदी निर्लोभी असतात. त्यांना कशाचीही आसक्ती नसते, स्वार्थ नसतो, वैरभाव नसतो. जगाच्या उद्धारासाठीच त्यांचा अवतार असतो. आपला कार्यभार संपला की ते समाधिस्त होतात.

असेच शिरडीचे साईमहाराज होते. यंदा आपण त्यांची ७० वी पुण्यतिथी साजरी करीत आहोत. आपण त्या निमित्ताने त्यांचे भजन, पुजन, गुणगान करुन हा उत्सव साजरा करतो. त्यांनी सांगितलेल्या उपदेशाप्रमाणे भक्तांनी वागणे, हीच खरी त्यांची सेवा आहे. त्यांचा देह विसर्जन पावला परंतु आत्मा हा अमर असतो. या उक्तीप्रमाणे आज शरीराने जरी ते अस्तित्वात नसले, तरी ते अजूनही आपल्या भक्तांतच वावरत आहेत. प्रचितीविना नव्हे भक्ती. भक्तांना जेव्हा प्रचिती आली, तेव्हाच बाबांवर भक्ती जडली. पुढील ओव्यांवरुन ते आपल्यात आहेत, हे कळून येईल.

साईसच्चरित, अध्याय २५, ओवी १०३ ते १०७ यातून बाबांनी म्हटले आहे, असो ही तो बाबांची वैखरी । बाबा असताना देहधारी । परी पुढेही देहत्यागा नंतरी । स्वये निर्धारी निज-महिमा । झालो जरी गतप्राण । वाक्य माझे माना प्रमाण । माझी हाडे तुर्बती मधून देतील अश्वासन तुम्हांस । मी काय पण माझी तुर्वत । राहील तुम्हासवे बोलत । जो तीस अनन्य शरणागत । राहील डोलत तयासवे । डोळ्या-आड होईल ही चिंता । करु नका तुम्ही मजकरिता । माझी हाडे ऐकाल बोलता । हितगुज करिता तुम्हासवे । मात्र माझे करा स्मरण । विश्वासयुक्त अंतःकरण । ठेवा करा निष्काम भजन । कृत कल्याण पावाल । हे साईच्चरितांतील बोल अगदी खरे ठरले आहेत. बाबा आता आपल्यात नाहीत असे कोण म्हणेल?

साबाबांनी आपल्या समाधीचे स्थान व दिवस आधीच ठरवून ठेवले होते. बुटी वाड्याचे बांधकाम जेव्हा चालले होते, तेव्हा बाबा श्यामाला म्हणाले, आपण येथेच राहू. आधी बुटी वाड्यात गाभाऱ्यात मुरलीधराची मूर्ती स्थापन करावयाची होती, परंतु बाबांचे मनोगत कळल्यावर बुटींना अगदी आनंद झाला. ते म्हणाले, माझ्या हृदय मंदिरी साईबाबा येऊन राहिले. म्हणती काका भाग्य उदेले, श्री बाबाची वाड्या आले, मुरलीधर ही तेच झाले, लाभले त्रैलोक्य राज्य, आतां नको मजसी कांही, स्वये देवची घरी येई, हृदय-मंदिरी माझ्या राही, घेई प्रेमोपचारही.

बाबा म्हणाले होते, मुलांनो, मी तर अमर । अरे मी येथेच दूर ना । सांगा कोणी दृष्टी आड, म्हणूनी पोचे का पल्याड । देहसोडिता हेची गूढ । मना संभ्रम जाहला । येथे माझी पडली हाडे । ती ही ऐकत साकडे । शब्द, अश्रू कानीं पडे । नोंद मजकडे

सर्व ती। काय वाटले होईल शून्य। प्रिय माझे हे वसतिस्थान। छेः छेः नित्य-नूतन चिरंतनची क्षेत्र हे। आज सांगतो भाकित। भविष्य काळीचे ते गुपित। कान इकडे क्षणमात्र। देणे, ऐकणे मन्मुखे। अखंड येथे येणे भक्त। मुंग्या जैशा, तैसे नित्य। सण-उत्सवही शतपट। उत्साह करणे त्या असे। अरे, लेकरे सर्व सम। तरीही नव्हे एक प्रेम। काही अनन्य निष्काम काही उनाड स्वच्छंदी, अशाही त्या येणे येथे, घातला दोरा पायाते। कळेना हित अहित त्यांते, म्हणूनी टाकणे त्यास कां? कसे मनीचे बोल गूज। जरी देहे न मी आज, चैन पडणे नव्हे मज निकटी नसता लेकरे, नसो या स्थाना आज मान। जिंदाही करोत अज्ञ जन परी येथे पूजन। होणे अखंड देवाचे। असो सांगणे वरी तुम्हांसी। वाडे जैसे का राजाशी, तैसे वाडे, वागा मजसी दिसती भविष्य काळ तो। ऐसे स्थाना या ऐश्वर्य। प्रेम भक्तीसी येणे पूर। सुख शांतीचे हे माहेर। नूर यथाकाल पालटणे। आता देतो घ्या हे वचन। ज्या कोणाचे येथे गमन चिंता-दुःख हरण। स्मरण शब्दांचे या असो.

वरील सर्व आज खरे ठरले आहे. रात्रंदिवस बाबांचे नामस्मरण केले पाहिजे.

७० व्या पुण्यतिथी निमित्त श्री साईचरणी शतशः प्रणाम।

## ॥ श्री साईबाबा – महानिर्वाण ॥

**कीर्तन भूषण श्री. चिंतामण लक्ष्मण शिंत्रे**

"देवासी अवतार भक्तासी संसार। दोहोचा विचार एके ठायी" ॥

संत चूडामणी भगवान श्री साईबाबा महाराजांच्या महानिर्वाण दिनानिमित्त कीर्तन रुपाने त्यांना श्रद्धांजली वाहून विनम्र अभिवादन करतो.

श्री साईबाबा यांच्या महानिर्वाण या संबंधी बोलताना प्रथम ते कोण होते? तो एक साधा मानव नसून ते एक अवतारी पुरुषच होते. **"जगाच्या कल्याणा संताच्या विभूती। देह कष्टविती उपकारे ॥** या उक्तीप्रमाणे भगवंतांनी गीतेत म्हटल्याप्रमाणे **परित्राणाय साधुनाम्।** सज्जनांचे रक्षण करुन दुष्ट प्रवृत्तींचा नाश करण्यासाठीच त्यांचा अवतार होता. गीतेत भगवान म्हणतात – **"यदा यदा ही धर्मस्य"**॥ ज्या वेळेला धर्माला ग्लानी येते, अधर्म बोकाळतो, जो तो आपल्या कर्तव्यापासून परावृत्त होतो, अशा वेळी धर्म रक्षणार्थ प्रभु अवतार उपावतारानी प्रगट होत असतात.

रंजल्या गांजलेल्याना योग्य मार्गदाखवून "**मना सज्जना भक्ती पंथेची जावे ।** हे सांगण्यासाठीच दत्तस्वरुपातून "**श्रीसाईबाबा**" उप अवताराने प्रगट झाले. त्यांनी हे "**विश्वची माझे घर**" या न्यायाने अवतार रुपाने प्रगट होऊन जगाचा संसार केला. शिर्डी गावाला यात्रेचे स्वरुप प्राप्त करुन दिले. जनतेत भक्तीप्रेम, इशसेवा निर्माण केली.

व्यवहारिकदृष्ट्या **त्यांनी स्वतःला** आपण मुसलमान की हिंदू वा अन्य कोणत्या जातीचे आहोत हाही थांगपत्ता लागू दिला नाही. शेवटी त्यांना अग्निसंस्कार की दफन विधी हा एक मोठा प्रश्न होता. तसेच त्यांनी सबजा की तुळस – म्हणजेच हिंदू की मुसलमान ह्या प्रश्नांनी जनतेला त्यांनी अनुत्तरितच ठेवले. यावरुन त्यांनी सर्वांत "**एकता भाव**" निर्माण करुन आणि विशेष म्हणजे देवतारुपी जन्माला येऊन, "**हे विश्वची माझे घर**" अशा रितीने सर्व विश्वाचा संसार केला. जनतेशी समरस होऊन, मार्गदर्शन करुन सन्मार्गाला लावले.

"**आज ना उद्या जायाची ही काया**" म्हणजेच '**आदानं ही निसर्गाय**'आलेले हे सर्व जायचे आहे. ज्याचे "**बारसे झाले, त्याचा बारावा**" हा ठेवलेलाच आहे. मग मानवाने मृत्युला कां घाबरावे? मृत्यू ही देहाची चौथी अवस्था आहे. जनतेच्या मार्गदर्शनानंतर **श्री साईबाबा शके १८४० मिती आश्विन शुद्ध १० (दसरा) मंगळवार, ता. १५ ऑक्टोबर १९१८ अनंतात विलीन झाले. 'माती अससी, मातीत मिळसी'** ह्या उक्तीप्रमाणे (दुपारी २॥ वा.).

जनतेला अपरंपार दु:ख झाले. पण विचारांती मी असे म्हणेन, ते गेले नाहीत, तर मग काय? **मरावे परी किर्ती रुपे उरावे ।** ह्या ध्येय पूर्तीने ते अजून आपल्यातच आहेत, गेले नाहीत. आत्मा अमर आहे. **नैनछिंदत्ती शस्त्राणीत्याचा** कशानेही अंत होत नाही. मग काय ते कीर्ती रुपाने जगले आहेत.

त्यांच्यात फार मोठे गुण होते. त्यांच्या उदीचे महत्व फार होते. अंत:स्फूर्ती, इशसेवा, जनसेवा, गूढज्ञान, विवेक आदी अनेक गुणांचा पुतळा आज पडद्या आड झाला एवढे मात्र खरे आहे. त्यांची धुनी सदैव असायची. "**साधी रहाणी, उच्च विचार, आचार, अंगात कफनी, हातात कटोरा, डोक्याला टोपी, झाडाखाली बैठक असे ते साईबाबा,** अजूनही प्रत्येक भक्ताला की, ज्यांच्या जवळ श्रद्धा भक्ती, विश्वास आहे, त्यांना ते अजूनही भेटतात, हेही तितकेच खरे आहे. त्यांच्या विषयी बोलावे तेवढे थोडेच आहे. **आपुलीया बळे नाही बोलवता, सखा कृपावंत वाचा त्याची** याप्रमाणे ते आपल्याला सोडून स्वर्ग सुखाचा लाभ घेत आहेत. एवढेच नाही तर भक्तांची कामे अजूनही होतात, पूर्वीसारखेच ते त्यांना मदत करतात. यापेक्षा अधिक ते काय नकळे.

त्यांच्या इच्छेप्रमाणेच त्यांच्या मागे सर्व गोष्टी त्यांच्या भक्तांनी यथा सांग पार पाडल्या.

त्यांच्या निर्वाणदिनी ही छोटीशी 'श्रद्धांजली' त्यांना अर्पण करतो.

# संतवाणी

१) भगवंताचे नाव घेणे हे बॅटरीसारखे आहे, आपल्याला पाहिजे तेव्हा ते प्रकाश देते, ते आपल्या खिशामध्ये म्हणजे हृदयामध्ये राहू शकते व कोठेही केव्हाही ते बरोबर नेता येते.

२) ज्याचे अंतःकरणात सारखे खाण्याविषयी अथवा स्त्रिया संबंधी विकल्प चाललेले असतात, त्याला परमार्थ साधने फारसे कठीण.

३) अगदी शुल्लक कारणावरून रागवणाऱ्या व्यक्तीला परमार्थ साधणे प्रायः अशक्य आहे, कारण क्रोध हा अंतःकरणाच्या दुबळेपणाचा कोतेपणाचा बाह्य आविष्कार आहे व ज्याचे मन इतके संकुचित दुर्बल आहे,तो काय साध्य करणार.

४) ज्या मनुष्याला सकाळी उठल्याबरोबर जवळ जवळ अंथरुणातच एका हातात वृत्तपत्र आणि दुसऱ्या हातात चहाचा कप लागतो,त्याने परमार्थाच्या फंदात पडू नये आणि आयुष्यात कधी सुखाची अपेक्षाही करू नये.

५) जेवणाच्या ठराविक वेळेपेक्षा अर्धा पाऊण तास उशीर झाला,तर ज्याची भुकेने आणि रागाने तडफड होते, तो साधनेत नालायक.

६) मंत्र देणे आणि मंत्र घेणे म्हणजे गुरु शिष्य संबंध आला असा नव्हे, जगात अत्यंत श्रेष्ठ, अत्यंत पवित्र व अतुट असे जर कोणी नाते असेल,तर ते गुरु शिष्याचेच होय, म्हणून आपण एखाद्याला मंत्र दिला म्हणजे लगेच गुरु झालो आणि मंत्र घेतला की "शिष्य" झालो,असे कोणीही समजू नये.

७) माळा, रुद्राक्ष, मुद्रा, शेंदुर, बुक्का, दाढी, करनी, अथवा उदंड पाठांतर करुन कीर्तन, प्रवचन करता येणे म्हणजे परमार्थ साधला असे नव्हे. शांत स्वभाव, पवित्र्य, मनाचे मोठेपण अखंड नामस्मरण इ. खरे महत्त्व आहे.

) आपण ईश्वर भक्ती करतो, एकान्तात साधना करतो, एवढ्यावरून इतरांपेक्षा कोणी श्रेष्ठ आहोत,असे साधकाला वाटू नये. जसे नवजात अर्भकापासून नव्वद वर्षाच्या म्हाताऱ्यापर्यंत स्वतःसह सर्वांचे देह पाच भौतिक आहेत व प्रत्येक देहांतील चैतन्य एकच आहे,याचे स्मरण ठेवले म्हणजे अहंकार होत नाही.

९) आकाशात घार उडताना जितका वेळ पंख हलविते, त्यापेक्षा कितीतरी अधिक वेळ पंख स्थिर ठेऊन विरहत असते. साधकाने सुद्धा प्रपंचासाठी देहाला आणि मनाला जितका काळ शीण दिला,त्यापेक्षा काकणभर जास्त वेळ देवासाठी देह व मन स्थिर ठेवण्यासाठी दिला पाहिजे.

१०) डोळ्याचे कोनाडे झाले, हातापायाच्या शेवग्याच्या शेंगा झाल्या, गुलाबाची निरांजन झाली,तरी बेहत्तर, पण मी नामचिंतन सोडणार नाही,इतका ज्याचा नामस्मरणावर विश्वास व निश्चय आहे, तो साधक फार लवकर ब्रह्मानंद अनुभवितो.

# माणिक मोती

१) बिन जरुरीच्या वस्तू खरेदी करु नका, नाहीतर जरुरीच्या वस्तू विकण्याची पाळी येईल.
२) तुमच्या मजुरांना त्यांचा घाम सुकण्यापूर्वी त्यांची मजूरी द्या. देताना टाळाटाळ करु नका.
३) शब्द हे शस्त्र आहे जरा जपून वापरा.
४) कामास त्रासून इतरांवर विनाकारण चिडू नका.
५) क्रोधाचे समयी योग्य ते विचार जागवा.
६) जनतेस आवडेल आणि मानवतेस शोभेल, असे वर्तन ठेवा.
७) निंदकाच्या तोंडास हात लावण्यापेक्षा आपल्याच कानात बोटे घाला.
८) कर्तव्य, तत्पर, स्वकर्मी, दक्ष आणि चोख असावे.

संग्राहक
**— श्री. अशोकराव गगे**
मु. पो. पुणतांबा, ता. कोपरगांव.
जि. अहमदनगर.

# भागवतातील गोष्टी

(लेखिका — सौ. विद्या परांजपे, प्रकाशक — श्री. ल. गो. परांजपे, ज्योत्स्ना प्रकाशन ३० सी–खोताचीवाडी, गिरगाव, मुंबई–४. पृष्ठे १२८, किंमत आठ रुपये.)

भागवत हा आम्हा हिंदूंचा एक पवित्र असा ग्रंथ आहे. त्यात सृष्टीचा निर्माण कर्ता, पालन कर्ता भगवंताची विविध रुपे व त्याची विविध कार्ये वर्णिलेली आहेत. या भगवंतावर विश्वास ठेऊन प्रत्येकाने वागावे अशीच हिंदू धर्मात रुढ भावना आहे. त्याप्रमाणे वागले तर परमेश्वराचा तो लाडका, प्रिय होतो व वेळ प्रसंगी अडचणीला तो धावून जातो मग तो देव, दानव, मानव कुणीही असो.

लेखिका सौ. विद्याताई याना या भागवताचा आधार घेऊन केवळ मुलांच्याचसाठी नव्हे तर मोठ्यांनाही त्या बोधप्रद व्हाव्यात अशा गोष्टी निवडून त्या गोष्टीरूप संग्रहातून दिलेल्या आहेत. ठिकठिकाणी गोष्टींना यथोचित चित्रे पण रेखाटलेली असल्याने व टाईप पण मोठा वापरल्याने हा कथासंग्रह संग्राह्य व वाचनीय झाला आहे. मुखपृष्ठावर भागवत धर्माचे प्रवर्तक संत एकनाथ महाराजांचे सुंदरपंचरंगी चित्र रेखाटलेले आहे.

# साईदरबारातील माणिक आणि मोती ..... १०

## सौ. बायजाबाई कोते पाटील



बायजाबाई या शिर्डीतील गणपतराव कोते पाटील यांच्या धर्मपत्नी. साईमहाराज प्रथम शिरडीत जेव्हा आले तेव्हा बायजाबाईचे लक्ष साईमहाराजांकडे गेले. तिने त्यांचे दर्शन घेतले. बायजा दर्शनास येताच महाराज तात्काळ उठून उभे राहिले. चुकलेली गाय अचानक दिसलेल्या वासराप्रमाणे ते बायजाकडे आशाळभूतपणे पाहू लागले. जणू पूर्वजन्मीचा संबंध ते ह्या जन्मी निश्चित करीत होते. अशा स्थितीत काही वेळ गेल्यावर साईंनी 'मामी' म्हणून तिच्याकडे बघून सहज उद्गार काढले. ते जिवंत जिव्हाळ्याचे उद्गार व महाराजांचे बालवय बघून स्त्री हृदयातले प्रमुख द्वार जे मातृप्रेम ते बायजाच्या अंतःकरणात सताड उघडले गेले. त्या माऊलीचे वात्सल्य प्रेम वाढू लागले. त्या क्षणीच्या भेटीपासून बायजा जोपर्यंत हयात होती तोवर महाराज तिच्याकडे मातेच्याच दृष्टीने पाहात असत.

श्रीबाबा बायजाच्या अनुग्रहास मान देत. बाबा जेव्हा शिरडीस आले त्या दिवसापासून तो बाबा हयात असेतोपर्यंत बायजाच्या घरचाच घासभर तुकडा खाल्ल्याशिवाय त्यांचा एकही दिवस गेला नाही. इतकेच नव्हे तर बाबांच्या समाधीकालानंतर तिच्या घरचा नैवेद्य म्हणून द्वारकामाईस नित्यनियमाने अखंडपणे पाठविण्याचे तिने सांगून ठेवले होते. साईंना नैवेद्य पोचता केल्याशिवाय तिच्या घरातील मुलेदेखील अन्नाचा कण पोटात घेत नसत. बायजा व तिचे पती गणपतराव

कोते पाटील या उभयतांनी बाबांची विशेष काळजी घेतली. प्रत्यक्ष पोटच्या मुलाप्रमाणे त्यांचे बाबांवर प्रेम होते. हा कुणीतरी थोर पुरूष, महात्मा आहे असा जागृतभाव त्या उभयतांच्या ठिकाणी होता. बायजा रोज बाबांना निंब वृक्षाखाली भाकरी घेऊन येई व ते तिथे जर नसले तर ती दु:खित मनाने परत जाई. कुणाही शिर्डीकरास बाबांच्या दैवी सामर्थ्याची कल्पना नव्हती. फक्त ती बायजालाच होती.

श्रीसाईबाबा शिरडीस फक्त पाच दारीच भिक्षा मागून उदरनिर्वाह करीत. त्यांच्या भिक्षेचा क्रम समाधी कालाच्या आदल्या दिवसापर्यंत अखंड चालू होता. कै. सौ. बायजाबाई कोते पाटील, कै. राधाबाई गोंदकर पाटील, श्री संताजी शेळके पाटील, कै. नंदराम शेट मारवाडी व श्री.आप्पाजी कोते पाटील यांच्या दारी ते भिक्षा मागत. इतरांच्या दाराशी ते कधीच भिक्षेला गेले नाहीत हे विशेष लक्षात ठेवण्यासारखे आहे.

बाबा भिक्षेसाठी दाराशी आल्यावर वर्षातून एखाद दुसऱ्या प्रसंगी बायजा त्यांना घरात येण्याविषयी आग्रह करीत असे. बाबा कोणाच्याही आग्रहास कधीच बळी पडत नसत परंतु बायजाच्या बाबतीत आपले ते कडक व्रत ते सैल करीत. बाबा जवळच्या नातेवाईकाप्रमाणे बायजाबरोबर अत्यंत प्रेमाने बोलत. बायजा बाबांना जेवणाचा आग्रह करी व जेवता जेवता त्या दोघांचा संवाद माय लेकराप्रमाणे असे. बायजाच्या जेवणात भाकरी, पिठले, कांदा, मिरची (चटणी), लोणचे याचा समावेश असे. दुसरा कोणताही पदार्थ बायजाने कितीही आग्रह केला तरी बाबा घेत नसत. क्वचित दूध मात्र घेत. कधी कधी बायजा बाबांना त्यांच्या पूर्वाश्रमीबद्दल मुद्दाम प्रश्न विचारीत असे. बाबा, तुमच्या घरी कोणकोण आहेत? बाबा उत्तर देत, मला घर आहे, आईबाप आहेत व आणखीन पुष्कळजण आहेत. ते कोठे आहेत म्हणून प्रश्न केला की बाबा म्हणत "बहुत बहुत लंबे" फक्त एवढेच सांगत. बायजा आग्रहाने पुढे विचारे,तुमच्या घरच्या मंडळीस एकदा तरी आणाच. नाहीतर आम्हाला त्यांच्यासंबंधी माहिती द्या,म्हणजे आम्ही त्यांना घेऊन येऊ. यावर बाबा म्हणत, "ते बहुत बहुत लंबे". बाबांनी बायजाला सुध्दा आपल्यासंबंधीची माहिती कधीच सांगितली नाही.

बायजाबाई वयाच्या ७५ व्या वर्षी शिरडीतच निधन पावली. तिने जेव्हा अंथरूण धरले होते त्यावेळी बाबांनी एकदोनदा तिची मुद्दाम भेट घेऊन उपदेश केला. सौ. बायजास मृत्यूने गाठले तेव्हा तिची प्रेतयात्रा द्वारकामाईजवळन जाऊ लागली, अशा वेळी बाबा द्वारकामाईच्या जोत्यावर राहिले व आपल्या धीरगंभीर स्वभावानुसार मोठ्याने ओरडले, "अरे माझ्या कोत्याची आई चालली,माझी मामी गेली" या आवाजाने सबंध स्मशान यात्राच नव्हे,तर सारे गाव हादरले,असा भास झाला.

बायजाचे घराणे जन्मजात श्रीमंत होते. त्यामुळे बाबांनी तेरावा दिवस मोठ्या प्रमाणात करण्यास सांगितले. हजारो गोरगरीबांना अन्नदान केले गेले. श्रीसाईबाबांच्या अवतार कार्याचा एक महत्वाचा भाग बायजा गेल्याच्या दिवसापासून संपला. श्री तात्याजी गणपतराव कोते पाटील हे बायजाचेच सुपुत्र होत. ते पुढे शिरडीचे एक प्रमुख पुढारी बनले होते.

# गुरुचा महिमा

– सौ. नीला नारायण कालुष्टे
बी/१२ श्री ओजस सोसायटी,
द. कान्होजी आंग्रे मार्ग,
कोलडोंगरी, अंधेरी (पूर्व),
मुंबई ४०० ०६१.

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्दैवो महेश्वर :
गुरु साक्षात् परब्रह्म तस्मैश्री गुरवे नमः ।

गुरुची महती वर्णावी तेवढी अपुरीच आहे. जर का आपणाला परमात्माकडे जायचे असेल तर गुरुची कास धरली पाहिजे. साईबाबा हे आत्मज्ञानी पुरुष होते. अवलीया होते. त्यांचेही गुरु होते. ते बोलताना आपल्याला गुरुचा आशीर्वाद पूर्ण आहे. व त्यांच्याच कृपेने भक्तांची संकटे दूर होवून कल्याण होते असे ते म्हणत. भक्तांना आशीर्वाद देताना 'अल्ला भला करेगा' हेच शब्द असत.

पावसचे (जि. रत्नागिरी) स्वामी स्वरुपानंदही आपल्या अभंगात म्हणतात

कृपावंत थोर । सद्‌गुरु उदार ।
तेणे योग-सार । दिले मन ।।
मन पवनाची । दाखवोनी वाट ।
गगनासी गाढ । बांधियेली ।।
शून्य-निःशून्याचे । बीज महाशून्य ।
भेटविले धन्य । हरिरुप ।।
स्वामी म्हणे माझा । नाथ संप्रदाय ।
अवघे हरिमय ।योग बळे ।।
स्वामी म्हणे झाले कृतार्थ जीवन ।
सद्‌गुरु – चरण उपासितां ।।

नामदेवाला पांडुरंग आपल्या बरोबर खेळतो म्हणून अहंकार झाला होता. नामदेवाचा अहंकार ओळखून मुक्ताबाईने गोरोबाकडून त्याला कच्च्या मडक्याची पावती देवून फजीत केले तेव्हा नामदेव विठ्ठल मंदिरात तडक गेले व देवाजवळ तक्रार करू लागले, तेव्हा पांडुरंग म्हणाले "वेड्या इतर संतांपुढे मी सगुणरूपाने खेळत नाही, पण तुझ्यापुढे खेळतो, कारण तू वेडपट लेकरु असल्याने मला तुझ्याशी खेळावे लागते. शहाणा म्हणून नव्हे. तुला माझ्या स्वरुपाचे सम्यक ज्ञान झालेले नाही, तू ओढ्या नागनाथ क्षेत्री जा. तेथे विठोबा खेचर आहेत. तेच तुझे गुरु। नामदेवाला विठोबा खेचर सारखे सद्‌गुरु मिळाले व नामदेव पावन झाले, धन्य झाले. आजच्या कलीयुगात असे सद्‌गुरु मिळणे फारच दुर्मिळ झाले आहे, तरी सुद्धा त्यांचा शोध घेतला असता अशक्यप्राय असे काही नाही. मात्र गुरु शोधताना फार सावधतेने, चोखंदळपणाने गुरु निवडला पाहिजे.

आजकाल गुरु, महाराज, बाबा, बुवा, तांत्रिक, मांत्रिक इत्यादी लोक स्वत:ला परमात्मस्वरुप मानतात व तसे ते शिष्यांना सांगतात. अंधश्रद्धेचा फायदा घेऊन असे हे ढोंगी लोकभक्तांची घोर फसवणूक करतात, निराशा करतात. म्हणून अंधश्रद्धा न ठेवता डोळसपणे गुरु निवडला तर परमात्म्याकडे जाण्यास गुरुची बहुमोल मदत होते.

परमात्मा दिव्य आहे. प्रकाशमान आहे. परमात्म्याला स्वत:चा प्रकाश असतो. तो अमूर्त आहे. म्हणजे त्याला मूर्ती नाही. आकार नाही. देह नाही. परमात्मा हा बाहेरही आहे. व आतही आहे. सर्व चराचरात तो भरलेला आहे. परमात्मा हा अज आहे म्हणजे तो जन्मलेला नाही. तो स्वयंभू म्हणजेच स्वत:च निर्माण झालेला आहे. तो शीव आहे. आपण सर्व देवांचे स्मरण करतो पण ईश्वराचा ईश्वर जो शीव हे जग निर्माण करणारा, सृष्टी निर्माण करणारा 'शीव' त्याचे मात्र आपणाला विस्मरण होते. प्रथम आपण शीवाची भक्ती केली पाहिजे. नामस्मरण केले पाहिजे. लटिका व्यवहार सर्व हा संसार । वायां येरझार हरीविण ॥ ईश्वराकडे जाण्याचा सोपा मार्ग म्हणजे रंजल्या, गांजल्या लोकांची सेवा करणे, दानधर्म करणे. आपल्याला शक्य असेल तेवढा दानधर्म करावा, जनसेवा करावी. पण काही लोक असे आहेत की ते आपल्या कुटुंबाच्या बाहेर पडत नाहीत. आपले कुटुंब हेच आपले सर्वस्व आहे असे समजून ते वागत असतात. देणं घेणं सर्व काही कुटुंबातच पण आपल्या कुटुंबाच्या बाहेर दुसरे विश्व आहे, समाज आहे. त्याचे आपण थोडेफार देणेकरी आहोत, हे ते विसरुन जातात. माणसे सुखात, आनंदात असताना दुसऱ्यांकडे पहात नाहीत. मात्र परिस्थितीचे चटके बसले, दु:ख वाट्याला आले की ते दुसऱ्यांकडे पहातात. नास्तीकालाही अशा वेळी ईश्वर आठवतो, गुरु आठवतो. तो ईश्वराला तुझ्याकडे न्याय आहे का विचारतो? सुखात असताना न्याय आठवत नाही. ईश्वर, गुरु आठवत नाही. दु:ख वाट्याला आल्यावर माणसाला ईश्वराची आठवण होऊन तो परमेश्वराची भक्ती करु लागतो. मला वाटते, म्हणूनच परमेश्वराने सुखाबरोबर दु:ख, दु:खाबरोबर सुख असे रहाट गाडगे चालू ठेवले असावे. अहंकाराने, द्वेषाने अंध झालेल्या अज्ञानी लोकांना मुक्ती मिळत नाही. परमात्म्याकडे ते जावू शकत नाहीत. वाल्या कोळ्याचा वाल्मीकी व्हायचे असेल तर योग्य गुरुची निवड केली पाहिजे. आजच्या विज्ञान युगात प्रत्येक गोष्ट पारखून, निरखून घेतली पाहिजे. अंधश्रद्धेच्या आहारी जाणे म्हणजे आपणच आपल्या पायावर कुऱ्हाड घालण्यासारखे आहे.

भवसागरात पोहून पैलतीर गाठायचे असेल, परब्रह्मा पर्यंत पोहोचायचे असेल, तर खरा ज्ञानी गुरु केला पाहिजे. आपले आचरण स्वच्छ असले पाहिजे. सत्याची, न्यायाची कांस कधी सोडू नये. दुष्टप्रवृत्ती, अहंकार, द्वेष, राग, लोभ इत्यादींचे काटे, दगडधोंडे मार्गातून बाजूला सारुन हरिनाम, साईनाम घेत माणूस प्रेमाच्या, सत्याच्या मळलेल्या पायवाटेने चालू लागला, तर त्याला परमात्मा भेटायला वेळ लागणार नाही. सत्याचरणी शांती समाधानानेसुखी असतो. सत्याचा मार्ग हा ईश्वराकडे जाण्याचा मार्ग आहे. आपल्या सारख्या सामान्य जनांना इच्छा तर खूप असतात, पण इच्छा सिद्धी नसते. इच्छा पूर्ण व्हावी, अशी अपेक्षा असते.

इच्छापूर्तीसाठीच आपण आत्मज्ञानीकडे जावे. गुरुकडे जावे. गुरुच्या माध्यमातून आपण परमात्म्यापर्यंत जावू शकतो, पोहोचू शकतो. परमानंद घेवून धन्य होतो. असा आहे गुरुचा अगाध महिमा।

## त्रिवार वंदन (साईगीत)

त्रिवार वंदन करुनी साई
तुझ्या चरणांचे पूजन करितो
सौख्य यावे माझ्या सदनी... ॥ धृ. ॥
आस मनी मी बाळगतो
शिर्डी ग्रामी अवतरुनी
केली सेवा तूच जनांची
शिर्डीश्वरा धन्ये तुझी किर्ती
या किर्तिचा अभिमान बहु वाटतो... ॥ १ ॥
जनकल्याणार्थ
मानव रुप धारण करुनी
जागृत केलीस मनूच्या मनी
सद्‌भावना अन निस्वार्थ भक्ती
पाण्याने पेटवूनि प्रखर ज्योति,
प्रकाशमान केलीस शिर्डी नगरी
या महिमेचा शंखनाद दशदिशांत
घुमतो,..... ॥ २ ॥
सत्य शांतिचा बनूनि प्रर्वतक
प्राणीमात्रांवर करुनि प्रेम
झालास तयांचा तू रक्षक
ही लिला तुझी महंत न्यारी
भक्तांच्या वसली अंतरी
म्हणूनि या वसुंधरेवरी
मंदिरी तुला पुजूनी
नामस्मरणात तुझ्या
भाविक रंगतो.......... ॥ ३ ॥

**— श्री. सूर्यकांत शंकर आंगणे**
एच २/१०, बने कंपाऊंड,
म्युनिसिपल कॉलनी,
साने गुरुजी मार्ग,
ताडदेव, मुंबई-३४.

# मी जातो आमुच्या गावा!

– लावणीसम्राज्ञी आसावरी वायकूळ
संगीत विशारद, इ–९/८ बर्वे नगर,
घाटकोपर (पश्चिम), मुंबई-४०० ०८४.

शिरडीत एकदा दीक्षितांच्या वाड्यात साईभक्त श्री. बुटी यांचा मुक्काम होता. त्यावेळी त्यांना स्वप्नात श्रीसाईबाबांनी असा संदेश दिला की, 'तू या ठिकाणी भव्य वाडा बांध'. त्याचवेळी योगायोगाने दुसरे साईभक्त शामा यांनाही असाच दृष्टांत झाला. बुटी यांची भेट होताच शामा त्यांना म्हणाला, "बाबांनी स्वप्नात येऊन येथे वाड्याऐवजी भव्य देऊळ बांधा, मी तुमच्या सर्वांच्या मन:कामना पूर्ण करीन असे सांगितले." मग दीक्षित वगैरेंच्या सल्ल्याने बुटींनी मंदिर बांधण्याचा निश्चय ठरविला. बाबांनी या गोष्टीला परवानगी दिली. बापूसाहेब जोग इमारतीच्या कामाला लागले. मुरलीधरच्या सुंदर मूर्तीपुढे चांगला सभामंडप असावा, अशी कल्पना सुचल्यामुळे पुन्हा बाबांच्या परवानगीचा प्रश्न आला. बाबांना या बाबत विचारण्यात आले. त्यावेळी थोडा विचार करुन बाबा म्हणाले, "आपल्या इच्छेप्रमाणे सर्व मंदिर तयार करा. मूर्तीची स्थापना करण्याची घाई करु नका. मी स्वत: तेथे येऊन राहीन. मला ही जागा फार आवडली आहे. नेहमी येथेच कायमचे वास्तव्य करुन तुम्हा भक्तांसह येथे क्रीडा करावी, असे मला वाटते. आजच्या शुभ मुहूर्तावर तुम्ही वाड्याच्या कामाला सुरवात करा."

बाबांच्या इच्छेप्रमाणे लगेच नारळ फोडून मुहूर्त झाला. काही वर्षांच्या अवधीत मंदिराचे काम पुरे झाले. संगमरवरी दगडाची मुरलीधराची सुंदर मूर्ती घडवून आणली. तिची स्थापना बाबांच्या हातून व्हावी, अशी बुटींची फार इच्छा होती. पण श्रीसाईंची इच्छा अघटित होती. बाबा याचवेळी आजारी पडले.

मंगळवार १५ ऑक्टोबर १९१८. विजयादशमीचा दिवस. सीमोल्लंघनाचा दिवस. बाबांच ताप काही उतरत नव्हता. त्यांचा श्वास हलका होऊ लागला. आता जायची वेळ समीप आलेली आहे, हे बाबांनी ओळखलं. मनुष्य मरणाला घाबरतो. सुख-दु:ख, जरा-व्याधी, जन्म-मरण या उपाधी साधुसंतांच्या ठायी संभवत नाहीत. त्यांना दोन्ही क्रिया सारख्याच असतात. त्यांना काळाचे बंधन नसते. भक्तांचे कल्याण, हेच त्यांचे ध्येय असते. मशिदीत गोळा झालेल्या सर्व भक्तमंडळींना बाबांनी घरोघरी जेवायला पाठवून दिले. भक्तांची किती काळजी! आईलाच बाळाची काळजी असते.

इकडे बाबा अत्यवस्थ झाले होते. भागोजीचं लक्ष बाबांच्याकडं गेलं, तसं त्यानं नानासाहेब निमोणकरांना सांगितलं. नाना बाबांजवळ गेले. त्यांनी बाबांच्या चरणाला स्पर्श करुन नमस्कार केला. बाबांनी एकदा डोळे उघडून पाहिलं. मरणाच्या दारात असताना शेवटच्या घडीला लक्ष्मीबाईला हाक मारुन तिला नऊ रुपये दक्षिणा म्हणून दिले. 'मी जातो आमुच्या गावा. तुम्ही मात्र नवविधा भक्ती, भक्तीची नऊ

साधने स्मरणात ठेवा" असा शेवटचा गोड उपदेश बाबांनी आपणा सर्वांना नऊ रुपये देऊन केला आहे.

अचानक बाबांना खोकल्याची उबळ आली. शामा पुढं झाला. शामाला पाहून बाबा म्हणाले, "अरे! आता मला इथं बरं वाटत नाही, मला आता बुटीच्या वाड्यात घेऊन चला, म्हणजे बरं वाटेल." नानांनी गंगाजल बाबांच्या मुखात सोडले. पण ते पाणी तोंडातून बाहेर येऊ लागले. त्यासरशी त्यांनी 'देवा' म्हणून मोठ्याने किंकाळी मारली.

दोन वाजून तीस मिनिटे झाली होती. दशमी संपून एकादशी लागली होती. ज्योतीत ज्योत मिळाली. जेथे मुरलीधराची मूर्ती स्थापण्याचा बेता होता, तेथेच श्रीची समाधी झाली. देहाची मर्यादा संपली, आत्म्याची नव्हे.

महासमाधी घेतल्यानंतर सुद्धा बाबांनी भक्तांना ठिकठिकाणी दृष्टांत दिले. सकाळी लक्ष्मणभटाला दृष्टांतात येऊन सांगितले की "तो बापूसाब निजला आहे. चल उठ, माझी काकड आरती कर". त्याप्रमाणे लक्ष्मणभटांनी स्नान करुन बुधवारी सकाळी मशिदीत जाऊन देहाची पूजा केली.

पंढरपूरला मंगळवारी दासगणूंचे दृष्टांतात जाऊन सांगितले की, "मशीद पडली माझ्या अंगावर. 'बख्खळ' फुले घालावयास या."

बाबा देहाने गेले, पण स्मरणाने अगदी जवळ हृदयात आले बाबांचे घर तुमच्या आमच्या अंतःकरणात आहे. बाबा सांगून गेले की, "तुम्ही माझे स्मरण कराल, त्या त्या वेळी तुमच्या हाकेसरसा तुमच्या सहाय्यार्थ मी धावून येईन. माणसाच्या जन्माला येऊन माणसारखे वागत जा. कोणाला अपशब्दाने अपमानीत करु नका. तो माझाच अपमान होईल. तुमच्या दारावर कोणीही भुकेलेला प्राणी येवो, त्याला अन्नसंतर्पण करा. त्याला विन्मुख करुन परत पाठवू नका. तुम्ही तसे केले, तर मलाच विन्मुख पाठविल्यासारखे होईल. सर्वांशी प्रेमाने वागा. दुसऱ्याच्या उपयोगी पडण्यासाठी झटा, म्हणजे तुमचे कल्याण होईल."

बाबा देहाने आज आपल्यात नसले, तरी ते नसूनही असल्यासारखेच आहेत. जे जे कोणी श्रद्धेने त्यांचा धावा करतात, त्यांना ते पावल्याची प्रचिती आल्याशिवाय रहात नाही.

विजयादशमी म्हणजे बाबांच्या प्रयाणाचा पुण्यदिन. श्रीसाईबाबांच्या महानिर्वाणास सत्तर वर्षे पूर्ण होत आहेत. बाबांचा कृपाकटाक्ष हाच खरा प्रसाद. त्या दयाघन साईनाथांच्या समाधीवर हृदयसुमने अनन्यभक्तीने वहाण्यास शिरडीला जाऊ या.

# अनाकलनीय महानिर्वाण

– श्री. मधु पाटणकर
३४/९०३ नेहरु नगर,
कुर्ला, मुंबई-२४.

सामान्य माणसाच्या देहत्यागाला मरण किंवा निधन असे म्हणतात, पण साधुसंत व अलौकिक दैवीशक्ती ज्या सत्पुरुषांमध्ये असते, अशा व्यक्तिंच्या देहत्यागाला "महानिर्वाण" म्हणतात. या महान सत्पुरुषांचे सबंध आयुष्य हे अतर्क्य, चमत्कारपूर्ण, अनाकलनीय असते. म्हणूनच त्यांचे निधन हे सुद्धा महान असते, महानिर्वाण असते. श्री सद्गुरु साईनाथमहाराज तर या युगातले एक असामान्य दैवी शक्ती असलेले, ईश्वरीअंश असलेले, किंबहुना साक्षात् ईश्वरच असलेले एक व्यक्तिमत्व, त्यांच्या देहत्यागाला आपण महानिर्वाण म्हणतो.

प्राणी जन्माला आला की, मरण हे आहेच. अमरपट्टा कोणी बरोबर घेऊन येऊ शकत नाही. रामायणातला इंद्रजित ब्रह्मदेवाकडे अमरत्व मागतो, त्यावेळी भगवंत त्याला सांगतात "अरे वेड्या, मरण तर देवादिकांनाही चुकले नाही आणि तू अमरपदाची इच्छा धरतोस? ते शक्य नाही!" देवादिकांनाही मरण चुकलेले नाही, हे श्रीसाईनाथांच्या महानिर्वाणाने आपणास माहीत आहे.

श्रीमद्भगवदगीतेत भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला सांगितले,

**वासांसि जीर्णानि यथा विहाय**
**नवानि गुह्याति नरोपराणी**
**तथा शरीराणी विहाय जीर्णा**
**न्यन्यानि संयाति नवानि देही॥**

एखादा मनुष्य जुनी वस्त्रे टाकून दुसरी नवीन वस्त्रे परिधान करतो, त्याप्रमाणे आत्मा एकदेह सोडून नव्या देहांत संगम पावतो, नव्या देहात जातो. श्रीसाईनाथांच्या बाबतीत असे घडले आहे का? नाही। तर बाबांच्या बाबतीत "नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य, नित्य घ्या प्रचित अनुभवे" असा प्रकार आहे. आज लाखो साईभक्त या वचनाची प्रचिती घेत आहेत, पण भगवान श्रीकृष्णावरील उक्ती "मुनष्य जुनी वस्त्रे टाकून नवीन धारण करतो, त्याप्रमाणे आत्मा जुना देह सोडून नवीन देहांत जातो" हे श्रीसाईबाबांनी त्याकाळी मोठ्या सुचकतेने लोकांना दाखवून दिले. पण ते कळण्या इतकी आपली बुद्धी प्रगल्भ नव्हती, कसे ते पहा. "१९१६ साली दसऱ्याच्या सिमोल्लंघनाच्या वेळी सायंकाळी परत आल्यानंतर बाबांनी मेघगर्जनासह कडकडणाऱ्या विद्युलतेप्रमाणे साक्षात जमदग्नी स्वरुप धारण केले आणि शरीरावरच्या सर्व वस्त्रांचा धुनीत भडका उडवून दिला आणि दिगंबर अवतार धारण केला, त्यानंतर भागोजी शिंदे या भक्ताने बाबांना नवीन लंगोट कफनी नेसविली. त्यावेळी बाबा त्याला म्हणाले, हेच माझे सिमोल्लंघन. या घटनेनंतर दोन वर्षांनी १९१८ साली विजयादशमीला बाबांचे महानिर्वाण झाले.

वरील घटनेशिवाय आपला देह बुट्टीच्या वाड्यात ठेवून द्यावा, हे कितीतरी दिवस अगोदर बाबांनी सांगून ठेवले. या वाड्यात आपण एकमेकांना भेटू, सुखदु:खाच्या गोष्टी बोलू असे बाबा म्हणाले. बुट्टीच्या वाड्यात मुरलीधराची स्थापना होणार होती. आज समाधीमंदिरात खरेच आपण श्रीसाईनाथरूपी मुरलीधराबरोबर बोलतो, गातो, हंसतो खेळतो, आनंदीत होतो, सुखदु:खाच्या गोष्टी करतो. श्रीसाईबाबा स्वत:च मुरलीधर बनले नाही का?

बाबांच्या महानिर्वाणाचा दिवस विजयादशमी निश्चित झाला होता, कसे ते पाहू. शिर्डीचे रामचंद्र पाटील आजारी पडले. उपचारांनी गुण म्हणून येईना. ते जीवाला कंटाळले. एके दिवशी बाबा त्यांच्या उशाशी मध्यरात्री प्रकट झाले. पाटलांनी बाबांचे पायधरले व म्हणाले "मला जीवाचा वीट आला, मरणाचे भय वाटत नाही, फक्त मरण मला कधी भेट देईल, ते सांगा". श्री साईबाबा म्हणाले, "चिंता करु नकोस, तुझे गंडांतर टळले आहे, पण तात्याची (तात्या गणपत कोतेपाटील) धडगत नाही. शके १८४० आश्विन महिन्यात विजयादशमीला तो अक्षयपद पावेल. पण ही गोष्ट त्याला सांगू नको, तो झुरणीला लागेल. रामचंद्र पाटील बरे झाले. १८४० च्या आश्विन महिन्यात तात्या पाटील तापाने आजारी पडले. त्यांना खूप यातना झाल्या. बाबांच्या भेटीस जाणेही त्यांना अशक्य झाले. इकडे श्रीसाईबाबा त्याचवेळी आजारी पडले. दुखणे वाढत गेले. विजयादशमीचा दिवस जवळ आला. बाबांचे बोल म्हणजे वज्रलेपच. रामचंद्र पाटील आणि बाळ शिंप्याला बाबांचे बोल आठवून दरदरुन घाम सुटला. म्हणाले, बाबांचे बोल खरे होणार. तात्या पाटलाची अंतिम घडी जवळ आली, हे दिसत असतानाच एक नवल वर्तले तात्या पाटलांचेही गंडातर टळले. ते बरे झाले साई सद्गुरुंनी त्याच्या मोबदल्यात आपलाच देह त्याग विजयादशमीला केला.

श्रीसाईबाबांनी आपल्या अंतिम समयी लक्ष्मीबाई शिंदे, जी बाबांची सेवा अविरत करायची, तिचा विसर पडू दिला नाही. एकदा पाच व एकदा चार असे रुपये खिशातून काढून तिच्या हातावर ठेवले. जणू काय ती नवविधा भक्तीचीच खूण! सिमोल्लंघनाची दक्षिणा किंवा श्रीकृष्णांनी सांगितलेली नवलक्षण शिष्य स्थिती!

अंत समयी आप्तस्वकीय जवळ असल्याने माणूस मोहात गुरफटला जाण्याची शक्यता असते, हे जाणून सर्वांना जेवण उरकून घेण्यासाठी पाठविले. बाबांची आज्ञा न पाळणे हेही शक्य नव्हते. लोक जेवायला बसले असतील नसतील, तोच बाबांच्या निर्वाणाची बातमी घेऊन दुसरे लोक आले. समर्थ साईंचे मनोगत कुणाला नकळताच ते ब्रह्मीभूत झाले, मानवदेहधारी संतश्रेष्ठ उद्धार कार्यपूर्ती होताच पंचत्वी समरस झाले.

श्रीसाईसमर्थ अंतर्ज्ञानी होते. भूतभविष्य वर्तमान तिन्ही त्यांना अवगत होती, हे आपणास ठाऊक आहे. आपल्या महानिर्वाणाचा काळ जवळ आल्याचे भविष्य जाणूनच त्यांनी १४ दिवसात "श्रीराम विजय" या अलौकिक ग्रंथाचे पठण त्या काळच्या भक्तांकडून करवून घेतले.

अशा या महान दैवीपुरूषाने आपले व्यक्तिमहात्म्य कधीच वाढविले नाही, उलट स्वतःच्या उपास्यदैवतेला, कुलदैवताला भजा, त्याची पूजा करा, असा मोलाचा सल्ला दिला. माझ्या गुरूने मला गुरूमंत्र दिला नाही, मी तुम्हाला कुठून देणार, असे सांगून डोळ्यात अंजनच घातले आणि बंधुभाव, प्रेम, सर्वधर्मसमभाव, देवाचे नामस्मरण, श्रध्दा आणि सबुरी या गोष्टींवरच भर दिला. अशा या महापुरूषाच्या ७०व्या पुण्यस्मरणाच्या दिनी आपण सर्वांनी त्यांचा ह्या महान शिकवणीचा अंगीकार करूया. आणि त्या सत्पुरूषाला आम्हा सर्वांचा उद्धार करण्यासाठी पुन्हा एकवार अवतार घ्या, अशी नम्र विनंती करूया.

श्रीसाईसमर्थार्पणमस्तु।

# गोदावरीच्या काठी

**पद १ले**

गोदावरिच्या कांठावरती शिर्डी क्षेत्र महान ।
साईबाबा करिती तेथे आपुले वसती स्थान ॥ १ ॥
'द्वारकामाई' म्हणती साई स्वर्गीचे सौख्य निधान ।
वेष फकिरी घेता असतां राम रहीम समान ॥ २ ॥
अगल सुचना करुनि भक्ता । देती अभय दान ।
संकटकाळी, दिसतां वैरी । मशिद आश्रय स्थान ॥ ३ ॥
पूर्व पुण्याई असतां गाठी । तसेच तप अविछिन्न ।
हात पसरुनि देत साई । प्रेमाने आलिंगन ॥ ४ ॥

**पद २ रे**

साई माझा, मी साईचा
साई माझा, मी साईचा
अनृत न बोले माझीवाचा ।
साई माता, साई पिता
भवभय हर्ता साई माझा ।
साई भ्राता, बहिण चुलता,
सत्यची बोले माझी वाचा ॥
साई दाता, साई दान्ता
देवची असे साई माझा ॥

— **डॉ. रा. सी. कापडी,** एम.बी.बी.एस.
वसुंधरा,
राजारामपुरी, ११ वी गल्ली, कोल्हापूर.

# श्री साईंच्या जीवन इतिहासातील शेवटचे पान (!)

**सदानंद चेंदवणकर**
कार्यकारी संपादक, श्री साईलीला,
श्री साईबाबा संस्थान, शिर्डी.

आपले अवतारकार्य समाप्त झाल्यानंतर अवतारी पुरुष निजस्वरुपात विलीन होऊन जातात. त्याप्रमाणे बाबांचे अवतारकार्य संपताच त्यांनीपण आपल्या महासमाधीचे प्रस्थान ठेवले. 'अनायासेन मरणं विना दैन्येन जीवनम्' हे जगातील मानवाच्या उत्कृष्ट गृहस्थाश्रमाचे लक्षण सांगितले जाते. बाबांना स्वतःचा व्यक्तिगत संसार नव्हता. पण त्यांना जनार्दन ज्या ज्या जनांत दिसत होता, त्या जनांच्या संसाराची काळजी ते वाहातच होते. पण त्या संसारातही त्यांना कधी दैन्य नव्हते. दक्षिणामिषाने संपत्ती त्यांच्या पायापुढे चालत येत असे आणि ते तिची रवानगी तितक्याच उत्कटतेने रंजल्या-गांजलेल्यांकडे व अनाथ अपंगांकडे करीत असत. तेव्हा त्यांचे देहावसानही अनायासेनच झाले. आपल्या समाधिमंदिराची त्यांनी आपल्या हाताने भक्तांकडून सिद्धता करवून घेतली होती. सारे भक्तयोग्य पुरविल्यावर बाबांना या जगात कोणतेच कर्तव्य उरले नव्हते, म्हणून ही देहस्थिती सोडताना त्यांना कोणत्याच प्रकारचा विषाद वाटला नाही.

श्री साईबाबा शिरडीत आल्यापासून त्यांच्या जवळ एक मातीची पक्की भाजलेली वीट होती. ते तिची अत्यंत काळजी घेत असत व ती रोज उशाकडे घेऊन झोपत असत. ते मशिदीत आले, तेव्हा कै. म्हाळसापती व काशीराम शिंपी तिला स्नान घालीत असत. तिचा षोडशोपचार पूजा करीत व ती नीट जपून धुनीच्या खांबाजवळ ठेवीत. रात्री तिला कपड्यात गुंडाळून बाबा उशाला घेत.

पुढे बाबांचा एक सेवक-भक्त महादू कान्हू फासले मशिदीचे काम करू लागला. तो पण ती वीट अत्यंत काळजीपूर्वक धुऊन श्रीधुनीमाईचा खांब व बाबांच्या कपड्याच्या पेटीच्या खाली असलेली सिमेंटची बैठक यामधील लहानशा फटीत ठेवीत असे व रात्री कपड्यात गुंडाळून बाबांच्या उशाकडे ठेवी. बाबांचे त्या विटेवर फार फार प्रेम असे. ते तिला कधीही विसंबत नसत. ती वीट त्यांचा जीव की प्राण असे.

एक दिवस ती कुणाच्या तरी हातून फुटली व तिचे दोन तुकडे झाले. ही गोष्ट बाबांना कळल्यावर त्यांना अतिशय वाईट वाटले. ते अक्षरशः कळवळले. त्यांनी आपले स्वतःचे थोबाड झोडून घेतले. त्यांच्या नेत्रांत अश्रू उभे राहिले. ते रडू लागले व म्हणाले,

"माझी संगतीण गेली. मी आता राहाणार नाही."

आणि खरोखरीच तसे झाले. वीट दुभंगल्यापासून आठवड्यातच त्यांनी महासमाधी घेतली.

बाबांना मानमोडी हा विकार झाला होता. त्यांना ताप येत होता. त्यांनी अन्न वर्ज्य केले होते. त्यामुळे दिवसेंदिवस त्यांच्या शरीरात शक्ती मुळीच राहिली नव्हती. त्यांना जेव्हा ताप आला होता, तेव्हा काकासाहेब दीक्षित शिरडीस होते, परंतु बाबांनी त्यांना मुंबईस पाठवून दिले.

साधारणपणे सर्व धर्माच्या पद्धतीप्रमाणे एखाद्याचा अंतसमय जवळ आला, म्हणजे त्याच्याजवळ प्रार्थना किंवा धर्मग्रंथ वाचण्याची प्रथा आहे. साईबाबांना आपला अंतकाळ जवळ आल्याची पूर्ण जाणवी झाली होती, म्हणूनच की काय बाबांनी शेवटच्या तीन दिवसांत वझे नावाच्या एका सच्छील भक्त ब्राह्मणाला 'रामविजय रामायण' वाचण्यास सांगितले. कारण बाबा हे प्रभू श्रीरामचंद्राचे एकनिष्ठ भक्त होते. या रामविजय ग्रंथाचे एकदा वाचन झाल्यावर बाबांनी वझेकडून पुन्हा पुन्हा तीन चार वेळा रामायणाचे-रामविजयाचे पारायण करवून घेतले.

शेवटचे तीन-चार दिवस तर त्यांनी आपले उठणे-बसणे-हिंडणे-फिरणे हे सारे शारीरिक व्यवहार बंद करुन टाकले.

पण अगदी अखेरच्या क्षणापर्यंत पूर्णपणे शुद्धीवर चांगल्या सावधस्थितीत सर्वांच्याबरोबर ते बोलत होते व आपल्या भक्तांना शोक करु नका, धीर सोडू नका, असा उपदेश करीत होते. त्यामुळे पुढे लौकरच आपल्यावर वज्राघात होणार आहे याची कुणालाच कल्पना नव्हती.

मंगळवार, ता. १५ ऑक्टोबर १९१८ चा दिवस नेहमीप्रमाणे उंगवला. दुपारच्या आरतीनंतर बाबांनी बापूसाहेब बुट्टी, जोग, नानासाहेब निमोणकर, माधवराव देशपांडे इ. मंडळींना घरोघर जेवावयास पाठवून दिले. ही सारी मंडळी बाबांच्याबरोबर मशिदीत जेवत असत. पण त्या दिवशी त्यांना अशा प्रकारे घरोघर पाठवून बाबांनी या १५–१०–१९१८ रोजी विजयादशमीच्या दिवशी दुपारी २ वाजून ३५ मिनिटांनी महानिर्वाण केले.

बाबांची अगदी निकटची मंडळी बाबांच्या जवळ होती.

लक्ष्मीबाई शिंदेला त्यांनी नऊ रुपये दक्षिणा काढून दिली. ती संतुष्ट झाली. ती रोज रात्री भाकर देत असे.

श्यामा उर्फ माधवराव देशपांडे द्वारकामाईत पायरीजवळच बसले होते. त्यास बाबा म्हणाले,

"श्यामा! मला आता बरे वाटत नाही. बुट्टीच्या दगडीवाड्यात आता मला घेऊन चला."

असे क्षीण आवाजात बाबा म्हणाले आणि तेच भगवान श्रीसाईबाबांचे अंतिम उद्‌गार होत.

बयाजी अप्पा कोते पाटील या नावाचा बाबांचा एक निःस्सीम सेवकभक्त बाबांच्या जवळ त्यावेळी होता. त्याच्या मांडीवर बाबांनी डोके टेकले व अखेरचा श्वास सोडला. बाबांच्या या अंतिम घडीचे वर्णन करताना श्रीसाईसच्चरित्रकार म्हणतात—

आयुर्दाय स्नेह सरतां । प्राणज्योती मंद होतां । बयाजीचे अंकावरता । देह विश्रामता पावला ॥ नाहीं पडून वा निजून । स्वस्थपणे गादीसी बैसून । ऐसा स्वहस्ते धर्म करुन । केले विसर्जन देहाचें ॥

बाबांची अंतिम क्षणाची हालचाल चालू असताना भागोजीचे त्यांचेकडे बारकाईने लक्ष होते. त्याने लगेच नानासाहेब निमोणकरांना हाक मारली, नानांनी लगेच बाबांच्या मुखात गंगोदक घातले आणि सर्वांनी "देवा । देवा"असा हंबरडा फोडला. 'देवा देवा' असा पहिला पुकारा जेव्हा भक्त मंडळींनी केला, तेव्हा बाबांनी 'आ' म्हणून होकार दिला व मगच प्रयाण केले.

इकडे केवळ बाबांच्या आग्रहाखातर जी मंडळी जेवायला गेली होती, त्यांचे जेवणाकडे लक्षच नव्हते. ते कसेबसे पोटात अन्न लोटीत होते. तोच निरोप आला, की भेटीला चला. आपल्या सबंध दुखण्यात बाबा द्वारकामाईत बसूनच असत व बसलेल्या अवस्थेतच त्यांचे देहावसान झाले.

भोजनाला गेलेल्या मंडळींना निरोप मिळताच ती धावत आली आणि बघतात तर काय सारेच काही शून्य. सगळा कारभार आटोपलेला होता. परमप्रिय पंचप्राणप्रिय बाबा पंचतत्वात विलीन झाले होते. ते सर्वांना सोडून गेले होते.

भगवान श्रीसाईबाबांची दु:खद वार्ता वाऱ्यासारखी चारी दिशांना पसरली. सर्वत्र एकच हाहाकार झाला. शिरडी गावातील सारी लहानथोर, आबालवृद्ध, स्त्री-पुरुष मंडळी आकांत करीत द्वारकामाईत धावली. आजूबाजूचे सर्व लोक अक्षरश: धावत धावत आले. सर्वत्र हाहाकार उडाला. सारेच जण दु:खाने हळहळून आक्रोश करू लागले.

"बाबा गेले! बाबा आम्हांला सोडून गेले हो!"

शिरडीतील घरोघरी मोठी गडबड उठून गेली. सर्वांच्या उरात धडधड सुरु होऊन सगळे जग बाबांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी धावून आले.

द्वारकामाईत मंडप तर गच्च भरुन गेला. बाबांचा पार्थिव देह पाहून सर्वांचे कंठ दाटून आले.

श्रीसाईंचे महानिर्वाण होण्याच्या अगोदर म्हणजे शके १८३८ च्या विजयादशमीची गोष्ट. त्या दिवशी सायंकाळी सूर्यास्ताच्या सुमारास बाबांनी एकाएकी जमदग्नीचे रुप प्रगट केले. अंगातली कफनी आणि डोईचे फडके काढून ते धुनीत टाकले. लंगोट होता तो पण फेडला व त्याचीही अग्नीला आहुती दिली आणि दिगंबर होऊन ते म्हणाले,

"करा रे आता निदान । मी मुसलमान, की हिंदू ॥"

ज्या कुणाला शंका असेल ती त्याने आताच फेडून घ्यावी, असे ते मोठमोठ्याने ओरडून सांगू लागले. हा देखावा पाहून सगळेजण गडबडले होते. तो दिवस त्यांच चावडीवर झोपण्यास जाण्याचा होता. वाजत-गाजत त्यांची मिरवणूक जाणार होती; पण पाहातात तो हे काय?

रक्तपिती झालेला भागोजी शिंदे नावाचा एक व्याधिष्ठ भक्त त्यांच्याजवळ नेहमी असे, तो धीर करुन पुढे झाला व त्याने विचारले,

"महाराज आज शिलंगणाचा दिवस आणि हे काय?"

"बा म्हणाले,

"हेच माझे शिलंगण"

आणि असे म्हणून त्यांनी आपला सटका घेऊन सणसण जमिनीवर हाणला. अशा परिस्थितीत तीन-चार तास गेले. रात्री बारा वाजले, तेव्हा कुठे स्वारी शांत झाली. नवाकोरा लंगोट ते नेसले, नवी कफनीही त्यांनी परिधान केली, डोक्यालाही एक शुभ्र फडके बांधले व नंतर नेहमीप्रमाणे मिरवणुकीने ते चावडीवर गेले. या घटनेने त्यांनी असे सूचित केले, असे म्हणतात की, भवसागर सीमोल्लंघनास दसरा हाच चांगला मुहूर्त होय.

या घटनेनंतर मधे एकच वर्ष गेले व दुसऱ्या वर्षी दसऱ्याच्याच दिवशी बाबांनी अशा प्रकारे देह ठेवला. या घटनेची आठवण शिरडीकरांना झाली. अशा प्रकारच्या बाबांच्या आठवणी याप्रसंगी जो तो सांगू लागला.

१९१८ सालची विजयादशमी हा आपल्या प्रयाणाचा मुहूर्त म्हणून बाबांनी ठरविला होता, असे आणखीन एका गोष्टीवरुन दिसून येते. शिरडीचे ग्रामपाटील रामचंद्र दादा हे एकदा खूप आजारी पडले. त्यांचे दुखणे खूप जोरावले. वेदना असह्य झाल्या. अशा स्थितीत एका मध्यरात्री त्यांना आपल्या उशाशी साईबाबांची मूर्ती दिसली. पाटील दीनवाणाने बाबांना उद्देशून म्हणाले,

"बाबा, आता मला हे दुखणे नाही हो सोसवत मरण केव्हा भेटेल याची मी वाट पाहातो आहे."

त्यावर बाबा अत्यंत दर्याद्र स्वरात म्हणाले,

"अरे, तू काही काळजी करु नकोस. तुझ्यावरचे गंडांतर टळले. तुला काही भीती नाही, परंतु तात्याची (तात्या गणपत पाटील कोते) मला मात्र धडगत दिसत नाही, शके १८४० च्या विजयादशमीला (सन १९१८) तात्या अक्षयपद पावणार खास. पण हे त्याला सांगू नकोस. उगीच तो मनाशी झुरत राहील."

त्या दिवसापासून रामचंद्र पाटील बरा होत गेला. बाबांनी सांगितलेली भविष्यवाणी त्याने फक्त बाळा शिंप्याच्या कानावर घातली होती. आणखीन कोणाकडे तो बोलला नव्हता.

शके १८४० चा भाद्रपद सरला आणि खरोखरच तात्याबाने बिछाना धरला आणि आता आश्विन मास डोकावू लागण्याच्या आधी बाबांनाही शिरशिरी भरली, तात्याबाला दुखण्याच्या यातना फार होत. पण त्याचे चित्त सदैव बाबांच्या स्मरणात लागलेले असे. इकडे बाबांचे दुखणे वाढले. दसरा जवळ आला, तसा रामचंद्र पाटील बाळा शिंपी यांना भयाने घाम सुटला. दसऱ्याला तात्याची नाडी अगदी मंद झाली. प्राण पण गेले...

पण नवल असे, की इकडे त्याच दिवशी बाबांनी देह ठेवला आणि तात्या आजारातून वाचून हळूहळू बरा झाला. या घटनेसंबंधी साईसच्चरित्रकार लिहितात :

असें—पुढे नवल वर्तले । तात्याचेंहि गंडांतर टळलें ।
तात्या राहिले, बाबाच गेले । जणूं मोबदला केले की ॥
पाहा आता बाबांची वाणी । नांव दिधले तात्याचे लावुनी ।
केली तयारी निजप्रयाणी । वेळा न चुकवुनी अणुभरा ॥

तेव्हा सांगावयाची गोष्ट, अशी की बाबांनी आपल्या महासमाधीची वेळ अगोदरच ठरवून ठेवली होती, हे निश्चित.

श्रीबाबांच्या देहावसानाने कष्टी दु:खी झालेल्या साईभक्तांचा पहिला दु:खावेग ओसरल्यावर आता बाबांच्या देहाचे काय करावे, हा विचार सुरु झाला. बुट्टींच्या वाड्याच्या चौकात ठेवावे, असे बाबांचे पूर्वीचे सांगणे होते, पण आता मुसलमान भक्त म्हणू लागले, ते मुसलमानांच्या कबरस्तानात नेऊन पुरु या. पण तिथले ग्रामपाटील श्री. रामचंद्रदादा हे मोठे करारी होते. ते म्हणाले,

असोत तुमचे विचार काही । समूळ काही आम्हा ते मान्य नाही ।
वाड्याबाहेर इतरां ठायो । क्षणभरीही साई ठेवू नये ॥

आणि मग सारेजण गप्प बसले. तरीपण दोन दिवस भयंकर वादावादी झाली, तेव्हा काकासाहेब दीक्षितांनी कलेक्टरसाहेबांना तार पाठवून त्यांची मदत घेतली. त्यांनी साने नावाच्या मामलेदाराकडे हा निवाडा करण्याचे काम सोपविले. त्याने लोकांची मते घेतली, ती हिंदूंच्या बाजूने अधिक पडली व शेवटी बाबांचा देह बुट्टींच्या वाड्यात समाधीसाठी नेण्याचे ठरले, व वादावादी थांबली.

श्रीसाईबाबांची समाधी ही बाबांनी निर्वाणापूर्वीच बांधवून घेतली होती. नागपूरचे प्रसिद्ध साईभक्त श्रीमंत गोपाळराव उर्फ भाऊसाहेब बुट्टी यांच्या मनात शिरडीला आपल्या मालकीचा स्वतंत्र वाडा असावा, असे आले. बाबांनी त्यांना स्वप्नात येऊन वाडा आणि देऊळ दोन्ही उभारा, अशी आज्ञा केली होती. त्याप्रमाणे वाडा उभा झाला. बाबांनी बांधकाम मंजूर केले होते. या वाड्याच्या गाभाऱ्यात श्रीमुरलीधरची मूर्ती एका चौकावर सिंहासन करुन बसवावी, असे त्यांच्या मनात होते. त्यालाही बाबांची अनुमती मिळाली होती. पण त्याचवेळी बाबा म्हणाले होते,

देऊळ पूर्ण झालियावरी । येऊ की वस्तीस आपणही ॥

तसेचे ते असेही म्हणाले होते —

वाडा पुरा झालिया पाठीं । आपुलेसाठीच तो लावुं ॥

आणि काय चमत्कार ही कामे पूर्ण होत असतानाच बाबांनी इहलोकाचा त्याग केला व त्यांनी सांगितल्याप्रमाणेच त्यांचे परमपवित्र असे शरीर वाड्याच्या गाभाऱ्यात ठेवण्यात आले. साईसच्चरित्रकार म्हणतात :

मग ते पवित्र साई शरीर । जाहले गाभारियामाजी स्थिर ॥
वाडा जाहला समाधिमंदिर । अगाध चरित्र साईचें ॥

श्रीबाबांच्या देहाला भूमातेच्या उदरीच का स्थान देण्यात आले. अग्निसंस्कार का करण्यात आला नाही, याचे कारण तर हिंदू पद्धतीत संन्याशांना अशी समाधीच देत असतात. बाबां लौकिक संस्कारांच्या पलिकडचे असल्यामुळे वाच्यार्थाने संन्याशी नव्हते हे खरे, तथापि रुढार्थाने ते खरे संन्यस्त होते आणि दुसरे कारण असे, की त्यांच्या भक्तांत त्या वेळी हिंदूप्रमाणे मुसलमान भक्तही बरेच होते, तेव्हा त्यांच्या पद्धतीप्रमाणे त्यांचा देह भूमिगत केल्याने त्या जमातीलासुद्धा थोडे बरे वाटावे.

बाबा महासमाधिस्थ झाल्यावर त्यांच्या पार्थिव देहावर फुलांच्या राशीच्या राशी पडल्या. हजारो लोक 'साईबाबा' असे म्हणत आक्रोशत होते. तो सारा प्रसंग हृदयाला पीळ पाडणारा होता.

– आणि अगदी याच वेळी शिरडीत मुसळधार पाऊस सुरु झाला. एका महान संताचे स्वर्गात स्वागत करण्यासाठी जणू आकाशात गडगडाट झाला, व विजा चमकू लागल्या. दु:खावेग आवरुन लोक घरोघरी परतले.

हिंदुपद्धतीप्रमाणे बरोबर तेराव्या दिवशी श्रीबाबांचे उत्तरनिधान (श्राद्ध) करण्यात आले, तिलांजली, पिंडप्रदान, मासिक श्राद्ध इत्यादी विधी यथाशास्त्र ग्रामस्थ ब्राह्मणांच्या सहकार्याने करण्यात आले. हा सगळा कार्यक्रम यथोचित असा साकोरीच्या श्री उपासनीमहाराजांच्या उपस्थितीत पार पडला. ब्राह्मणभोजन, अन्नसंतर्पण, दक्षिणाप्रदान इत्यादीसाठी शेकडो रुपये भक्तांनी खर्च केले. मुंबईतील विलेपार्ले येथल्या श्री. शामराव जयकर यांनी बाबांच्या हयातीत बांबांना विनंती करुन आपल्या सफाईदार कुंचल्यातून उतरवलेली बाबांची छानदार प्रतिमा बाबा द्वारकामाईत जिथे कठड्यावर हात टेकून जिथे बसत असत, तिथे स्थानापन्न करण्यात आली. ती पाहून साई प्रत्यक्ष इथेच आहेत, अशी भावना होते.

जाहली साईदेह निवृत्ति । प्रतिमा-दर्शनें होय अनुवृत्ति ॥
वाटे निजभक्त भावार्थी । पुनरावृत्तीच ही मूर्त ॥

श्री साईमहाराज निर्वाण पावले किंवा अदृश्य झाले, तरी पूर्वीचे दत्तावतार श्रीनृसिंहसरस्वतीस्वामी गाणगापुरादी स्थानी आणि श्रीअक्कलकोटस्वामी अक्कलकोटी किंवा रामदास तुकारामादी संत त्यांच्या निर्वाणस्थळी गुप्तरूपाने वास करीत असतात, ही जशी अनेकांची श्रद्धा आहे, तशीच बाबा शिरडीत गुप्तरुपाने वास्तव्य करुन आहे, अशी बाबांच्या भक्तांचीही गाढ श्रद्धा आहे. श्रीसाईबाबा गुप्तरुपाने आजसुद्धा शिरडीतच आहेत व एकनिष्ठ भक्तांचे मनोरथ ते पूर्वीप्रमाणेच पुरे करीत असतात.

श्रीरामदास्वामीनी मृत्युनिरुपण करताना महान वीर, योद्धे, मुत्सद्दी, राजेमहाराजे, पंडित, शास्त्रज्ञ इत्यादी सर्व हे जग सोडून जातात. मृत्यू कुणाचीही गय करीत नाही. फक्त एकच राहातात, ते कोण? तर स्वरुपाकार झालेले संत. कारण त्यांनी ज्ञानयुक्त होऊन मृत्यूला जिंकलेले असते असे म्हटले आहे.

सामान्य लोकांच्या बाबतीत मृत्यूनंतर व्यक्तीचा लिंगदेह काही काळ तरी अंतराळात वावरत असतो आणि तो आप्तेष्टांना व प्रेमीजनांना मधून मधून भेट देतो, असे त्या शास्त्रातले तज्ज्ञ सांगतात, आणि अनेकांच्या ते अनुभवासही येत असते. श्रीसाईबाबांसारख्या संतांच्या किंवा अवलियांच्या बाबतीत हाच नियम लावला, म्हणजे त्यांच्या प्रयाणानंतरही काही काळतरी त्यांचा लिंगदेह त्यांच्या भक्तांच्या मनोकामना पूर्ण करीत असतो, असे मानण्यास हरकत नाही. या दृष्टीने बाबांच्या प्रयाणानंतर त्यांचे नामस्मरण किंवा समाधिपूजन, दर्शन इ. गोष्टी त्यांच्यावर एकनिष्ठ श्रद्धा ठेवणाऱ्या भक्तांना लाभदायक ठरलेल्या आहेत. असे जे त्यांच्या चरित्रात सांगितले आहे त्यावर विश्वास ठेवण्याला मुळीच हरकत नाही. श्रीसाई समर्थ रामदासस्वामी यांच्यानंतर अवघ्या दोन शतकांच्या आतच सच्चिदानं विश्वंभर श्रीअवधूत दत्तात्रेयांनी श्रीसद्गुरु साईबाबांच्या रुपाने या भूमीवर पुन्हा अवतार घेतला व १८३८ पासून १९१८ पर्यंतच्या ८० वर्षांच्या कालखंडात हिंदुमुसलमानांना सन्मार्गाला लावण्याचा यत्न केला. खरोखरच श्रीसाईबाबा हे महान पुरुष होऊन गेले.

श्रीसाईबाबांचे महानिर्वाण झाले त्या दिवशी रात्री मुंबई प्रसिद्ध साईभक्त श्री. हनुमान प्रसाद जोशी यांच्या घरातील बाबांची तसबीर एकाएकी गदगदा हलू लागली. पार्ल्याच्या श्री. माधवराव दीक्षितांना नाशिकच्या एका महान योग्याने चिरसमाधी घेतल्याचे स्वप्न पडले. पंढरपूरास दासगणूंनाही असेच स्वप्न पडले. आणि दुसऱ्या दिवशी लक्ष्मण भट नावाच्या एका साईभक्तांना दृष्टांत झाला. सांताक्रुझला राहणाऱ्या सौ. प्रधान यांच्या बहिणीला 'ट्रंकेतील पिवळा पितांबर समाधीवर घालण्यासाठी पाठव' असा दृष्टांत झाला, तर काकासाहेब महाजनी नामक साईसेवकाला 'ऊठ, माझा तेरावा दिवस आहे, तो तू कर' असे स्वप्न पडले.


बाबांच्या जवळ नेहमीच एक लहानसे बोचके असे. त्याला ते कुणालाही हात लावू देत नसत. त्यांच्या महानिर्वाणानंतर ते उघडून पाहता त्यातँ काशीरामने प्रथम दिलेली हिरवी कफनी व हिरवी टोपी सापडली, तर माधवराव देशपांड्यांकडून बाबांची चिलीम व सटका मिळाला.

श्रीसाईबाबा आज शरीररूपाने जरी नसले, तरी त्यांनी आपल्या निरनिराळ्या त्तांना मागच्या कित्येक जन्माची ओळख करुन दिलेली आहे. अर्थात बाबा वीवर सारखे येत आहेत, असतातच. त्यांनी सर्व भक्तांना सांगूनच ठेवलेले आहे.


जरी हे शरीर गेलो मी टाकून । तरी मी धावेन भक्तांसाठी ।
नित्य मी जिवंत जाणा हेंचि सत्य । पाहावी प्रचीती अनुभवे ॥

बाबांचा हा अनुभव अनेक, असंख्य भक्तांना जगभर येत आहे.

बाबांची फुटलेली वीट महादू फासलेने जशीच्या तशीच बाबांच्या बुट्टीवाड्यातील समाधीत त्यांच्या उशाकडे ठेवली आहे, असे पुढे कै. माधवराव देशपांडे ऊर्फ 'श्यामा' व कै. तात्या पाटील कोते यांनी सांगितले. बाबांची ही वीट



श्री बाबांचा अंतिम क्षण



श्री. रामचंद्र पाटील, शिर्डीचे ग्राम पाटील यांच्याच आटोकाट प्रयत्नांमुळे श्री बाबांचे पार्थिव शरीर बुट्टी वाड्यात राहिले आहे. श्रींची ही समाधी आज जागृत स्थान म्हणून ओळखली जाते.

भक्तशिरोमणी पुंडलिकाने श्रीकृष्ण भगवानांना पंढरी क्षेत्रात बसावयास दिलेल्या विटेचे व श्रीपांडुरंग त्या विटेवर उभे आहेत तिचे दर्शक असून बाबा हे विठ्ठल-कृष्ण स्वरुप होते, असे सिद्ध होते. श्रीपांडुरंगाने वीट पायाखाली घेतली व बाबांनी ती उशाकडे घेतली, हाच काय तो फरक.

श्रीसाईबाबांचे महानिर्वाण झाल्यावर बरोबर चौदा दिवसांनी म्हणजे २८ ऑक्टोबर १९१८ रोजी बाबांचे भक्त, सेवक श्रीनानावल्लीमहाराजही पैगंबरवासी झाले. ते बाबांचे मुसलमान भक्त होत.

श्रीबाबांचे आणखीन एक मुसलमान भक्त होते. त्यांचे नाव होते फकीर रोहिला. त्यांच्या तोंडामधे नेहमी 'अल्ला हो अकबर' हाच काय तो शब्द असे. रात्री अपरात्री सुद्धा शिरडीतील रस्त्यावरुन 'अल्ला हो अकबर' हे मोठमोठ्याने ओरडत फिरत व त्यामुळे शिरडीकरांची झोपमोड होत असे व त्याबद्दल अनेक शिरडीकरांनी बाबांकडे त्यांच्याबद्दल तक्रार केली होती. पण तो आपल्या देवाचे नाव घेतो आहे, असे त्यांनी लोकांना सांगितले.

**दसरा संदेश....**

# श्रीसाईबाबांची शिकवण – आठवण ठेवा

**– श्री. रमेश धोंडीबा शेलार**
स. नं. ८, नवी खिडकी, यशवंतनगर, पुणे - ६.

महाराष्ट्र म्हणजे संतांची जन्मभूमी होय. या जन्मभूमीवर ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, चांगदेव, इ. सारखे अनेक थोर संत होऊन गेले. त्यांनी सर्वांना आपल्या अभंग, कीर्तन व प्रत्यक्ष उपदेशातून धार्मिक समता व एकात्मतेची शिकवण दिली. याच महाराष्ट्राच्या पुण्यभूमीवर संत परंपरा असलेल्या अहमदनगर जिल्ह्यात शिर्डी या लहानशा खेडेगावात श्री सद्‌गुरू साईनाथ महाराज अवतरले

श्रीसाईनाथांच्या पुण्यस्पर्शाने एकेकाळच्या खेडे असलेल्या शिर्डीस आज एखाद्या महानगरीय शहराइतके महत्व आले आहे.

श्रीसाईबाबांचे सर्वधर्मसमभाव हे अत्यंत महत्वाचे तत्त्व होते. त्यांनी कोणत्याही माणसाला जात, धर्म, वर्ण, नाते गोते इ. पैकी कोणतेही विशेषण लावले नाही. जवळचे असले आणि परकीय किंवा त्यांचा तिरस्कार करणारे जरी माणसे होती,तरी त्यांचे मनात त्या सर्वांबद्दल प्रेम, आदर, करूणा असे. ते सर्वांना समानतेची वागणुक देत असत. म्हणजेच त्यांचे शिकवणीत बंधुत्व, आत्मियता, समभाव, एकात्मता इ. होते. त्याप्रमाणे आपण त्यांच्या शिकवणीची आठवण ठेवली पाहिजे, जोपासना केली पाहिजे. एवढेच नव्हे,तर त्यांचा शिकवणीचा मार्ग आचरणात आणला पाहिजे. नाही तर, नळी फुंकिली सोनारे। इकडून तिकडे गेले वारे॥ अशी गत होईल. तेव्हा साईबाबांची शिकवण आचरणात आणणे,म्हणजे आपला जन्मसिध्द हक्क असून त्याचे अंगिकरण करणे,आपले आद्य कर्तव्य आहे,असे साईभक्तांनी समजून प्रतिज्ञा केली पाहिजे. बाबांच्या पेटत्या धुनीकडे पाहिल्यास असे वाटते की, आपल्या मनातील एकमेकांबद्दलचे द्वेष, वैर, गैरसमज, अंध:कार इ. जाळून टाकून प्रकाशासारखे तेजस्वी व्हावे, परोपकारी व्हावे, असे घडावे म्हणूनच बाबांनी धुनी पेटविलेली आहे. बाबांची पुण्यतिथी दसरा या दिवशी बाबांच्या शिकवणीचे स्मरण करून त्यांनी घालून दिलेल्या मार्गाप्रमाणे जीवनाची वाटचाल करावी.

**आपण सारे प्रवासी घडीचे, नांदू सुखे संगती.**

# श्रीसाईनाथांचे महानिर्वाण

– डॉ. कु. इंदुताई नाईक
सीताकुंज, मुक्ता नर्सिंग होम,
मुंबई-पुणे रस्ता, लोणावळा.

कलियुगात जेव्हा धर्म ग्लानी होते, सगळीकडे सर्वनाशाच्या गोष्टी होत असतात, सगळीकडे हाहाःकार माजतो, सारे अशांत होते, तेव्हाच संतांचे अवतरण ह्या भूतलावर होत असते.

विसाव्या शतकातील.अवतीर्ण झालेल्या महान आत्म्यात शिरडीपती श्रीसाईनाथ हे अग्रगण्य आहेत. श्रीसाईबाबांचे अवतरण हे मानवाच्या कल्याणासाठीच झाले आहे.

मानवाला त्यांची खरी ओळख करून देऊन आत्मजागृतीचा उपदेश बाबांनी आपल्या अवतारकाळात केला. आपल्या मधुर वाणीने सान्यांना माये पासून प्रवृत्त करून खऱ्या ज्ञानाचा पान्हा या आईने पाजला. मायेच्या पाशांच्या गोष्टी पटवून देऊन भक्तांना निवृत्तीकडे नेले. मानवाला सत्याची म्हणजे आत्म्याची जाणीव करून दिली.

परम भाग्यवंतांनाच मानव जन्म मिळतो कारण याच जन्मात परमेश्वर मिळवता येतो आणि आपल्या जन्मजन्मांतराचे सार्थक म्हणजे मुक्ती मिळते.

बाबा सांगतात, "आत्मा सत्य आहे. शरीर नाशवंत आहे. आत्मजागृती करा, देहाभिमान सोडल्याशिवाय, अहंकार गेल्याशिवाय स्वस्वरूपाची ओळख होणार नाही" ह्यासाठी बाबांनी अगदी साधे प्रसंग भक्तांवर आणून त्यांना पटवून दिले.

बाबांनी आपल्या साऱ्या भक्तांमध्ये आत्मजागृती केली. त्यांनी आपल्या अवतारकाळात आत्मजागृती केलीच, परंतु त्यानंतर देखील बाबांचे वर जे श्रद्धा ठेवून आहेत,त्यांना सुद्धा सत्याचे ज्ञान होऊन आत्मजागृती होते. असे कित्येक प्रसंग बाबांच्या निर्वाणानंतर ह्या सत्तर वर्षाच्या काळात मानवाला आले आहेत. केवळ भारतातच नाही तर परप्रांतात देखील बाबांनी आपल्या भक्तांची आत्मजागृती केली आहे.

कलियुगातील मानवाच्या आत्मजागृतीचे आपले कार्य संपवून श्रीसाईबाबा आपल्यातून शरीराने निघून गेले त्याला सत्तर वर्षे झाली. महान आत्माच्या या गमनाला अशा तऱ्हेने जीवन जगत जगाच्या उद्धार करणाऱ्या व्यक्तीच्या देहत्यागाला महानिर्वाण म्हणतात.

परंतु बाबा खरंच गेलेत कां? नाही आज बाबा आपल्या साऱ्या भक्तांच्या हृदयात वसत आहेत, भक्तांच्या मुखाने बोलत आहेत, डोळ्याने बघत आहेत. बाबांच्या वचनाची प्रचिती अजून आपल्या सर्वांना येत आहे. बाबा सांगतात,

'जरी हे शरीर गेलो मी टाकून, तरी मी धावेन भक्तांसाठी'
नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य, नित्य घ्या प्रचिती अनुभवे।

जर ह्याचा अनुभव सर्वांनाच आहे मग बाबा अजून आपल्यातच आहेत. त्यांच्या शरीराचे जरी महानिर्वाण झाले असले तरी हा महात्मा परमात्मास्वरूप आहे आणि हेच परमसत्य आहे.

जाणुनी घे तू आत्मा मनुजा।
विसरूनी मी पण आणि तनुया।।
अहंपणाची करूनी आहुती
जाळूनीयां देहासक्ती
आठवूनी या साईईषा।।
आत्मा पवित्र असे अविनाशी
युगा युगाचा असे प्रवासी
योग बळे तो पवित्र करूया।।
मिलन होता परमात्म्याचे
आत्मानंद सदैव विलसे
परमानंदी क्षण अनुभवू या।।

## । साईरुपी यती हे आले ।

नसे भास हा साईरुपी यती हे आले
राहिले ते शिर्डी घर मानूनी आपुले
शिळा सिंहासनी शोभले वैरागी साई
त्रिभुवनी त्यांची सदादिव्य दृष्टी राही
सुवर्ण पाऊले पाहिली आम्ही शिर्डीला
अध्यात्माचा त्यांनी अचूक मार्ग दाविला
साईनाम कंठातूनी ओठावर हो स्फुरले
याची देही याची डोळा साईरूप पाहिले
सेवा चंदन होऊनी भक्त देहाने झिजला
जीवन समईची वात होऊनी तो जळला
श्रद्धा सबुरीची दोन फुले मनी वाहता
कलियुगाचे असे तुम्ही एकमेव विधाता
गर्दीही स्वजनांची असे त्यांचे भोवती
त्यांचे संगे मायेची अखंड जुळली नाती
भक्ताला चरणापाशी येण्याची झाली घाई
आपुला करारनामा पुरा करा आता तुम्ही साई

**— सौ. वसुंधरा रामराव चोरे**
८०३ सी, लक्ष्मी भुवन,
डॉ. आंबेडकर, दादर, मुंबई–१४.

# शोक

**– श्री. एन्. पी. चव्हाण**
सेन्ट्रल रेल्वे कॉलनी नं. १९८,
रूम नं. १५, गनपावडर रोड,
माझगांव, मुंबई - १०.

आज विजयादशमी (दसरा) सर्व देवांचे साह्य घेऊन दुर्गादेवीने महिषासुराचा वध केला तो दसरा. पांडवांनी युद्धात विजय मिळविला तो दसरा. केवढा मोठा दिवस! शुभकार्याची सुरवात पण याच दिवशी करतात, ते ही खरंच. पूर्वी ह्या शुभदिवशी सीमेवर रेड्याचे बलिदान स्मरणार्थ करीत.

श्रीसाईबबा शरीराने आमच्यातून मंगळवारी ता. १५–१०–१९१८ रोजी अंदाजे २-१८ ला पंचमहाभूतात विलीन झाले. मग तुम्हीच सांगा, आनंद मानावा की रडावे, पण मी रडणार नाही. मी रडू कां? की ज्या फकिराने आपला देह व आयुष्य रंजल्या गांजल्यांकरीता झिजविला, दिनरात्रीचा विचार तर केला नाहीच नि आनंदाला कधीच मावळू दिले नाही, हाक मारता मदतीला आजही येतो....

त्या गोष्टीला आज ७० वर्षे पूर्ण होत आहेत. मला वाटते, साई गेलेलेच नाहीत. आजही श्रध्देने बोलविता धावून येतात, चुकलेल्यांना मार्ग दाखवितात, संकटाला भक्तांच्या जवळ येऊ देत नाहीत, आलेच तर उदी रूपी संजीवनी देऊन बरे करतात. प्रसंगी धोक्यातून वाचवितात. कोणी काहीही म्हणो, श्रीसाईबाबा दिवंगत झाले, यावर माझा विश्वासच बसत नाही, व मी ते कबूलही करणार नाही, त्रिवार नाही.

आजचा दिवस ७० वर्षापूर्वी कसा होता, ते माझ्या वाचण्यात आले व ऐकले ते सर्वांना समजणे, माझ्या मते फार महत्वाचे आहे, कारण श्रीसाई हे आपले आराध्य दैवत.

१५ तारीख येण्यापूर्वी बाबांना बारीक... बारीक तापाने घेरलं. बाबा समजून चुकले की, आता आपले कार्य पूर्ण होत आलं व म्हणून त्यांनी श्री. वझे (साईभक्त) कडून रामविजय ह्या ग्रंथाचे दोन-तीन वेळा पारायण करून घेतले. ता. १५, मंगळवारी दुपारी सर्व भक्तमंडळींना जेवण्यास पाठविले. पण गेली नाही ती लक्ष्मी की जिने नित्यनेहमी बाबांना जेवण पुरविले. २-१५ ला बाबा कासावीस होऊ लागले. मला बुट्टी वाड्यात घेऊन चला... बाबांना बुट्टीवाड्यात आणण्यात आले. नि हिंदू को राम.... राम मोमीन को अल्ला... अल्ला कहनेवाला महासंत त्यागी, कसलीच आस नसलेला हिरा निखळला. शिर्डी अधारात विलीन झाली. अहंकार उडाला. संपूर्ण शिर्डी अश्रूंनी वाहून निघाली. त्याचं वर्णन मी पामराने काय करावे–

अशी माझी साई माऊली कृपेची साऊली आम्हां सर्वांना पोरकी झाली त्या महासंताला बडेबाबाला माझा शतशः प्रणाम्!

# संतांची शिकवण आणि भक्तिमार्ग

— श्री. विठ्ठल महाजन
मु. पो. कोतलूक,
गुहागर, रत्नागिरी.

गुरूर्ब्रम्हा गुरूर्विष्णू गुरूर्देवो महेश्वरः
गुरूःसाक्षात परबम्ह तस्मै श्रीगुरवे नमः

आपला भारत देश भक्तिभिमुख आणि संतप्रिय असल्यामुळे संत अगर महात्मे हे देवापेक्षाही थोर आहेत, असे अगदी पुरातन काळापासून मानीत आला आहे. याचे उदाहरण म्हणजे पुरातनकाळी भक्त दामाजीसाठी प्रत्यक्ष वैकुंठपती रूक्मिणीवरांना महार बनून यावे लागले, संत चोखोबांची ढोरे उचलण्यासाठी त्यांच्याकडे प्रत्यक्ष जगदात्मयांना राबावे लागले, संत एकनाथांच्या घरी प्रत्यक्ष जगज्जीवनांना पाणी भरावे लागले, संत कबीरांचे शेले प्रत्यक्ष श्रीरामांना विणावे लागले, संत जनाबाईसाठी प्रत्यक्ष परमात्म्यांना दळण दळावे लागले, तर संत तुकोबा, गोरोबा इत्यादींच्या काजासाठी प्रत्यक्ष दीनदयाळांना राबावे लागले. म्हणूनच संत हे सच्चिदानंद प्रभूचे खरे यजमान आहेत. यास्तव या देशातील प्रत्येक सनातन माणसाला संत आणि संतवाङ्मयाबद्दल विश्वासात्मक आदर, आवड व आस्था आहे. अशी किती तरी थोर संत मंडळी या भारतभूमीवर अवतरली आणि त्यांनी आपले अवतारकार्य आपापल्या पध्दतीने पारं पाडून निघून गेली. आपल्या सनातन आणि पुरातन हिंदू धर्माचा आणि संस्कृतीचा सूक्ष्मपणे विचार केला असता, असे आढळून येईल की, भारत देशात असंख्य संत महात्म्यांनी या विश्वातील अध्यात्माचे गहनगूढ असे कोडे स्वतः उकलून त्यातील अमोलिक असे तत्वज्ञान अगदी हळूवारपणे चिखलात रूतून बसलेल्या कमळाप्रमाणे जीवनात अडकलेल्या मानवप्राण्यांना सेवन करण्यास शिकविले. संतांची शिकवण म्हणजेच जीवात्मा आणि परमात्मा यांना जोडणारा एक दुवा आहे, आणि संत हेच खरे मार्गदर्शक गुरू आहेत, हे सिध्द करून दाखविले आहे. भारतवासियांचे भाग्य थोर म्हणून प्रत्येक पिढीत कुठे ना कुठे कोणीतरी महापुरुष जन्माला येतात आणि जडजिवोध्दार करतात.

संत किंवा महापुरूष हे आईबापापेक्षाही थोर व उपकारक, इतकेच नव्हे तर देवापेक्षाही थोर व उपकारक आहेत. आईबाप जन्म देणारे असून, संत हे जन्ममरण दूर करणारे आहेत. त्याचप्रमाणे देव हा कर्माप्रमाणे फळ देणारा असून,संत हे कर्माकर्म चुकविणारे आहेत.

प्रत्येक धर्मात संत व द्रष्टे असतातच. मनुष्याचा धर्म कोणताही असो, त्याने आपल्या सद्गुरूवर अढळ श्रध्दा ठेवून जर गुरूंनी दिलेल्या हितोपदेशाने आत्मस्वरूपचिंतन केले,तर सुखदुःखाच्या पलिकडे जाऊन अखंड आनंदनिधानाची प्राप्ती करून घेणे त्याला सहज शक्य होते.

**निर्मळ प्रेम हेच परमात्म्याचे सत्यस्वरुप होय.** प्रत्येक माणसाच्या ठायी ईश्वराचा अंश वास करीत असतो. ईश्वरी अंश म्हणजेच प्रेम आणि प्रेम हे प्रत्येकाच्या हृदयात वास करीत असते. जेव्हा लोक या ईश्वरी अंशाला, प्रेमाला आपले जीवन समजू लागतील, तेव्हा सारी भांडणे मिटतील, तळमळ शमेल आणि मग मरणाचे भय राहणार नाही.

कुठलाही माणूस घ्या, मग तो खुनी असो, दरोडेखोर असो अगर ज्याला पाषाणहृदयी म्हणतात, असा एखादा असो, त्याच्याजवळ प्रेम हे असतेच.

तुकारामांनी हाच सद्विचार पुढील शब्दात व्यक्त केला आहे.-"नम्र झाला भूतां। तेणे कोंडीले अनंता।। " तुमचे अंतःकरण शुध्द प्रेमाने भारावले असेल, तर गुरूकृपेचा लाभ आपणास झाला म्हणून समजा. अंधारात देखील कोणाही विषयी थोडासुध्दा द्वेष असू नये. इहलोकातील अशा तऱ्हेच्या प्रेमाचे उत्कृष्ट उदाहरण मातृप्रेमाचे देता येईल. आई आपल्या मुलावर ज्याप्रमाणे प्रेम करते, तसे प्रेम जर आपण सर्व प्राणीमात्रांवर करू शकलो, तर परमेश्वर आपल्या अंतःकरणात वास करीत आहे, याची जाणीव आपणास खात्रीने होईल. संतांची वचने व त्यांचा सहवास यामुळे आपल्यात असलेल्या या सत्य प्रेमाची साक्ष मिळते व ते जागृत होते. अशा प्रेमाचे लक्षण तुकारामांनी, "ऐशी कळवळ्याची जाती। करी लाभाविण प्रीति" या शब्दात सांगितले आहे. मनुष्य नेहमी सुखाच्या मागे लागलेला असतो।

या जगातील प्रत्येक मनुष्य सुख कसे मिळेल, किंवा मिळालेल्या सुखाची वाढ कशी होईल, अगर दुःख कसे टळेल किंवा ते कमी कसे होईल, यासाठी सदैव धडपड करीत असतो. परंतु प्रत्यक्ष अनुभव मात्र त्याला विपरित येतो. कोणत्या ना कोणत्या गोष्टीची कमतरता भासल्याने तो सदैव दुःखात बुडून जातो. प्रथमतः वाटणारी सुखे दुःखास कारणीभूत होतात. दुःखं कमी न होता उलट ते सारखे वाढतच जाते. परंतु खरे सुख कशात आहे ते कळत नसल्याने आज नाही तर उद्या तरी सुख मिळेल, या खोट्या आशेवर मनुष्य आपल्या आयुष्याचा काळ कंठीत असतो. अशा स्थितीतच मृत्यूचा घाला त्याचेवर येतो. या उदाहरणाने सावध न होता उलट दुसरा मनुष्यही तोच कित्ता गिरवीत राहातो. परंतु खरे व चिरकाल टिकणारे सुख कशात आहे, याचा मुळीच विचार करीत नाही. अतएव या संसारातील सुखमय भासणाऱ्या गोष्टी मृगजलाप्रमाणे नाशिवंत असून दुःख उत्पन्न करणाऱ्या अगर दुःखाचीच वाढ करणाऱ्या आहेत, अशी शेवटी खात्री पटते. परंतु अशी वस्तुस्थिती असतानाही कोणी शहाणा होत नाही! उलट तो दुःखाच्या जाळ्यात अधिकाधिक गुरफटतो व बाहेर पडण्यास त्याला मार्ग सापडत नाही. अशा परिस्थितीत प्रत्येक मनुष्याने आपल्या दुःखाचे निर्मूलन करून अत्यंत शाश्वत सुख मिळवून आपले कल्याण करून घेणे अत्यंत आवश्यक आहे.

**आपत्ती निरसनाचा भार गुरुवर किंवा देवावर घालू नये** — प्रापंचिक गोष्टीसंबंधी आपल्या गुरूंना त्रास देणे हे आपल्याच अवनतीस कारणीभूत असते. कारण आपले मन सांसारिक अडचणींच्या निरसनास जास्त महत्व देते व गुरूकडून त्या निरसन

झाल्या नाहीत, म्हणजे गुरूबद्दल असलेल्या श्रध्देस डळमळीतपणा येऊ लागतो. तरीसुध्दा काहीजण असे प्रश्न करण्याचे सोडीत नाहीत, "महाराज मला चार हजार रूपयांचे कर्ज झाले आहे, त्यामुळे मनास स्वस्थता नाही, तरी आपण मला पदरात घेऊन अभय करा." अशी विनंती काहीजण करतात, तर काहीजण 'माझा शारीरिक रोग केव्हा जाईल? मला या पीडा असह्य होत आहेत, तेव्हा कृपा करून मला जवळ करा व आपला आशीर्वाद द्या' असे म्हणताना आढळतात. अशा प्रकारच्या अनेक सांसारिक अडचणी गुरूंनी निवारण कराव्यात, अशी त्यांची मनीषा असते. मला हे मान्य आहे की, संसारातील संकटे हीच मनुष्यास उन्नतीप्रद होतात. या संसारव्याधींना कंटाळल्यावर कोणीतरी कोणाही साधुच्या आश्रयार्थ जात असतो व त्याचे पूर्वपुण्य बलवत्तर असेल, तर असा मनुष्य स्वानुभवी संतांच्या संगतीत गेल्यास संकटत्रस्त मनाच्या भावनावश स्थितीत संतसज्जन सांगेल त्यावर मनोमन श्रध्दा ठेवून व पूर्णपणे शरण जाऊन व मंत्रजप करून सन्मार्गासही लागतो. तरीपण त्यांचे सांसारिक संकट निवारण करणे, हे त्या संतांचे कर्तव्य ठरत नाही, असे दिसून येते.

दैवाने प्राप्त होणारे क्लेश हे ज्याचे त्यानेच सहन केले पाहिजेत व व्यवहारातील अडचणी व्यवहारानेच सोडविण्याचा प्रयत्न करीत राहाणे श्रेयस्कर होय ! असे संतांचे निक्षून सांगणे असते. परंतु संतमाऊली आईप्रमाणे आहे. लहान मूल आनंदाने खेळते, बागडते व भूक लागल्यास आईजवळ रडत जाते. अशा वेळी त्या मुलाची आई त्याची भूक शमविल्यावाचून राहील का? त्याचप्रमाणे या संसारखेळात सुखाने आम्ही खेळत असतो, तोपर्यंत मन स्वस्थ असते, यात संकटे उत्पन्न झाल्यावर आम्ही संतमाऊलीपाशी शरण आलो, तर त्या माऊलीने आम्हास पदरात घेऊन आमची संकटे निवारण करू नये काय? असे विचार ते प्रगट करतात. पण यावर माझे म्हणणे एवढेच आहे की, आई मुलाला जवळ करते. मुलाच्या दुखण्यामुळे आईचे अंतःकरण व्याकूळ होते. याचे कारण ते तिच्याच पोटचा गोळा असतो. अशामुळेच मुलाच्या रडण्याबरोबर ती त्याजकडे धाव घेते. तुम्हीही त्या मुलाची आपल्या आईबद्दल जी निर्मल भक्ती असते, जे निःसंशय प्रेम असते व आई आपल्याला दूर करणार नाही, ती काही झाले तरी आपल्याला जवळ करील, ही जी त्या मुलाची आपल्या आईबद्दल निःस्सीम भावना असते, तशीच निःस्सीम भावना, तसाच भक्तिचा ओलावा व तसेच निःसंशय प्रेम तुमच्या गुरूवर कराल, तर तुमची ही प्रेमाची मागणी पुरी झाल्याशिवाय राहणार नाही. परंतु असा दृढविश्वास, अशी निष्ठा असणारी व्यक्ती विरळा! केवळ आपल्या ऐहिक इच्छा फलद्रुप व्हाव्यात, पारमार्थिक इच्छा आपणास नाहीत, व या एकाच भावनेने आम्ही गुरूकडे जातो, असे म्हणणारेच पुष्कळ असतात, अशांना एकच उत्तर की, हा काही भक्तिचा मार्ग नव्हे. संकटात भस्म होऊन ज्याला परम शाश्वत सुख मिळविण्याची इच्छा झाली असेल, अशा व्यक्तींना सद्गुरु अखंड सुख ज्याने मिळेल, असा मार्ग दाखवितात. कधीही नाश न पावणारे, कमी न होणारे असीम समाधान व शांतीसुख देण्यास समर्थ असतात, व हेच त्यांचे खरे कर्तव्य असते. ज्ञानदेव म्हणतात,

अमोलिक रत्न जाडलें रे तुज।
कां रे ब्रम्ह-बीज नोळखसी॥

नरदेह म्हणजे एक अमोलिक रत्न आहे. तो जणू ब्रम्ह-बीजच आहे. सर्व प्रकार निर्भय अशा आत्मज्ञानाची त्यात शक्यता आहे. आणि ती सिध्द करण्यातच माणसाचे चातुर्य असते.

तेव्हा नरदेहाने प्राणीमात्रांची प्रेमपूर्वक सेवा करता येते. ती टाळून, निर्जीव मूर्तीच्या दर्शनासाठी तीर्थयात्रादि करीत बसण्यापेक्षा हृदय-मंदिरात लपून बसलेला तीर्थाचा तीर्थरूप जो आत्माराम, त्याचे दर्शन हवे आहे. त्यासाठी हृदय शुध्दी आणि जवळच्या जीवसृष्टीची सेवा हाच उपाय आहे. तिकडे लक्ष न दिल्यास एवढा नरदेह लाभून मोठी संधी गमावून बसल्याप्रमाणे होईल.

ज्ञानदेवानी लहानपणीच आपल्या भक्तिचा महिमा सर्वत्र गाजविला. मला वाटते, मराठी भाषिकांसाठी ज्ञानदेव हा प्रणित आहे. जशी भारतावर, तशी मराठी प्रदेशावरही ईश्वराने कृपेचा अपार वर्षाव केला आहे. अनेक सत्पुरुष येथे अवतरले आहेत. त्या सर्वांत मराठी भाषेपुरते बोलायचे तर ज्ञानदेवाचे स्थान अनन्यसाधारण आहे. तेव्हा या भक्तिचा वारसा प्रत्येक मानवाने जपणे हेच आपले कर्तव्य आहे.

# साई नाम सदा जपा

**सा**जिरे हे रुप पाहण्या लोचन रंगले
**ई**शाच्या रुपात तुला मी पाहिले
**ना**ही रे नाही साई, माझी मी राहिले
**म**न माझे सदा तुझ्या नामी गुंतले
**स**र्व काळ वेळ साई नामी हरपले
**दा**वि तुझी कृपा नामी मी आनंदले
**ज**शी सर्व जन, साई नामी दंगले
**पा**हतां तुजकडे डोळे हे पाणावले

**— सौ. मंदा इनामदार**
६ स्नेहसागर अपार्टमेंट,
प्रभादेवी, मुंबई-२५.

# श्री साईनाथांची अमर वाणी

– श्री. शिवानंद शंकर हिरेमठ
मु. पो. – कागवाड,
ता. अथणो, जि. बेळगांव (कर्नाटक).

धन्य धन्य ती भूमी की जेथे असे ज्ञानसंपन्न पुरुष जन्माला येतात. धन्य धन्य ती शिरडी – की जेथे महाराष्ट्राचा भाग्यभानू असे संत चूडामणी भगवान साई महाराज प्रकटले. त्या भाग्यभानू श्री साईमहाराजांचे निर्वाणाला (पुण्यतिथीला) यंदा १५ ऑक्टोबर १९८८ ला ७० वर्षे पूर्ण झाली. सूर्याचा उदय होताच ज्या प्रमाणे नक्षत्रांचा लोप होतो, त्या प्रमाणे प्रभू श्री साईमहाराजांचे चरण शिर्डीला स्पर्श होताच अज्ञान, अधर्म, सर्वांच्या अंतरातील अंधःकार नष्ट होऊन सर्वांच्या दारी दिवाळीच ज्ञानदीप उजळू लागली. समुद्रासारख्या आपल्या विशाल हृदयाच्या पवित्र प्रेरणेने समस्त नरनारींचे व इतर प्राणीमात्रांचे कल्याण व्हावे म्हणून शिर्डीमध्ये वास्तव्य केले. पतीचा विरह झालेली एखादी प्रेमळ पत्नी ज्या प्रेमभावनेने आपल्या पतीचे चिंतन करते, तशाच प्रेमभावनेने आपण प्रभू श्री साईनाथांचे चिंतन, स्मरण, केले पाहिजे. प्रभू श्री साईनाथ, राजांचा राजा, सम्राटांचा सम्राट होते, हे विसरता कामा नये.

श्री साईनाथांच्या निर्वाणीची ७० वर्षे हां हां म्हणता निघून गेली आहेत. ह्या कालखंडाचा बाबांच्या दृष्टीने प्रत्येक साई भक्ताने विचार करण्यासारखा आहे. कारण आज फिरुन एकदा अध्यात्मिक (धार्मिक) क्षेत्रांत सुव्यवस्था निर्माण करुन विस्कटलेली घडी नव्याने बसविण्याचे प्रयोजन उपस्थित झाले आहे. आज सर्वत्र ऐहिक मूल्यांचाच कमालीचा उदो उदो होत आहे. हे सारे जग वेड्यांचाच बाजार बनलेले आहे. मनुष्य स्वतःचे ईश्वरी स्वरुप अजिबात विसरुन जाऊन केवळ एक अर्थोत्पादक यंत्र बनण्याच्या मार्गास लागला आहे. सारांश एवढेच की, एक परमेश्वर सोडून इतर सर्व प्रकारच्या तुच्छ, असार, वस्तूंसाठी नुसते पागल बनलेले आहेत. आज आपण संसाराचे गुलाम आणि इंद्रियांचे दास आहोत. पुत्र जशी पित्याची सेवा करतो, तशी श्री बाबांची सेवा करा. त्यांच्या प्रभावासाठी आपले हृदय उघडे करा, ते ईश्वराचे व्यक्त रुप आहेत या दृष्टीने त्यांच्याकडे पाहा. या क्षेत्राचे (शिर्डी) महात्म्य कायम ठेवावयाला आणि त्यांचे उपदेशाची ज्योत महाराष्ट्रीय जनतेच्या अंतःकरणात कायमची जागती ठेवण्याला प्रत्येक साई भक्तास अहोरात्र झटायला हवे.

श्री साई भक्तांनो, मी तुमच्यासमोर श्री साई महाराजांचे काही विचार मांडावयाचा प्रयत्न करीत आहे. सर्व साईभक्तच चांगल्या व उच्च मनाचे आहेत. कमीत कमी रोज एकदा तरी त्या चिन्मय राजाचे – त्या अनंत सौंदर्याच्या, त्या अनंत शांतीच्या, त्या अनंत पवित्रतेच्या, साईराजाचे, किंचित् कां हाईना पण दर्शन प्राप्त करुन घ्या आणि या भावभूमीवर निरंतर वास करण्याचा प्रयत्न करा. जे अस्वभावी, गूढ वा रहस्यमय

आहे त्याच्या मागे लागू नका, त्याच्या पासून नेहमी दूरच राहा. जीवन हे एक क्षणकाल टिकणारे स्वप्न आहे. यौवन व सौंदर्य हे शेवटी नष्ट होणारच होणार, म्हणून सदैव म्हणत राहा की "हे साई प्रभो,तुम्हीच माझे माता-पिता, तुम्हीच इश्वर, तुम्हीच माझ्या प्रेमाचे स्थान आहात. धन नष्ट होऊन जाते, सौंदर्याचा लोप होतो, जीवन दुलगतीने क्षीणं होत जाते, पण साई प्रभूंचे उपदेश आणि प्रेम चिरकाल विद्यमान राहतात. प्रभू चरणी सदा सर्वदा मन ठेवा. देहाचे वा अन्य वस्तूंचे काय होईल,याची कुणाला पर्वा आहे? साई प्रभूच सर्व सुखांचा झरा होय. त्याच परमश्रेष्ठाचा शोध करा, तोच आमच्या जीवनाचे लक्ष्य होऊ द्या, मग त्याचा तुम्हाला निश्चित लाभ होईल,यात शंका नाही.

१५ ऑक्टोबर १९१८ रोजी विजयादशमीच्या शुभ मुहूर्तावर श्री साईबाबा समाधिस्त झाले. या घटनेस यंदा ७० वर्षे झाली. श्री बाबांच्या थोरवीला व त्यांच्या चिरस्मरणीय नि लोकोपकारी कामगिरीला साजेशा भव्य स्वरुपात हे उत्सव साजरे केले जाते. श्री. साईमहाराजांचा देह राहिला नाही, परंतु त्यांची वाणी, आणि किर्ती अमर आहे. त्यांची वाणी भारतीयांना सदैव आशीर्वाद देत आहे. त्यांची वाणी,किर्ती चंद्र-सूर्य आहेत,तोपर्यंत अढळ राहील,यात शंका नाही. जो श्री साईबाबांची वाणी ऐकू शकेल,त्याचे दुःख दूर होईल, जीवन सार्थकी लागेल.

"श्री संत चूडामणी श्री समर्थ साईबाबा की जय!"

## ओम साई नाथा

ॐ साई, ॐ साई ॐ साईनाथा
श्रद्धा भक्तीरुपाने चरणी ठेवीतें माथा
हा भास नव्हे पण आभास आहे कुणाचा
साई दर्शन नित्य लाभो असे वदणाऱ्या मनाचा
जीवनातील मृगजळाप्रमाणे दूर दूर ते अंतर
'साईनामा'ने ते दूर होवोनी कृपादृष्टी देई नंतर
हे विश्वचीं माझे घर पैशांची सर्वांना ओढ
विश्वातील समाजकंटकांची नकळत साई मोडली खोड
जीवनातील सुख-दुःखाचे प्रलय दूर सारु
श्रद्धा आणि सबुरी याचे नित्य अवलोकन करु

**– कु. सिंधु रंगराव थोरात**
बि. नं. ४८/२३१२ गांधीनगर,
गुलमोहर को. ऑ. सोसायटी,
ब्रांदा (पूर्व), मुंबई-५१.

# खापर्डे यांची शिरडी दैनंदिनी

— साईनंद

**बुधवार, दिनांक १४-२-१९१२**

मी सकाळी लौकर उठलो. काकड आरतीला हजर राहिलो. साईबाबांनी चावडीतून जाताना आपल्या हातातील छोट्या सटक्याने पूर्व, उत्तर आणि दक्षिण दिशा असे सगळे मार्ग दाखवित जात होते याचे मला आश्चर्य वाटले. जाताना ते नित्याप्रमाणे कठोर शब्द उच्चारित जात होते. नेहमीप्रमाणे आम्ही पंचदशीचा पाठ वर्ग घेतला. साईबाबांचे बाहेर जातानाचे दर्शन घेतले. आणि नंतर नेहमीप्रमाणे मशिदीत गेलो.

साईबाबांनी दोन गोष्टी सांगितल्या. एक गोष्ट अशी की— एक प्रवासी होता. त्याची सकाळीच एका राक्षसाशी भेट झाली. यात्रीने त्याला पाहिल्यावर तो अपशकून समजून पुढे जाऊ लागला. परंतु पुढे गेल्यावर त्याला दोन विहिरी लागल्या. त्या विहिरीतील गोड पाणी प्याल्यावर त्याची तहान भागली. जेव्हा त्याला भूक लागली तेव्हा त्याला एक सज्जन भेटला. त्याने आपल्या पत्नीच्या साह्याने त्याला काही खाद्यपदार्थ दिले. त्यानंतर त्याने एक शेत बघितले. त्यामध्ये मका अगदी तयार झाला होता. त्यामुळे त्याला हुरडा खाण्याची इच्छा झाली. शेताच्या मालकाने तो पण त्याला दिला. अशा प्रकारे त्या प्रवाशाला प्रसन्नता वाटली आणि तो खुषीत धूम्रपान करीत पुढच्या मार्गाला लागला. तो ज्या जंगलातून जात होता त्या जंगलात त्याला एक वाघ भेटला. त्याची भीतीने गाळण उडाली आणि जीव वाचविण्यासाठी तो एका गुहेत लपला. वाघ चांगलाच मोठा होता व त्याने या प्रवाशाचा खूप शोध तपास केला. साईबाबा त्याच वाटेने चालले होते. त्यांनी या प्रवाशामध्ये साहस धीर निर्माण केले, त्याला गुहेतून बाहेर काढले आणि त्याला त्याच्या वाटेवर आणले आणि म्हणाले, "जोपर्यंत तू त्या वाघोबाची हानी करीत नाहीस तोपर्यंत तो वाघ तुझी हानी करणार नाही."

साईबाबांनी दुसरी कहाणी सांगितली ती अशी— साईबाबांना चार भाऊ होते त्यापैकी एक बाहेर जात असे. भिक्षाटन करी आणि शिजविलेले अन्न, पोळ्या, मका इ. घेऊन येत असे. त्याची पत्नी त्या भिक्षेतून आणलेल्या पदार्थातून आवश्यकतेपेक्षा जादा अन्न त्यांच्या आईबापांना देत असे परंतु त्या सर्व भावंडांना उपाशीच ठेवीत असे. साईबाबांना पुढे एक कंत्राट मिळाले. त्यांनी पैसा घरात आणला आणि प्रत्येक भावाला खायला दिले. त्या भरपूर खाद्य पदार्थ भिक्षा मागून आणणाऱ्या भावाला देखील त्यांनी दिले. नंतर त्या भावाच्या अंगावर कोड उठले. प्रत्येक जण त्याचा तिरस्कार करू लागला. बापाने त्याला घराबाहेर घालवून दिले. तेव्हा साईबाबांनी त्याला खाऊपिऊ घातले व त्याच्या आरामाची पण व्यवस्था तेच करीत होते. शेवटी तो भाऊ मरण पावला.

आज दुपारची आरती नेहमीप्रमाणे झाली आणि त्यानंतर आम्ही भोजन केले व त्यानंतर थोडा वेळ आरामही केला. शिवानंद शास्त्री व विजयदुर्गाचे ठाकूर आज येथून गेले. स्थानीय स्वामींच्या व्याही मंडळींनी आज सर्वांना भोजन दिले. मी भोजनास येण्यास नकार दिला परंतु अन्य मंडळी मात्र गेली. सायंकाळच्या रपेटीस जाताना साईबाबांनी मी भोजनास का गेलो नाही हे मला विचारले, तेव्हा मी त्यांना खरे खुरे सांगितले की, दुपारी एकदा भोजन केल्यानंतर मी पुन्हा म्हणून कधी भोजन करीतच नाही. साईबाबा आज काहीसे चिंतेत दिसले. पूर्व आणि पश्चिम दिशेकडे त्यांनी हळूवारपणे पाहिले आणि आम्हां सर्वांना "वाड्यात जा" अशा नित्य, सदैव वापरल्या जाणाऱ्या शब्दात सांगून आम्हाला निरोप दिला. रात्री भीष्मांचे भजन आणि त्यानंतर दिक्षितांच्या रामायणाच्या पाठाचा कार्यक्रम झाला.

**गुरूवार, दिनांक १५-२-१९१२**

सकाळी मी नेहमीप्रमाणे उठलो, प्रार्थना केली आणि पंचदशीचा वर्ग उपासनी शास्त्री, बापूसाहेब जोग व श्रीमती कौजलगी यांचेबरोबर भरविला. आम्ही सर्वांनी साईसाहेबांचे ते बाहेर जातानाचे वेळी दर्शन घेतले आणि नंतर वर्ग पुढे तसाच चालू ठेवला. त्यानंतर मी नित्याप्रमाणे मशिदीत गेलो आणि साईसाहेब जे काही बोलत होते ते ऐकत बसलो. ते प्रसन्नचित्त होते आणि म्हणाले की— त्यांनी एका वेळी फार कठीण परिश्रम केले. भोजन न करतां महिनेच्या महिने उपाशी राहिले. फक्त काला टाकळ निंब आणि इतर झाडांची पाने खाऊन राहिले. ते पुढे म्हणाले, ईश्वर त्यांच्या प्रती खरोखरच दयाळू होता कारण की शरीरावरचे मांस अगदी संपले होते. हाडे तर कधी कडाकड मोडून पडतील याचेच सतत भय वाटत होते पण जीवन काही मात्र संपुष्टात आले नव्हते. दुपारची आरती नेहमीप्रमाणे झाली त्यानंतर आम्ही मंडळी आपापल्या भोजनासाठी निघून गेलो. माझ्या पत्नीने व इतरांनी उद्या शिवरात्रीच्या सणानिमित्त कोपरगावला जाण्याची इच्छा व्यक्त केली. साईसाहेबांना ही बाब अनावश्यक वाटली. परंतु त्या मंडळींनी आपले म्हणणे सतत पुढे चालूच ठेवले आणि शेवटी एक प्रकारे अनुमती मिळाली. आज दुपारी पुराणानंतर आम्ही परमामृताचा खास वर्ग केवळ दादा केळकरांच्या फायद्यासाठी आयोजित केला. पहिलाच दिवस असल्यामुळे यात आम्ही जास्त काही प्रगती करू शकलो नाही. आम्ही साईमहाराज सायंकाळी ते सायंकाळच्या रपेटीस बाहेर पडतानाचे वेळी दर्शन घेतले आणि नंतर वाडा आरतीला व रात्रीच्या शेजारतीला हजर राहिलो. बाळासाहेब सुध्दा हजर होते. माझ्यापूर्वी ते मोरचेल (मोराच्या शेपटीने तयार केलेला पंखा) घेऊन पुढे चालत असत म्हणून मी पुन्हा त्यांचेकडे तेच काम सोपविले. त्यांच्याच जागी मला एक पंखा मिळाला. आज बाळासाहेब भाटे यांनी आशाजनक प्रगती केली आहे.

**शुक्रवार, दिनांक १६-२-१९१२**

आज मी काकड आरतीला हजर राहिलो. साईसाहेबांनी अत्यंत मोहक शब्दात कडवट शब्दांचे प्रदर्शन केले. आम्ही प्रार्थनेनंतर पंचदशीचा वर्ग आयोजित केला

होता. बैलगाडी न मिळू शकल्याने माझी पत्नी आणि इतर मंडळी कोपरगावला जाऊ शकली नाहीत. आम्ही मंडळींनी साईबाबांचे ते बाहेर पडतानाचे वेळी दर्शन घेतले. श्री. मोरगावकर आज आले आणि त्यांनी परापूजेचा अनुवाद वितरीत केला. कल्याण भिवंडी येथूनही एक शास्त्री आले. ते बापूसाहेब जोग यांचेकडे उतरले आहेत. ते फार शांत स्वभावाचे गृहस्थ आहेत. शिवरात्रीमुळे आम्ही आज उपासाचे व्रत केले.

★★★★★★★

# साईरंगी रंगू दे मन!

**— सौ. वासंती नांदेडकर,** एम.ए.
महिंद्र ॲण्ड महिंद्र, मार्ग क्रमांक १३,
वरळी, मुंबई —१८.

भारतीय संस्कृतीची थोरवी महान आहे. त्या संस्कृतीला विविध सांस्कृतिक अंगानी संपन्न केलेले आहे. सामाजिक, ऐतिहासिक, भौगोलिक, धार्मिक व आध्यात्मिक अशा नानाविध शाखांनी भारतीय संस्कृतीचे वैभव समृद्ध व तेजोमय केलेले आढळते.

या सांस्कृतिक अंगांपैकी भारतीय संत परंपरेचा विचार करता, मन उदात्ततेने भरून जाते. महानुभावांपासून सुरू झालेले ही संतपरंपरा भागवत धर्माची धुरा घेऊन येणाऱ्या ज्ञानेश्वरांच्या काळापासून अधिकाधिक समृद्ध होताना दिसते. ज्ञानेश्वर — नामदेव,—एकनाथ — तुकाराम रामदास या संत पंचकाने अध्यात्माबरोबरच सामाजिक जाणिवेची, मनाच्या उन्नतीची अनेक बीजे जनमानसाच्या भूमीत रुजवलेली आहेत. त्यातूनच मानवी मन सजग झाले. समानतेची—समभावाची — सर्वधर्मसहिष्णुतेची शिकवण आपआपल्या वाङ्मयातून देण्याचा उपक्रम संतांनी केला.

ही संतपरंपरा इथेच न थांबता, श्री वासुदेवानंद सरस्वती, अक्कलकोटचे स्वामीसमर्थ, शेगावचे श्री गजाननमहाराज... अशी ही संतमालिका महाराष्ट्राचे भूषण ठरते. अगदी २०व्या शतकातही हरक्षणी ज्यांचा आधार वाटावा, असे थोर मानवी संत म्हणजे शिरडी क्षेत्रीचे अधिपती श्रीसाईबाबा! 'श्रीसाईनाथ' या पंचाक्षरांनी ज्या भक्ताच्या अंगावर भक्तीरसाचे रोमांच उभे राहात नाहीत, असा भक्त विरळा!

'भावाचा भुकेला हा संत' आजच्या क्षणापर्यंत भक्ताच्या आर्त हाकेला धावून आल्याशिवाय राहात नाही, याची प्रचिती आपल्यापैकी लाखो भक्तांनी अनुभवली आहे, ऐकलेली आहे, जाणलेली आहे.

भगवान श्रीसाईबाबांच्या सामर्थ्याचा विचार करताना त्यांच्या अगाध शक्तीचा, अघटित लीलेचा, अद्वितीय दिव्यत्वाचा, साक्षात्कार देण्याच्या पद्धतीचा अभ्यास हा आपल्यासारख्या पामरांच्या बुद्धीपलिकडचा विषय आहे, हे ध्यानात येते. तरीही आपापल्या कुवतीनुसार आपण त्यांच्याजवळ जाण्याचा प्रयत्न करतो.

तारीख १५ ऑक्टोबर, सन १९१८ रोजी श्रीसाईबाबा समाधिस्थ झाले. आज त्यांच्या निर्वाणाला ७० वर्षे लोटली आहेत. मनात विचार येतो, रोज नियमाने श्रीबाबांचे आपण स्मरण करतो. त्यांच्या रुपाकडे पाहून मनाला धीर मिळतो. पण खऱ्या अर्थाने साईभक्ती साधून मी काय शिकले? काय मिळवले? संकट समयी धावत येऊन मला सहारा देणे, एवढेच साईचे माहात्म्य आहे का?

मनोकामना पुरवून घेणे, हा आपला मनुष्य स्वभावाचा धर्म आहे. हा आपला लौकिक स्वार्थ आहे. परंतु भक्ताचे बोट धरुन ज्या परमार्थाची वाट साईंनी दाखवली, त्या शिकवणीचे काय? त्या अंतिम मनःशांतीकडे आपण कधी वळणार? बाबांच्या दयेची याचना आपण करतो, तितक्याच तन्मयतेने त्यांची शिकवण अंगी बाणवण्याची काळजी आपण का करत नाही? बाबांची विचार-तत्त्वे कसोशीने पाळावीत, हे आम्हा भक्तांचे कर्तव्य नाही का?

साईंची शिकवण किती साधी-सोपी सरळ! पण – भक्तजनहो, क्षणभर थांबा– साधी सोपी सरळ वाटणारी ही भक्तीची वाटचाल चालणे तितकेच कठीण आहे, याची जाणीव मनाला असू द्या. मानवी अहंभावाने सारे काही सोपे वाटते. परंतु ही सात्त्विक भक्तीची वाटचाल कशीतरी पायी तुडवू नका. भक्तीरस किती सोज्वळ, शिव. साईमाऊलीही अति कनवाळू. मग आपले मनसुद्धा तितकेच हळुवार झाल्याशिवाय हा मार्ग चोखाळता येणार नाही. पायी बोचणाऱ्या काट्यांची कटुता न जाणवता, भोवती फुललेले भक्तीचे मळे पाहता आले पाहिजेत. किती ममतेने साधु-संत सज्जनांनी अंतरीच्या सत् भावांचे पाणी त्यावर शिंपले आहे, याचे भान जाणता यायला हवे.

'मी,' 'माझे' विसरायला, फार मोठी साधना हवी. 'सबुरीचा मंत्र' साईंनी दिला, आपण तो उच्चारला. पण अंगिकारला का? 'उदी'च्या रुपाने बाबांनी एक सत्य प्रत्येकापर्यंत पोचवण्याचा परोपरीने प्रयत्न केला. शेवटी उरणार आहे, ती फक्त 'राख'. तरीही आम्ही मायेत गुंतत जातो! अहंभावाच्या रिंगणातून आम्ही मुक्त झाल्याशिवाय, जीवन प्रकाशमान होणार नाही, हे आम्ही पोथी-पुस्तकातून वाचतो. तरीही आमच्या भोवतीचा मायेचा अंधार, अज्ञानाचा काळोख आम्ही दूर करण्याचा प्रयत्न करतो का?

'साम–दाम–दंड भेद' यासारख्या चारी युक्त्या वापरुन साईबाबांनी भक्त कल्याणासाठी आपला जन्म झिजवला. तरीही अजून आमच्या

कमकुवत दुर्बल मनाची संकल्प-विकल्पातून सुटका झालेली नाही. 'सर्व धर्म समान' हे शिरडीत जाणवते. पण हा ख्रिस्ती व हा मुस्लिम ही भेदाची जाणीव आपल्यापैकी किती भक्तांच्या मनातून पूर्णतः गेलेली आहे?

'सबुरीचा मंत्र' अंगिकारण्याइतकी आमच्या मनाची प्रगल्भता झाली आहे का? क्षणाचा विलंब आम्ही साहू शकत नाही, तर अनंताची प्रतिक्षा करण्यासाठी अंगी किती बळ हवे? दुसऱ्याचे मन दुखवू नका, ही अतिशय रम्य वाटणारी साईची शिकवण! प्रत्यक्ष व्यवहारात या शिकवणुकीचा आम्हाला अनेकदा विसर पडतो. ही शिकवणूक पायदळी तुडवणारे आम्ही भक्त खरोखरच साईच्या सत् रुपाजवळ कधी जाणार?

'साईभक्त' म्हणवणे सोपे आहे. त्यांची तत्त्वे–विचार–भक्ती साधी वाटते. पण ती आचरणात आणण्यासाठी, या मानवी जन्माची शिदोरी पुरी पडेल का? निदान अंशतः तरी त्या शिकवणुकीचे सार आपल्या वर्तनात आणण्याचा प्रयत्न आपण साईभक्त करु या. तरच आपले मन सुख-दुःख, चांगले-वाईट, हर्ष-विषाद यांच्या पलिकडे जाऊन साईरुपातच ते रंगू लागेल! लौकिक आनंदासाठी ते तळमळणार नाही, तर शाश्वत सुखाकडे ते झेपावू लागेल, जिथे मायेचा पसारा नसेल, तर परमेश्वर स्वरुपाचे अस्तित्वाचे मांगल्य दिसू लागेल. 'आनंदाचे डोही आनंद तरंग' अशी मनोवस्था होऊ लागेल!

अशा सत् शक्तीचे सामर्थ्य आपणा सर्वांना मिळावे हीच प्रार्थना विनम्रपणे साईचरण करुया. आपल्या जीवनाचा तो सूत्रधार, त्याला विनम्र अभिवादन करुन हा लेख संपवत आहे. श्रीसाईनाथ!

## भुकेला हा भक्त

तुमच्या केवळ दर्शनाला भुकेला हा भक्त ।
शिर्डीवासी साईनाथा मन करा थोर ॥ धृ. ॥
अंत नको पाहु आता, नको रे उशीर ।
तुझ्या दर्शनासाठी देवा, झालो रे अधीर ॥ १ ॥
संसारात दंग झालो, तुला रे विसरलो ।
कृपा कर साई आता, आहेस तू उदार ॥ २ ॥
चराचर भरला आहे, साई विश्वंभर ।
साईनाथ, साईनाथ, मन करा थोर ॥ ३ ॥

**– श्री. महेन्द्र जनार्दन गुरव**
मु. सहाण, पोष्ट – नागांव,
ता. अलिबाग, जि. रायगड,
– अलिबाग.

# तुमचे संत ज्ञानेश्वरांविषयींचे सामान्य ज्ञान किती आहे?

(पुढीलपैकी सहा प्रश्नांची उत्तरे बरोबर देता आल्यास तुमचे सामान्य ज्ञान बरे, आठांची बरोबर देता आल्यास चांगले व सर्वच्या सर्व देता आल्यास उत्कृष्ट समजावें.)

१) संत ज्ञानेश्वरांचा जन्म ........ येथे झाला.
अ) आपेगाव ब) बदलापूर क) कणकवली ड) डोंगरगाव.

२) ज्ञानेश्वरांच्या वडिलांचे नाव ....... हे होय.
अ) दासोपंत ब) केशवराव क) सदाशिव ड) विठ्ठलपंत.

३) ....... हे ज्ञानेश्वरांच्या मातोश्रींचे नाव होय.
अ) जनाबाई ब) गोपिकाबाई क) रूखमिणी ड) वारूबाई.

४) ज्ञानदेवांच्या वडिलबंधूचे नाव ....... हे होय.
अ) निवृत्तीनाथ ब) प्रभाकर क) गजानन ड) भिकोबा.

५) ...... हे ज्ञानेश्वरांच्या बहिणीचे नाव होय.
अ) यमाई ब) विठाई क) मुक्ताई ड) जनाई.

६) ज्ञानोबारायांनी वयाच्या ...... व्या वर्षी ज्ञानेश्वरी लिहिली.
अ) १६ ब) ३८ क) ४० ड) ३७.

७) ज्ञानेश्वरांनी सांगितलेली ज्ञानेश्वरी लिहून घेण्याचे काम...... केले.
अ) गुरु गोविंद ब) सच्चिदानंद बाबा क) भक्त प्रल्हाद ड) वासुदेवानंद.

८) ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरी कथन केली ती ...... या ठिकाणी.
अ) निमगाव ब) नागपूर क) नेवासा ड) नवापूर.

९) ........ येथे ज्ञानेश्वरांनी रेड्याकडून वेद म्हणूवन घेण्याचा चमत्कार केला.
अ). पैठण ब) परळी वैजनाथ क) पंढरपूर ड) पुलगाव.

१०) वाघावर बसून येणाऱ्या ..... ला ज्ञानेश्वर महाराज भिंतीवर बसून ती चालवत नेऊन त्यांना सामोरे गेले व .... चे गर्वहरण केले.
अ) नामदेव ब) वामदेव क) चांगदेव ड) वासुदेव.

११) ज्ञानेश्वरांनी ..... येथे जिवंत समाधी घेतली ती वयाच्या अवघ्या २१ व्या वर्षी
अ) अदिलाबाद ब) पुणे क) जेजुरी ड) आळंदी.

१२) ज्ञानेश्वरांनी समाधी घेतली तो दिवस...... हा होता.
अ) कार्तिक वद्य १३ ब) वैशाख वद्य ५. क) आषाढ वद्य १४ ड) फाल्गुन वद्य ६.

सदानंद चेंदवणकर.

उत्तरे

१)—अ, २)—ड, ३)—क, ४)—अ, ५)—क, ६)—अ, ७)—ब, ८)—क, ९)—अ,
१०)—क, ११)—ड, १२)—अ.

# साई म्हणजे साक्षात् ईश्वर

**– सौ. शैलजा निळकंठ कुळकर्णी**
ठाणे (पश्चिम).

संत चूडामणी भगवान "साईबाबा" आज देहरूपाने आपल्यात वावरत नसले तरी निराकार अंश रूपाने त्यांचे वास्तव्य सर्व चराचरात आहे, यात संशय नाही. बाबांच्या भक्तांना श्रीसाईनाथांच्या अस्तित्वाचे त्यांच्या प्रचितीबद्दलचे अनुभव, त्यांचे संबंधीचे साक्षात्कार पदोपदी येत आहेत आणि त्यामुळेच श्रीसाईनाथांचे भक्त जगभर आज आहेत.

विजयादशमी (दसरा) हा श्रीसाईबाबांच्या निर्वाणाचा, पुण्यतिथीचा दिवस. १५ ऑक्टोबर १९१८ रोजी विजया दशमीच्या शुभ मुहूर्तावर बाबा समाधिस्त झाले. या घटनेस यंदा ७० वर्षे होत आहेत. श्री साईनाथांच्या निर्वाणीची ७० वर्षे हां हां म्हणता निघून गेली आहेत. आणि एवढा काळ लोटला तरी भक्तजनांच्या दृष्टीने त्यांचे जे महत्तम कार्य आहे, ते आज़ही त्याच जोमाने चालू आहे.

संतचूडामणी श्रीबाबांनी आपल्या भक्तांना श्रध्दा-सबुरी ही जी वचने दिली आहेत, त्यांचा अनुभव आल्याशिवाय राहात नाही. गेल्या ७० वर्षांच्या काळात हजारो नव्हे, तर लक्षावधी नव्हे, तर कोट्यावधी भक्तांना या वचनांचा अनुभव येत आहे. बाबा भक्तिभावनेने व श्रध्दायुक्त अंतःकरणाने दिलेल्या हाकेला ओ देतात. भक्ताचे दुःख मग ते कोणत्याही प्रकारचे असो, ते दूर करण्यासाठी झटतात, अशी भक्तांची पूर्ण खात्री झालेली आहे आणि त्यामुळे याच देशात नव्हे, तर देशाबाहेरही दूरदूरच्या ठिकाणी बाबांचे भक्त फार मोठ्या प्रमाणात पसरलेले आहेत. ते परोपरीने बाबांची आठवण करतात व बाबाही त्यांच्या आठवणीचे फळ त्यांच्या पदरात टाकल्याशिवाय रहात नाहीत.

बाबांची उदी म्हणजे संजीवनी आहे. श्रीबाबांनी आपल्या हातांनी पेटविलेली धुनी आजतागायत ७० वर्षे अखंड प्रज्वलीत आहे, हे भक्तांचे केवढे मोठे भाग्य! उदीचा महिमा काय आहे, हे प्रत्येकाच्या अनुभवास आले आहे व आज असंख्य भक्त या उदीवरच तरले आहेत. अशी ही उदी प्रभावशाली आहे.

श्रीसाईनाथांच्या समाधीत्तोर कालातही आज असंख्य लोकांना त्यांच्या कृपाप्रसादाची प्रचिती येते. श्रीसाईचे शरीर गेलं, त्यांचा आत्मा विश्व-चैतन्यात विलीन झाला, पण त्यांचे दिव्यत्व मागे राहिले. तेच दिव्यत्व, तिच दैवी शक्ती, आजही भक्तांच्या हाकेला धावून जात आहे, त्यांना दिलासा देत आहे आणि साक्षात्कार घडवित आहे.

साईबाबांच्या अवतारकार्याचा मुख्य उद्देश जर काय असेल, तर दुःखीतांच्या जीवनात आनंद निर्माण करणे, थकलेल्यांना, श्रमलेल्यांना चैतन्य देणे, श्री साईबाबांनी आपल्या अवतार कार्याने संपूर्ण विश्वाला आनंद देऊन आपली जीवनज्योत

आसमंतात अदृश्य केली. बाबा म्हणत, मी गेल्यावर माझी हाडे समाधीतून बोलतील, मुंग्यांची रीघ लागावी, तशी माणसे शिरडीला येतील. साईबाबांचे हे वचन आज अक्षरश: खरे झालेले दिसते.

प्रत्यक्ष शरीराने जरी साईबाबा आज विद्यमान नसले, तरी श्रध्देच्या रूपाने आज ते आपल्या असंख्य भक्तांच्या हृदयात जिवंत आहेत. जशी श्रध्दा तसे फळ या न्यायाने आजही भक्तांना फळ मिळत आहे. श्रीसाईबाबांच्या वास्तव्याने छोट्याशा शिरडीला आज एक महान क्षेत्राचे श्रेष्ठत्व लाभले आहे. त्यांच्या मंगल नामस्मरणाने आणि पूजनाने नुसती शिरडीच नव्हे, तर सारा भारत देश पूनीत होत असल्याचे दृश्य आज आपल्याला दिसत आहे. शिरडीला बाबांच्या दर्शनाला येणाऱ्या असंख्य भक्तांत एक प्रकारची अनाकलनीय अशी एकात्मता आढळते. प्रदेश, वेश, भाषा, धर्म यात वरवर दिसणारी विभिन्नता साईच्या चरणी विलीन पावते आणि आम्ही सारे भारतीय एक आहोत, आमचा आत्मा एक आहे, असा साक्षात्कार झाल्याशिवाय रहात नाही. श्री साईनाथांच्या असंख्य, अतर्क्य साईलीला भक्तजनांना दृष्टान्त देत आहेत आणि देत रहातील, त्यासाठी पाहिजे फक्त श्रध्दा-सबुरी.

"श्री साईचरणी कोटी कोटी प्रणाम"

# अशी बाबांना भक्ताची काळजी

– इंदिरा लालवाणी
द्वारा कांता माखीजानी
२ चंद्रोदय सोसायटी,
शंकरशेठ रोड, पुणे-३७.

आई ती आई बहू मायाळू। परी लेकुरेच निघता टवाळू।।
साई स, अ. २२, ओवी ७२

श्रीसमर्थांच्या महानिर्वाणास सत्तर वर्षे पूर्ण होत आहेत पण बाबांच्या अपार कृपेचा वर्षाव आजही आम्हा भक्तांवर अखंड वाहात आहे. आम्हा भक्तगणांची काळजी त्यांना केवढी आहे. जन्मदात्री आईसुध्दा जाणणार नाही एवढी ही आमची द्वारकामाईतील आई जाणत आहे. भक्तांचे हित-अनहित कशात आहे, याची काळजी त्या आईला आहे, आम्ही हे जाणत नाही, आम्हाला वाटतं बाबांना हाक मारली, त्यांना प्रार्थना केली की लगेच बाबांनी ओ द्यावी, आमच्या हाकेला धावून यावं.

मिरीकर समर्थांना भेटायला आले. क्षेमसमाचार दर्शन घेऊन चिथळीस जाण्यास वेळ होईल म्हणून जावयास निघाले, तेव्हा बाबा त्यांना म्हणाले, अहो ती द्वारकामाई तुम्हाला ठाऊक आहे कां! त्याच मिरीकरांना काहीच उमज पडला नाही. पुन्हा श्रींनी आपल्या उजव्या हाताची मूठ डाव्यां हाताच्या कोपऱ्यातून काढून म्हणाले, तो लांब बाबा तुम्हाला माहीत आहे का? फार भयंकर असतो तो. पण असेना का, आपण द्वारकामाईची लेकरं आहोत ती आई फार मायाळू आहे. लेकरांसाठी फार कनवाळू आहे, पण मुलंच टवाळ निघाली, तर ती तरी काय करणार? त्यांची काळजी ती करते पण मुलं त्या शब्दांचा अर्थ न जाणता तिकडे दुर्लक्ष करतात.

आपले बाबा नुसतं बोलून गप्प बसले नाहीत तर त्यावरचा उपाय पण त्यांनी मिरीकरांना सांगितला. शामरावांना त्यांच्याबरोबर जाण्यास सांगितले. म्हणाले कसे श्यामा, तू पण चिथळीची फेरी मारून ये. खूप मजा येईल. शामराव मिराकरांना म्हणाले, बाबांनी सांगितले आहे की, तुमच्या बरोबर मी जायचं. मिरीकर म्हणाले कशाला उगाच हेलपाटा तुम्हाला. तसा तो त्यांचा निरोप शामरावांनी बाबांना सांगितला. बाबा म्हणाले, बरं. आपलं काय गेलं. आई बिचारी लेकरांसाठी कळवळते पण लेकरांना त्याची काय पर्वा? एवढ्यात मिरीकरांना काय वाटलं की बाबांनी आज्ञा केली आहे ती पाळलीच पाहिजे. शामरावांना म्हणाले, चला माझे बरोबर. पण शामराव बाबांच्या शब्दाबाहेर नाही वागायचे. म्हणाले, थांबा त्यांची आज्ञा घेतो व ते जसं सांगतील तसं करतो. मिरीकरांचे बोलणे शामरावांनी बाबांना सांगितले. तसे बाबा म्हणाले, जा तो नेतो तर. ही आई आपल्या ब्रीदाला घालवेल कां! पुढे जेव्हा मिरीकर चिथळीस पोहचले, तेव्हा हुजूर आलेच नव्हते. देवळात मुक्काम करावा लागला. बत्तीच्या उजेडात वर्तमानपत्र वाचण्यात ते गर्क झाले होते. तितक्यात कागदांवर सुरूसुरू असा आवाज येऊ लागला. शिपायाचे तिकडे लक्ष गेले. पाहतो तो लांब बाबा. साप रे साप असं हळूच म्हणाले. पाचसहा जणांनी बडगे उचलले व ते अरिष्ट टाळले. तेव्हा मिरीकरांना बाबांच्या शब्दांची आठवण झाली. केव्हढी बाबांना काळजी नुसती संकट सूचना न देता त्याचा परिहार पण केला. केवढी बाबांची दूरदृष्टी, केवढे प्रेम भक्तांवर! एकदा अनन्य शरण गेलं की, त्या आईला काळजी. अशी आहे माझी द्वारकामाई.

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी
## श्री साईबाबा संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. क्र. | पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकींग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्चरित | मराठी | ३१-०० | ९-०५ |
| २. | –,,– | इंग्रजी | १४-५० | ६-५० |
| ३. | –,,– | हिंदी | – | – |
| ४. | –,,– | गुजराथी | १९-०० | ६-५० |
| ५. | –,,– | कन्नड | १३-५० | ८-०० |
| ६. | –,,– | तेलगु | १८-०० | ८-०० |
| ७. | –,,– | तामीळ | – | – |
| ८. | –,,– | सिंधी | २२-०० | ७-५० |
| ९. | श्री साई सत्चरित पोथी | गुजराथी | ३१-०० | १०-५० |
| १०. | श्री साई लिलामृत | मराठी | – | – |
| ११. | –,,– | हिंदी | – | – |
| १२. | –,,– | गुजराथी | ६-६५ | ४-०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | – | – |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | ०-६५ | ३-५० |
| १५. | –,,– | हिंदी | १-०० | ३-५० |
| १६. | –,,– | गुजराथी | ०-९० | ३-५० |
| १७. | सगुणोपासना (आरती) | मराठी | ०-७० | ३-५० |
| १८. | –,,– | हिंदी | १-२५ | ३-५० |
| १९. | –,,– | गुजराथी | ०-८० | ३-५० |
| २०. | –,,– | तेलगु | २-५० | ५-५० |
| २१. | –,,– | सिंधी | १-२५ | ३-५० |
| २२. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | १-८५ | ३-५० |
| २३. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | ४-८० | ५-५० |
| २४. | मुलांचे साईबाबा | मराठी | – | – |
| २५. | –,,– | इंग्रजी | १-६५ | ३-५० |
| २६. | –,,– | हिंदी | – | – |
| २७. | –,,– | गुजराथी | १-६५ | ३-५० |
| २८. | –,,– | तेलगु | – | – |
| २९. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | ०-८० | ३-५० |
| ३०. | मार्गदर्शिका (शिर्डी गाईड) | मराठी | – | – |
| ३१. | –,,– | इंग्रजी | – | – |
| ३२. | –,,– | गुजराथी | १-५० | ३-५० |
| ३३. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ७-२५ | ४-०० |
| ३४. | साईबाबा ऑफ शिर्डी (भरुचा) | इंग्रजी | ६-५० | ४-०० |
| ३५. | साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३-०० | ४-०० |
| ३६. | अष्टोत्तर शत नामावली | मराठी | १-०० | ३-५० |
| ३७. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | १५-२५ | ४-५० |